





# माणूस

२५ डिसेंबर ७१
पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २५ डिसेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष अकरा | अंक तीस | वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये | परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


**सप्रेम नमस्कार...**

□ ४ डिसेंबरच्या अंकातील 'बेलवंडी' या खास वार्तापत्रात पारधी जमातीची खानेसुमारी होत नाही, असे विधान करण्यात आले आहे. फिरस्त्या जमातींच्या खानेसुमारीत चुका होण्याची शक्यता असली तरी खानेसुमारी होत नाही अशी समजूत असल्यास ते बरोबर नाही. १९६१ च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रात २१,४१७ पारधी आहेत. त्यांपैकी नगर जिल्ह्यातील लोकसंख्या १२८२ आहे. पारध्यांसकट सर्व अनुसूचित जमातींची महाराष्ट्रांतील लोकसंख्या २३·९७ लक्ष आहे. एकूण प्रमुख अनुसूचित जमाती ४० आहेत.

१७ डिसेंबर, १९७१ — रा. प. नेने, पुणे

□ मी पहिल्यांदाच तुमचा अंक हाती घेतला आणि आतील लेख पाहून अगदी आनंदित झालो. सदाशिवनगरची शेतकरी परिषद वाचली. तसेच बेलवंडी, अहमदनगर परिषदपण वाचली आणि त्याचप्रमाणे 'सदाशिवनगर ते बेलवंडी'. चंद्रशेखरने सर्वच कार्यक्रम जनतेपुढे दिलखुलास मांडला. वाचल्यानंतर फारच विचार करण्यासारखे आहे असे वाटले. आणि एक माणूस जो बागाईतदार आपली जमीन या सीलिंगमुळे जाते आहे असे वाटताच शेतकऱ्याला घेऊन आडवे पडू लागतो. बिचाऱ्यांना काय कळणार? दबदबा मोठा! महाराष्ट्रातून कॉंग्रेस नामशेष करणाराला न जाणो कॉंग्रेसमधूनच बाहेर पडावे लागेल!

'आग' ही दत्ता कवर लिखित कहाणी फारच छान वाटली. असेच कार्य आपल्या 'माणूस'ने करावे. या वृत्तपत्रपॉलिसीच्या स्पर्धामय जगात आपला 'माणूस' वाटचाल करतो याचे श्रेय आपल्याला आहे.

९ डिसेंबर, १९७१ — शिवाजीराव सोनवणे, करमाळा


साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# विजय :
# राजनैतिक आणि सामरिक

श्री. ग. माजगावकर

यशस्वी व्यक्ती तेजस्वी असतातच असे नाही. यशाला तेजाची झळाळी संघर्षामुळे प्राप्त होत असते. इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व असे संघर्षप्रिय आणि लढाऊ आहे, हे काँग्रेस महासमितीच्या बंगलोर अधिवेशनापासूनच स्पष्ट होऊ लागलेले होते. प्रथम त्यांनी काँग्रेसमधील विरोधकांवर चाल केली. मध्यावधी निवडणुकांत त्यांनी काँग्रेसबाहेरील विरोधी पक्ष भुईसपाट केले आणि आता तिसरे भारत-पाक युद्ध खेळून त्यांनी आपले आंतरराष्ट्रीय स्थानही निश्चित करून टाकले. यापुढे भारताला नगण्य समजून निदान आशिया खंडातील राजकारण तरी कोणी खेळू शकणार नाही. बड्यातला बडाही. हे यश इंदिरा गांधींच्या लढाऊ मुत्सद्देगिरीचे आहे. सारा भारत या त्यांच्या पराक्रमावर आज लुब्ध आहे. एक वीरांगना म्हणून उद्याचा भारतही त्यांची स्मृती चिरकाल जतन करणार आहे. दोन वर्षांपूर्वी, राष्ट्रपती निवडणुकीच्या काळात दिल्लीतील सर्वसामान्य जनता म्हणत होती –

जब तक बहे जमना का पानी
तब तक रहे इंदिरा रानी

– आणि आज सारा भारतवर्ष हे जयगान करीत आहे.
– उद्याच्या भारतवर्षातही या जयगानाचे सूर निनादत राहतील.

आपला सामरिक विजय मात्र अभिमानास्पद असला तरी राजनैतिक विजयासारखा दैदीप्यमान नाही. आंतरराष्ट्रीय विजयमालिकेत नोंदला जावा इतका मोठा नाही. मुळात हा सामना तुल्यबलांचा नव्हता. पाकिस्तान हा भारतापेक्षा फारच लहान देश. जन्मापासूनच दोन तुकड्यात फाटलेला. एक तुकडा लोकमताच्या दृष्टीने आपल्याला संपूर्ण अनुकूल असलेला. सैन्यबल आपल्या मानाने खूप कमी. आपले पायदळ दहा लाख तर पाकिस्तानचे तीन ते चार लाख. पाकिस्तानपेक्षा आपल्या विमानदलाची संख्या दुपटीहून थोडी अधिक. तोफखानादलाचे प्रमाण तर एकास तीन असे. रणगाडादल फक्त आपल्यापेक्षा निम्म्याहून थोडे अधिक. असा हा विषम सामना जिंकला नसता तरच आश्चर्य होते. आंतरराष्ट्रीय सामरिक विक्रमाची पातळी कोणती आहे ? भोवताली तेरा विरोधी अरब देशांचे कोंडाळे

असताना सहा दिवसांत इस्रायलसारख्या टिचभर राष्ट्राने इजिप्तसारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशाला धूळ चारली, ही आंतरराष्ट्रीय विक्रमाची पातळी आहे. किंवा व्हिएतनामचे युद्ध. एक गरीब आणि लहान राष्ट्र अमेरिकेसारख्या धनाढ्य आणि शस्त्रास्त्रसंपन्न बड्या राष्ट्राला दाती तृण धरायला लावते, हा जगाने चकित व्हावे असा सामरिक चमत्कार आहे. या मानाने आपला सध्याचा सामरिक विजय अल्प आहे व तो संयमानेच साजरा करणे आपल्याला अधिक शोभादायक ठरणार आहे.

तरी हा विजय लक्षणीय आहे, अभिमानास्पद आहे, तो वेगळ्या दोन कारणांसाठी—

१ : यापूर्वीच्या दोन्ही भारत-पाक संघर्षांत जवान शौर्याने लढले तरी विजयाची कोणतीच निर्णायक जागा आपल्याला सर करता आलेली नव्हती. पासष्टच्या युद्धात लाहोर आपण घेतले नाही. पाकिस्तानने तिखट प्रतिकार केला, की आपल्यालाच लाहोरवरचा कबजा अभिप्रेत नव्हता हे गुलदस्तात आहे. पण त्यामुळे सामना बरोबरीने सुटला असेच सर्वांचे मत बनले. शिवाय मिळालेले अल्पस्वल्प विजयही आपण ताश्कंदला हरवून आलो. तसे यावेळी काही घडले नाही. डाक्का आपण जिंकले! शत्रूसैन्य शरण आले! विजयावर आता शिक्कामोर्तब झालेले आहे. विजय निःसंदिग्ध, निर्णायक व लहान असला तरी निःशेष आहे.

२ : आपली सेना ही खरीखुरी मुक्तिसेना ठरली आहे. जिनांनाही आपण सभ्यतेने वागवीत आहोत. आपली प्रेरणा मुलुखगिरीची, विस्तारवादाची, प्रदेश गिळंकृत करण्याची, कुणालाही गुलाम बनविण्याची नाही. शेजारी देशातील जनतेला उलट गुलामगिरीतून मुक्त करण्याची आहे. आणि हा मुक्तिसंग्राम संपल्यावर या दुर्दैवी जनतेवर कुठलेही वर्चस्व न गाजवता सन्मानपूर्वक निरोप घेण्याची आहे. जसा रामाने बिभीषणाला राज्याभिषेक करवून लंकेचा निरोप घेतला होता! इतकी विशुद्ध नैतिकता त्या इतिहासप्रसिद्ध लाल मुक्तिसेनांनीही प्रकट केल्याची नोंद सापडत नाही. नाझींचा निःपात केल्यावर रशियाच्या लाल फौजा पूर्व युरोपात घुसल्या. त्यांनी अत्याचार तर केलेच, पण अनेक छोट्या देशांना गुलामही बनवले. अजून या देशांची गुलामगिरी संपलेली नाही. चीनच्या मुक्तिफौजांनी तिबेट गिळंकृत केला हा इतिहास तर ताजाच आहे. या पार्श्वभूमीवर विजयी भारतीय सैन्याची वर्तणूक फारच उमटून दिसते. युद्धातही मानवतेची किमान पातळी आपण सोडली नाही हा निश्चितच एक जागतिक उच्चांक ठरावा.

मात्र याही उच्चांकाच्या आपण फार आहारी जाता कामा नये. युद्धगुन्हेगारांची कठोर व तात्काळ चौकशी झाली पाहिजे आणि या गुन्हेगारांना डाक्क्याच्या चौकातच फासावर टांगले गेले पाहिजे....

दया तिचे नाव भूतांचे पाळण । आणिक निर्दाळण कंटकांचे ॥

—ही मानवतेची व्याख्याही आपण विसरता कामा नये.

□ □ □

# निळे आकाश आणि चंदेरी पंख !

विजय वैद्य

सैन्यदळे समोर येऊन लढण्याचा प्रकार फारच प्राचीन आहे. जहाजे बांधण्याचा विकास असा घडत गेला त्याप्रमाणे आरमारी युद्ध हा प्रकार अस्तित्वात आला. म्हणजे याप्रकारचे युद्ध व युद्धकलाही तशी पुराणीच आहे.

राईट बंधूंनी विमानांचा शोध लावला त्यावेळी किंवा त्यानंतर काहीकाळपर्यंतही विमानयुद्धाचे वेगळे शास्त्र उदयाला येईल अशी कोणालाही कल्पना आली नाही. पण ही हवाईशक्ती युद्धात वापरण्यात आली आणि मग युद्धाचा सारा चेहरामोहरा, रागरंगच पालटून गेला. ज्याला 'फायरिंग लाईन्स' किंवा 'बॅटल झोन्स्' असे म्हणतात (म्हणजे प्रत्यक्ष युद्धक्षेत्र) ते पूर्वी त्या क्षेत्रापुरते मर्यादित राहात असे पण हवाईयुद्धच्या प्रकाराने ते अमर्यादित झाले. 'फायरिंग लाईन्स' केव्हाच पुसून गेल्या.

देशोदेशांत सरहद्दी पाडल्या गेल्या होत्याच. पुढेपुढे सागरी सीमाही अस्तित्वात आल्या. आणि हवाईशक्तीचा उदय होताच हवाई हद्दींचाही मामला सुरू झाला. शांततेचा काळ असो वा युद्धाचा, कोणत्याही देशाच्या हवाई हद्दीचा भंग करणे ही गंभीर बाब ठरू लागली. (आंतरराष्ट्रीय सागरावरील नभांगण हे खुले समजले जाते. त्यात विनापरवाना कोणत्याही देशाच्या नागरी वा लष्करी विमानाला उड्डाण करता येते. मात्र एखाद्या देशाच्या हवाईहद्दीत उड्डाण करताना त्या देशाची परवानगी घेणे आवश्यक ठरते. प्रत्येक देशाने एक हवाई पट्टा (कॉरिडॉर) ठरवून दिलेला असतो व दुसऱ्या देशांच्या कोणत्याही विमानाला त्या ठरलेल्या हवाई पट्ट्यातूनच उड्डाण करावे लागते नाहीतर तो तात्काळ हवाई-हद्दभंग ठरतो. रेडारचे नेटवर्क यावर बारीक लक्ष ठेवून असते आणि हा भंग करणाऱ्या विमानाला लगेच इशारा दिला जातो. वेळप्रसंगी हवाईदलाची विमाने त्यांच्याभोवती घिरट्या घालू लागतात व काहीवेळा अशा ज्ञात व अज्ञात विमानाला बळजबरीने जवळच्या विमानतळावर उतरवले जाते.

हवाई शक्तीचा उपयोग योग्यप्रकारे होण्यासाठी पुढील गोष्ट आवश्यक असते आणि ती म्हणजे हवाई प्रभुत्व. (१) एखाद्या देशाच्या व त्याच्या मित्र राष्ट्रांच्या सभोवती हवाई छत्र निर्माण करून, (२) शत्रूच्या प्रदेशात मुसंडी मारून, तेथे युद्ध

चालू ठेवून व शत्रूला उसंत न देता हल्ले चालू ठेवून आणि (३) शत्रूची रसद कापून असे प्रभूत्व प्रस्थापित करता येते. यासाठी हवाई दलाच्या पथकांची हालचाल, विमानांचा वेग, त्यांची हल्ला करण्याची कुवत, दारूगोळा, अचूक नेमबाजी आणि लवचिकपणा ह्या गोष्टी महत्त्वाच्या असतात. सध्याच्या भारत-पाक युद्धात तसेच ६७ सालच्या पांच दिवसांच्या अरब-इस्रायल युद्धात कसलेले वैमानिक, अचूक मारा करता येणारा दारूगोळा आणि विमानांचा योग्य प्रकारे केलेला वापर यामुळे. हवाई तसेच जमीन आणि समुद्रावरील युद्धात या देशांना हुकुमत मिळवता आली. इस्रायली विमानांनी त्यांवेळी एक चांगला डावपेच आखला होता. त्यांच्या विमानांनी सरळ पश्चिमेकडून इजिप्तकडे झेप न घेता उत्तरेला भूमध्य समुद्रावर उड्डाण करून मग पश्चिमेकडे मोर्चा वळवून अचानक हल्ला केला. अरब जनतेच्या रडारचे नेटवर्क चुकविण्यासाठी त्यांनी फारच खालून उड्डाणे केली. (उड्डाणे खालून केली असता रडारवर ती दिसू शकत नाहीत.) हल्ल्याची वेळही अशी निवडली होती, की त्यावेळी वरिष्ठ लष्करी वा हवाईदल अधिकारी त्यांच्या कचेऱ्यात नव्हते. हे सर्व जरी असले तरी दुसरा एक महत्त्वाचा भाग त्यात आहे; तो म्हणजे तळावरील हवाई सैनिक. विमानाची देखभाल, इंधन व दारूगोळा भरणे ही कामे जितक्या चलाखीने होतील तेवढ्या चलाखीने हल्ले करणे शक्य होते. ६५ चे व आताचे भारत-पाक युद्ध आणि '६७ चे अरब-इस्रायल युद्ध, यावेळी तळावरील हवाई सैनिकांनी फारच उत्कृष्ट कामगिरी बजावली. त्यामुळे त्वरेने आपली विमाने पुन्हा हल्ल्यासाठी जाऊ शकत होती. याचा परिणाम असा झाला की प्रथम जरी पाकिस्तानने अचानक हल्ला केला व हवाई हल्ल्यांचा जोर दाखविला, तरी नंतर नंतर आपली विमाने दिवसातून २०० ते २५० उड्डाणे करीत, तर पाक हवाईदलाची पुरती ४० ते ५० उड्डाणेही होत नसत. आपण व इस्रायलने शत्रूची बरीच विमाने तळावरच नष्ट केली. पाकच्या पहिल्या दिवशीच्या हल्ल्याचे दोन उद्देश होते. ते म्हणजे तळावरच आपली विमाने गारद करणे, पण हे शक्य झाले नाही. कारण आपल्या हवाई गुप्तहेर खात्याने आधीच यासंबंधीचे इशारे दिले होते. त्यामुळे आपली विमाने निरनिराळ्या ठिकाणी पांगवण्यात आली होती. दुसरे म्हणजे विमानतळांवर प्रचंड मारा करून रेडारयंत्रणा व विमानतळ निकामी करून टाकायचे म्हणजे आपल्याकडून होणाऱ्या हवाई हल्ल्यांना पायबंद बसू शकला असता पण हा प्रयत्नही तितकासा यशस्वी होऊ शकला नाही.

अविरत चालणाऱ्या संशोधनाचा परिणाम म्हणून अधिक शक्तिशाली, वेगवान, दूरच्या पल्ल्याची, जास्त उंची गाठणारी विमाने अस्तित्वात येत असतात. या गोष्टींवरही शत्रूवर कुरघोडी करण्याची कुवत प्राप्त होत असते.

हवाई दलाचे मुख्य काम दोन प्रकारचे असते. याला 'स्ट्रॅटेजिक टास्क' व 'टॅक्टिकल टास्क' असे म्हणतात. 'स्ट्रॅटेजिक टास्क' म्हणजे व्यूहरचनेची वा डाव-

पेचांची कामगिरी. या कामगिरीत बॉम्बर्स दूर शत्रुप्रदेशात जाऊन शत्रूच्या महत्वाच्या लष्करी ठाण्यांवर, विमानतळांवर व सप्लाय डेपोज्, पेट्रोलच्या टाक्या आदी ठिकाणी बॉम्बहल्ले करतात. त्यामुळे शत्रूची हल्ला करण्याची वा लढण्याची शक्ती खच्ची करता येते. बॉम्बर्सना संरक्षण देण्यासाठी लढाऊ (फायटर्स) विमाने जातात पण अलीकडे फायटर बॉम्बर विमानेही तयार करण्यात आली आहेत. दूरच्या पल्यावर कामगिरीला जाणाऱ्या विमानांना हवेतच इंधन पुरविणारी विमानेही रशिया-अमेरिका यांसारख्या बलाढ्य राष्ट्रांकडे आहेत. उड्डाण करीत असतानाच असा हा इंधन पुरवठा केला जातो.

'टॅक्टिकल टास्क' म्हणजे प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावरील डावपेचाची कामगिरी. या कामगिरीवरील विमाने, हल्ल्यासाठी पुढे सरकणाऱ्या सैन्याला वा नौदलाच्या काफिल्याला हवाई छत्राच्या सहाय्याने संरक्षण देत असतात. वेळप्रसंगी त्यांच्या मार्गातील मोर्चे बांधून असलेल्या सैन्यावर, रणगाड्यांवर वा नाविक दलावर हल्ले करतात.

दोन लढाऊ (फायटर्स) विमानाच्या हवाई युद्धाला 'डॉग फाइट' असे म्हणतात. जेव्हा एखादे विमान या युद्धात वा जमिनीवरील तोफेच्या गोळ्याला 'बळी पडते' त्यावेळी वैमानिक आपल्या 'इंजेक्शन सीट'ची कळ दाबतो. त्याबरोबर विमानाच्या कॉकपिटवरील कॅनॉपी (काचेचे आवरण) उडते आणि वैमानिक त्याच्या सीटसह बाहेर फेकला जातो. थोड्याच वेळाने हवाई छत्री (पॅराशूट) उघडली जाते. याला 'बेल आऊट' होणे असे म्हणतात.

हल्ला करणाऱ्या विमानाने काय कामगिरी बजावली आहे. याचा वृत्तांत वैमानिकाला स्वतःहून द्यावा लागत नाही. हे काम विमानालाच बसविलेला कॅमेरा करीत असतो. या कॅमेऱ्यात हल्ल्यापूर्वीची व हल्ल्यानंतरची छात्राचित्रे घेतली जातात. 'डॉग फाईट'मध्ये 'एअर-टू एअर गाचडेड मिसाइल्स' चाही वापर केला जातो. हे मिसाइल सोडले, की त्याचा 'सोनर' (एक प्रकारचा रेडार) आपल्या 'लक्ष्या'मागे लागतो आणि गतीप्राप्त करून घेऊन विमानाचा अचूक वेध घेतो

जमिनीवरील विमान विरोधी तोफांनाही आता रेडार्स बसविलेली असतात. त्यामुळे हवेतील विमानाचाही जमिनीवरून अचूक वेध घेता येतो. (भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड असे सेट्स देशातच बनवीत आहे.)

हवाई दलाकडील दुसऱ्याही काही महत्त्वाच्या कामगिऱ्यांत पुढील तीन प्रमुख आहेत. टेहळणी व हवाई हेरगिरी, वाहतूक आणि एअरबोर्न किंवा पॅराट्रुप्स यांसाठी केलेली उड्डाणे. टेहळणी उड्डाणे करून शत्रूच्या प्रदेशातील महत्त्वाची ठिकाणे पाहून ठेवणे, त्यांचे स्थान ठरविणे वगैरे प्रकारची कामगिरी या विमानांकडे असते. तर हेरगिरी करणारी विमाने ४० ते ६० हजार फुटांवरून उड्डाण करून शत्रू प्रदेशांची विस्तृत छायाचित्रे घेत असतात. ही छायाचित्रे अधिक संवेदनाक्षम कॅमेऱ्याने घेतलेली असल्याने अत्यंत स्पष्ट असतात. अगदी रस्त्यात पडलेला छोटा चेंडूही

चांगला ओळखता येईल इतकी स्पष्ट. यातही वैमानिकांसह वा वैमानिक विरहीत विमाने असतात. वैमानिक विरहीत विमानांचे नियंत्रण तळावरून केले जाते. चीनी व रशियन प्रदेशावर अमेरिकेची यू. २ या प्रकारची अशी अनेक विमाने जात असतात. (अर्थातच त्यांचीही विमाने अशा प्रकारे अमेरिकेवर व इतरत्रही उड्डाण करीत असतात) १९६९ साली गाजलेले मेजर फ्रान्सिस गॅरी पावर्सचे यू. २ विमान प्रकरण असेच होते. पेशावरकडून निघालेले हे विमान रशियन हवाई हद्दीत पाडण्यात आले. अमेरिकेची अशी विमाने नेहमी येत पण अति उंचीमुळे रशियाला ती पाडता येत नसत. रशियाने यावर कडी केली. पेशावर विमानतळावरच आपल्या हस्तकांतर्फे त्यांनी 'या' विमानाच्या अल्टोमीटर—उंचीदर्शक यंत्रामध्ये बिघाड घडवून आणला व ज्यावेळी ते विमान सुमारे २० एक हजार फूटांवरून उडत होते त्यावेळी ते ४० हजार फूट उंची दाखवत होते त्यामुळे त्यापेक्षा अधिक उंचीवर जाणे मेजर पावर्सला 'शक्य नव्हते' व ते रशियन तोफांच्या हल्ल्याला बळी पडले. याचा रशियाने चांगलाच गाजावाजा करून जगाची सहानुभूती मिळवून अमेरिकेला बदनाम करण्याची सुवर्णसंधी साधली व बड्या राष्ट्रात होणारी शिखर परिषद उधळून लावली.

वाहतूक ही दुसरी महत्वाची कामगिरी. आग्रा विमानतळावर हल्ला चढविण्या मागे पाकचा उद्देश आपल्या वाहतूक पथकाला लुळे-पांगळे करण्याचा होता. 'ए. एन्. १२ 'सारखी वाहतूक विमाने, सैन्य, दारूगोळा व अन्नधान्य वगैरेची वाहतूक करतात तर 'पॅकेट 'सारखी अजस्त्र विमाने आपल्या पोटातून रणगाड्यांचीही वाहतूक करू शकतात.

डाकोटासारख्या जुन्या विमानाला विमान दलातील बॉइज (वैमानिक व हवाई सैनिक) कौतुकाने बुलककार्ट म्हणतात. पण हे बैलगाडीप्रमाणे चालणारे विमानही वाहतूकीची महत्त्वाची कामगिरी बजावत असते.'

एअरबोर्न विभाग तातडीने सैन्य पोचविण्याची कामगिरी पार पाडतो. ४७ साली काश्मीरमध्ये आपण विमानदलाच्या साहाय्यानेच सैन्य तेथे तात्काळ उतरवले होते. व्हिएतनाम, कोरिया वगैरे युद्धात पॅराट्रूप्स उतरवणे किंवा हेलिकॉप्टर्स मधून सैन्य उतरविणे ही जबाबदारी एअरबोर्न विभागाकडेच होती. परवा जेसोर व ढाक्क्याकडे भारतानेही कॉप्टर्समधूनच सैन्य उतरवले. लढाईतील जखमी सैनिकांना त्वरेने लष्करी रुग्णालयाकडे पोचविण्यासाठीही याचा उपयोग होतो.

दुसऱ्या महायुद्धात हिटलरने दोस्त राष्ट्रांच्या पिछाडीला विमानांतून डमी पॅराट्रूप्स उतरवल्या. पण जर्मनीचे 'प्रचंड सैन्य' आपल्या पिछाडीला उतरत आहे या विचाराने दोस्त राष्ट्रांचे धाबे दणाणले. त्या मनुष्याकृती बाहुल्या असल्याचे प्रथम त्यांना कळलेच नाही.

व्ही. टी. ओ. एल. हा विमानाचा एक नवा प्रकार अमेरिका, ब्रिटनमध्ये

उदयास आला आहे. त्याचे यशस्वी उड्डाण–प्रयोगही झाले आहेत. हे हवाई युद्धातील एक क्रांतिकारक पर्वच आहे. थोडया जागेत उड्डाण करणे वा उतरणे यामुळे शक्य झाले आहे. (व्ही. टी. ओ. एल्. चा अर्थ आहे व्हर्टीकल शॉर्ट टेक ऑफ अँण्ड लँडिंग– हेलिकॉप्टर पण याच प्रकारात मोडते.) अतिशय शक्तिशाली अशा एकाच जेट इंजिनाच्या आधारावर ब्रिटनने हे साध्य केले आहे. या लढाऊ विमानाच्या शोधामुळे, तात्काळ कामगिरीवर जाणे आणि तेही थोडया जागेचा उपयोग करून शक्य झाले आहे. भारताला हिमालयात उंचावरील छोटया विमानतळांवरून कामगिरीवर जाण्यासाठी अशीच विमाने चांगली व महत्वपूर्ण ठरू शकतील.

एकूण सर्वसाधारणपणे हवाई शक्ती ही अशी आहे. आता भारत-पाकच्या हवाई दलांकडे वळायला हरकत नाही. पाकिस्तानने, अमेरिकी, फ्रान्स, चीन आदिकडून विमाने मिळविली आहेत. चीनने भेट दिलेले इल्युशन एच्. २८ या जातीच्या विमानांचे एक पथक, दोन कॅनबेरा पथके, २४ मिराज–फ्रान्सची (याच विमानांचा इस्त्रायलने उत्कृष्ट वापर केल्याने ती जगविख्यात ठरली पण पाकने सेबर जेट्स्-प्रमाणेच 'मिराज' विमाने मृगजळाप्रमाणे ठरविली.) एफ. १०४, बी. ५२ बाँबर्स वगैरे त्यात येतात. पाकने त्यांचा उपयोग प्रामुख्याने जमिनीवरील हल्ल्या करताच केला.

आपल्या नॅट विमानांना या बडया विमानांवर कुरघोडी करता आली त्याचे कारण ती छोटी असल्याने पटकन हालचाली करू शकतात आणि शत्रूच्या विमानांच्या उरावर बसू शकतात.

मिराज विमाने ४२०० किलो वजनाचा दारूगोळा घेऊन जाऊ शकतात. लांब पल्ला गाठण्यासाठी त्यांना इंधनाच्या राखीव टाक्या असतात. व त्याचा वापर होताच त्या टाक्या फेकून देता येतात व वजन हलके करता येते. आपल्या एम्. आय्. जी २१ लाही तशी व्यवस्था आहे.

हंटर हे विमान फायटर–बॉम्बवर असा डबलरोल करू शकते. आणि ब्रिटिश वारशामुळे भारत-पाककडे ही विमाने आहेत. ही फारच महत्त्वाची कामगिरी बजावू शकतात.

लढाऊ विमानाला असलेल्या मोठया तोफांचे (कॅनॉन) महत्त्व खूप असते. त्यांची आग ओकण्याची शक्ती व वेग आणि अचूक मारा करणारा वैमानिक यांच्यावर हल्ल्याचे यश अवलंबून असते. पाकच्या एम्. आय्. जी. १९ ला ३० मिलिमिटरच्या तोफा आहेत पण पाक त्यांचा उपयोग करण्यात अयशस्वी ठरला. आपल्या सर्व प्रकारच्या विमानात रॉकेट्स नेण्याची सोय आहे.

आपले एम्. आय. जी–२१ हे कोणत्याही हवेत तग धरू शकणारे लढाऊ विमान आहे पण ते जमिनीवरील हल्ल्यातही चांगले ठरले आहे. मिगला ३० मि. मि. च्या

पृष्ठ ६४ वर

# याह्याखानचा उलटलेला जुगार

लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग

भारतावर आक्रमण करून पाकिस्तानने राजकीयदृष्टचा धोकेबाज जुगार खेळू पाहिला आहे. कारण लष्करीदृष्टचा अनेक गोष्टी या देशाच्या विरुद्धच होत्या. जनरल याह्याखानने राजकारणात केलेली चूक समजू शकते, पण या युद्धशास्त्र-निपुण हुकुमशहाने लष्करी चूक करणं पटत नाही.

पश्चिम पाकिस्तानातील जवळजवळ सर्व राखीव सैन्य, केवळ लष्करी पोषाखात आणि त्यात मावतील तेवढीच शस्त्रे ठेवून, बांगला देशमध्ये पाठवन याह्याखानने मोठीच घोडचूक केली. (लाहोरमध्ये इंडियन एअर लाईन्सचे पळविलेले विमान स्फोटात उद्ध्वस्त झाल्यानंतर भारताने पूर्व–पश्चिम पाकिस्तानची सरळ विमान-वाहतूक बंद केली, त्यामुळे सैन्य कोलंबोवरून पाठवावे लागत होते. आणि सिलोनने लष्करी वाहतूक करणारी विमानं आपल्या विमानतळावर उतरू देण्यास बंदी घातली होती.)

पाकिस्तानचे बहुसंख्य सैन्य डाक्क्यास विमानाने आले, पण त्यांचे रणगाडे, तोफा, वाहतूकसाधने, दारुगोळा वगैरे गोष्टी बोटीने चितगाव बंदरात पोचले. या बंदरावरील कामगारांनी ही लष्करी साधने उतरविण्यास नकार दिला. त्यामुळे डाक्क्यातील सैन्य तीन आठवड्यांपर्यंत शस्त्रहीन होते. यानंतर पाकिस्तान शासनाने आपली माणसे पाठवून बोटी रिकाम्या केल्या. याशिवाय डाक्क्यातील सैन्य भारता-बरोबर युद्ध करण्याच्या तोडीचे नव्हते, ही गोष्ट वेगळीच.

मार्चअखेरीस बांगला देश संग्राम सुरू झाल्यानंतर एक महिन्यात पश्चिमेतून तीन डिव्हिजन सैन्य आले होते. या आधी एक डिव्हिजन होतीच. या सैन्याजवळ दोन लाईट रेजिमेंट (८० रणगाडे) व सेबरजेटचे दोन स्क्वाड्रन (२४ ते ३०

विमाने) होती. ईस्ट पाकिस्तान रायफल्स् व आर्म्ड् पोलीस मुजिबूर रहमान यांना येऊन मिळाल्यामुळे हे सैन्य अधिक कमकुवत झाले होते. बंगला देशमध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे, भारतीय सीमा सुरक्षित ठेवणे आणि मुक्तिवाहिनीशी मुकाबला करणे अशा तीन जबाबदाऱ्या सांभाळणे या सैन्याच्या कुवतीबाहेर होते.

पूर्वेत सैन्य पाठविल्यामुळे पश्चिमेत झालेली पोकळी भरून काढणे लगेच शक्य नव्हते. कारण आधुनिक शस्त्रांचे शिक्षण देऊन सैनिक तयार करायला वेळ लागतो. याशिवाय हवाई, सागरी अगर जमिनीवरील मार्गाने या दोन विभागांत संपर्क ठेवणे कठीण होऊन बसले होते.

याउलट, भारतीय भूदल व हवाई दलास दोन्ही सीमांपर्यंत दळणवळण करण सुलभ होते. खेरीज, नौदलास देशाच्या सबंध सागरी सीमेवर मुक्तपणे संचार करता येत होता. पाकिस्तानला याबाबतही अडचणी होत्या, कारण या देशाकडे फक्त कराची व चित्तगाव हे दोनच नाविक तळ आहेत.

या सर्व गोष्टींमुळे पाकिस्तानला दोन्ही भागांत स्वतंत्रपणे हालचाली कराव्या लागत होत्या. एकमेकांना मदत करणे दोघांनाही शक्य नव्हते. लष्करीदृष्टचा ही अत्यंत गंभीर बाब. म्हणूनच याह्याखानने पश्चिम सीमेवर भारताला छेडले ही गोष्ट त्याच्या जुगाराचा अखेरचा फासा ठरावा.

पश्चिमेत असे छेडण्यामागे याह्याखानाचे तीन उद्देश होते. पहिले म्हणजे आपल्या सैन्याला, विशेषतः राखीव तुकड्यांना, पश्चिमेत गुंतवून ठेवणे. त्यामुळे पूर्वेत सैन्य कमी पडून बंगला देशमध्ये तातडीच्या हालचाली करणे भारताला कठीण जाईल असा त्याचा होरा होता.

दुसरा उद्देश आपल्या सैन्याला चिथवून पंजाबच्या प्रशिक्षित आणि सुसज्ज सैन्याशी लढायला भाग पाडून आपली ताकद कमी करणे. यामुळे पश्चिम सीमेवरचे आपले वर्चस्व कमी होईल असा त्याचा अंदाज होता.

तिसरे म्हणजे बंगला देश समस्येचे आंतरराष्ट्रीयकरण करून यूनोला हस्तक्षेप करायला व भारताने या भागातील सैन्य हुसकून लावायच्या आत युद्धबंदी करायला भाग पाडणे. कारण पूर्व बंगाल पाकिस्तानमध्ये ठेवण्यासाठी तेवढा एकच मार्ग उरला होता.

पण आतापर्यंतच्या घटना पाहाता, याह्याखानाचा एकही हेतू सफल झालेला नाही. पश्चिम सीमेवर आपले सैन्य राहिले असते, मग तिकडे युद्ध असो वा नसो, पाकने छेडले असो वा नसो, या आघाडीवरील आपले राखीव दल अजूनही जय्यत तयारीत, सुरक्षित आहे. याबाबत काहीही करायला यूनो असमर्थ ठरली आहे.

म्हणजेच, याह्याखानच्या जुगारातील अंतिम फासा फसला आहे. बंगला देश-मध्ये मुक्तिवाहिनीला संपूर्ण मदत देण्यास भारताला त्यामुळे नैतिक बळ मात्र

पृष्ठ ६० वर

नलिनी अंबाडे

# कोणीहि यावे, हजेरी लावूनि जावे !

लहानपणी आम्ही मुलीमुली लपंडाव, झिम्मा खेळत असू. एकीचे डोळे झाकले जात. ती डोळे झाकणारी मुलगी म्हणायची 'कोणीही यावे, टिकली मारूनी जावे ! कोणीही यावे, टिकली मारूनी जावे'. मग कुणीतरी एकजण पुढे होणार, त्या आंधळ्या मुलीच्या कपाळावर एक टिचकी मारून जाणार. पुढे त्या मुलीने ओळखायचे की कुणी टिचकी मारली ? ओळखले, की त्या मुलीवर राज्य येणार ! हे सारे मला आठवते. केव्हा ? जेव्हा जेव्हा वर्तमानपत्रात, वाचकांच्या पत्रव्यवहारात किंवा जनमनाच्या कानोशात मी शाळामास्तरांच्या तक्रारींच्या सुरसकथा वाचते तेव्हा.

'शाळा मास्तरांच्या बदल्या' विषयावर निबंध लिहिण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवसुद्धा बदली मागेल. 'कुणीही यावे, टिकलीं मारूनी जावे प्रमाणे 'शामा'च्या बदलीची टिचकी कुणीही मारावी. त्याला कारण काहीही पुरते. स्थानिक राजकारण, जिल्हा-राजकारण, प्रांतीय पक्षोपक्ष, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, यांपैकी काहीही एक पुरे. जिल्हा-परिषदेच्या ऑफिसात हेलपाटे घाला, वशिले लावा, 'च्यापानी' करा, तेव्हा कुठे तुमच्या अर्जाचा विचार होण्याची आशा. नवराबायको एकाच गावी ठेवावेत, अशा सरकारच्या सूचना. पण असे भाग्यवान जोडपे हजारात एखादेच. एखाद्या मास्तराची थोडीफार शेती असलीच तर त्याला गावी नौकरी कधीही मिळणारच नाही. एखाद्याला संध्याकाळच्या कॉलेजांत जावून जर बी. ए. व्हावयाचे आहे तर त्याची बदली नेमकी (आणि कधीकधी मुद्दामहूनही) दूर कुचपाडीतील खेड्यात होणार. अविवाहीत मुलींनी राजीनामे द्यावेत, कारण.. कारण... ते न लिहिलेलेच बरे !

खाजगी शाळांमधील मास्तर लोकांचा दुसरा यक्षप्रश्न म्हणजे पगार ! पावतीच्या तिकिटावर सही करायची, पण शेजारचा आकडा पाहायचा नाही. हो, मग हातांत पडणाऱ्या प्रत्यक्ष रकमेची अन् त्या आकड्याची वजाबाकी करण्याचा मोह होणार. वजा करून निघणारी 'बाकी' कुणाकुणाच्या खिशांत जाणार ते तुम्हाला ठाऊक असतेच. तोंड उघडाल तर, मार्चमध्ये परीक्षा संपताच तुमच्या हातांत 'प्रेमपत्र' मिळणार ! उन्हाळ्याच्या सुट्टीत मग संबंधीतांच्या हातापाया पडलात

तरच जूनमध्ये नव्याने नेमणूक मिळणार! अशाप्रकारे शाळा तीन तीन महिन्यांचे पगार 'वाचवितात'! अलिकडे शाळांमध्ये मुलांना प्रवेश देतानाही 'कॅपिटेशन फी' ह्या सोज्वळ नावाखाली पैसे उकळळले जात आहेत. जी परिस्थिती 'शामा'ची तीच थोडीफार हायस्कूल टीचर्सची आणि जवळजवळ तशीच कॉलेज प्रोफेसरांची! जे महाराष्ट्रांत, तेच युपीमध्ये आणि बिहारमध्ये. घरोघर मातीच्याच चुली. कुणीही यावे आणि 'शामा'च्या भवितव्यावर टिचकी मारून जावे ... निदान आपल्याकडे तरी!

पण आज तरी, अख्ख्या भारतातील 'शामा' मंडळींनी हेवा करावी अशी सुस्थीती केरळी 'शामा'ची आहे. हायस्कूल टीचर्सही नंतर सुदैवी ठरले व राहाता राहिलेले कॉलिज-प्रोफेसर्स-लेक्चर्सदेखील, नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवडयात 'लकी' ठरले – केव्हा? जवळ जवळ अडीच महिन्यांचा प्रांतव्यापी संप करून!

आज केरळामधील सर्व 'शामा' हे सरकारी कर्मचारी समजले जातात. त्यांना वर्षातून अडीच महिन्यांच्या पगारी-सुट्टया + ५२ रविवार + १६ सरकारी सुट्टया + ३० दिवसांची हक्काची रजा + १२ दिवसाची किरकोळ रजा, शिवाय प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, औषधपाणी बिले, घरभाडे या सर्व सवलती आहेत. थांबा, डोळे विस्फारू नका. सर्व 'शामां'ना पेन्शन मिळणार आहे. मग तो 'शामा' सरकारी शाळेतील असो किंवा एखाद्या खाजगी देवळात भरणाऱ्या दोन तुकडयांच्या शाळेतील असो. केरळमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण फुकट आहेच, पण मधल्यावेळेस भाताचे जेवणही मिळते. मिशनऱ्यांच्या शाळामधे अधिक–त्यांमध्ये पावडरीचे दूध मिळते. अशा सर्व शाळांमधील शिक्षक सरकारी कर्मचारी झाल्यामुळे, त्यांना पगार ठीक वेळेवर व डायरेक्ट सरकारी ट्रेझरीतून मिळतो. ही सारी नंबुद्रीपाद मुख्यमंत्री (कम्युनिस्ट) असतातांची सुधारणा – ह्यामुळे, बरेचसे फायदे-तोटे – तोटेच अधिक – होत आहेत.

फायदे असे की, पगार घेताना 'सही एकावर, हातावर कमी' ही परिस्थिती संपली. 'शामां'ना दरमहा वेळेवर पगार मिळू लागले. प्रांतातील सर्व शाळांतील सर्व मास्तरांचे एकच स्केल झाले. शाळाशाळांतून कमीजास्त पगार दिसेनासे झाले. वार्षिक परिक्षा संपताच मास्तरांना घरी बसवून, जूनमध्ये पुन्हा नव्याने नेमणुका हे तंत्र संपले. मास्तरांना प्रांतीय कारकुनाइतकी पगारश्रेणी म्हणजे ९५ ते १८०, शिवाय मध्यवर्ती सरकारी महागाई भत्ता व घरभाडे, कायम झाले. आता तोटे पहा. सरकारी तिजोरीवर बेसुमार ताण पडला. हेडमास्तर नामधारी झाला. मास्तरांनी कसे वागावे, काहीही शिकवावे, पण हेडमास्तराला काहीही अधिकार नाही. मास्तराला एक तारखेस ट्रेझरीत पगार मिळणारच. त्यामुळे शाळांमधील शिस्त कमी कमी होवून, सरकारी अधिकारी, शिक्षणखाते व त्यांच्या गोतावळयाचे वर्चस्व वाढले. पूर्वी सरकार वर्षातून दोनदा शाळांना एकमुठी ग्रॅन्ट देई व शाळा

शाळामास्तरांना पगार देई. त्यामध्ये थोडीफार काटकसर करून ग्रंथालये, पटांगण, फर्निचर, अशा बाबींवर खर्च करता येत असे. नव्या पद्धतीने हे बंद झाले. इमारत पडू लागली तर तीला डागडुजी करायची कुणी ? ग्रंथालयांत पुस्तके कुणी आणायची व पैसा कुठला ? कारण सरकारतर्फे मिळणारी ग्रॅन्ट अतिशय तोकडी पडू लागली. 'मास्तर' लोकांमध्ये हळूहळू 'आठ तास पाटया टाका' वृत्ती बळावू लागली. उद्या वर्गामध्ये जे शिकवायचे आहे, त्याची आज तयारी करून जाण्याची महत्वाकांक्षा संपली. DEO (डिस्ट्रिक्ट एज्यू. ऑफिसर) खऱ्या अर्थाने 'देव' बनला. त्याला वा त्याच्या ऑफिसातील कारकुनांना 'हातांत' ठेवले की पुरे !

आज केरळामधील अत्युच्च साक्षरतेचे श्रेय मिशनऱ्यांना आहे, कारण त्यांच्याच शाळा व कॉलेजे अधिक. धर्मप्रचार करणे हे तर अलिखित ध्येय असे. दुसरा क्रमांक 'नायर्स' जमातीच्या संस्थांचा, ३ रा मुस्लीम संस्थांचा —इतके दिवस ह्या संस्था म्हणत की 'मास्तरांना सरकारातून डायरेक्ट पगार मिळू देत. पण कुणाला नेमायचा हे तर आमच्या हातात आहे'—पण कालच्या संपामुळे आता ते देखिल नाहीसे झाले आहे. सरकारने सांगितले की, मास्तरांची नेमणूक करण्याचा अधिकार सरकारकडे असेल, त्याच शाळांचे पगाराची जबाबदारी सरकार घेईल. संपामध्ये मास्तरांच्या युनियन्सचा (कम्युनिस्ट प्रणीत) जय झाला. राहता राहिली कॉलेजे. तर त्यांनीही म्हणजे सर्व खाजगी कॉलेजांनी सप्टेंबरचे २ ऱ्या आठवड्यात संप केला. तो नोव्हेंबर अखेरीस मागे घेण्यात आला. दोन महिन्याचा मुलांचा अभ्यास बुडाला, सहामाही परीक्षा बारगळल्या, नोव्हेंबरच्या ३ तारखेपासून माध्यमिक शाळा व प्राथमिक शाळातील विद्यार्थी व शिक्षकांनीही संप ('सहानुभूती दर्शक') केला व केरळामधील संपूर्ण शिक्षणव्यवस्था विस्कळीत झाली अन् खिळखिळी झाली.

मागील निवडणुकांमध्ये प्राथमिक-शाळा मास्तरांना 'सरकारी नोकर' करून घेवून, मुलांकडून दोन महिने मतदारांच्या याद्या लिहवून घेतल्या व कम्युनिस्टांनी निवडणुका जिंकल्या. पण पुढे माध्यमिक शाळांच्या मास्तरांनाही 'डायरेक्ट पेमेंट' मान्य करावे लागले. एक चूक केली की, ती झाकण्यास दुसरी करावी लागते म्हणतात. त्याचप्रमाणे आज केरळाला कॉलेज-प्रोफेसर्सची 'डायरेक्ट पेमेंट' मागणी मान्य करावी लागली. सरकारचे म्हणणे असे होते की, कॉलेजांच्या पगारामुळे तिजोरीवर दरसाल ३ कोटीचा बोझा पडणार आहे. ५ नोव्हेंबर रोजी केरळ सरकारच्या तिजोरीत पावणेपंचवीस कोटींचा घाटा व २१ कोटींचा रिझर्वबँकेचा ओव्हरड्राफ्ट होता. तरीही सरकारचा आग्रह होता की, नेमणुकांचा अधिकार सरकारला हवा आहे, तरच डायरेक्ट पेमेंट मान्य करू आणि नेमके तेच खाजगी कॉलेजांना, शिक्षण संस्थाना नको होते व अद्यापही नको आहे. त्याची करणे सर्व वर दिल्याप्रमाणेच !

आज केरळात प्राथमिक 'शामा' नौकरीसाठी २॥ ते ३ हजार रु. 'सोडावे'

लागतात. हायस्कूल टिचरच्या जागेसाठी जागेसाठी ४ व कॉलेजातील नौकरीसाठी पाच हजार ! ह्यातील काहीभाग देणगी म्हणून जमा होती काही संबधितांच्या खिशात जातो. शाळा मास्तरांची नेमणूक करते व सरकारला कळवते. पण सरकारला नेमणुकीचाही अधिकार हवा होता व त्यामुळेच कालचा संप घडवून आणलेला होता. हा आग्रह कशासाठी ? सरकार म्हणते की, पब्लिक सर्व्हिस कमीशनच्या परीक्षामधून निवडून उमेदवार घेवू व त्यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावेल. खरी भिती अशी आहे की, ४९% जागा मागासलेल्या व हरिजनांसाठी ठेवलेल्या असल्याने व पात्रता नसतानाही त्यांना नेमणुका मिळतात त्यामुळे शिक्षणाचा दर्जा पुरता घसरेल. आज आपल्याकडेही काही खेडयात ' आरं भाडया, बामनावानी बानातला ' न ' म्हन् म्हणणारे ' गुरुजी ' आहेत. नेमणुकांचा अधिकार हवा ह्या आग्रहातील सूप्त इच्छा अशी असावी की, आज नेमणुकीसाठी जे काही हजार ' सोडावे ' लागतात, तो ओघ शिक्षणसंस्थांकडून सरकारी अधिकाऱ्यांकडे व त्यांच्या माणसाकडे यावा. त्याचप्रमाणे ' आपल्या ' लोकांची भरती हा दुसरा हेतू. गेल्यावर्षी केरळ ट्रान्सपोर्ट खात्याने ' भरलेले ' १२०० ड्राव्हर्स कंडक्टर्स, दुसरे मंत्रीमंडळ येताच, काढून टाकले गेले.

एकच विचारार्ह्य मुद्दा मुख्यमंत्री अच्युत मेनन यांनी परवा बोलून दाखविला. घटनेच्या ३० व्या कलमानुसार ' अल्पसंख्याक ' ह्या नावाखाली, मिशनरी व मुस्लिम लीगवाले आपापल्या शाळामधून धर्मप्रचार, धार्मिक शिक्षण देतात, पण सरकार काहीही करू शकत नाही. मेनन म्हणतात घटनेत दुरुस्ती केली पाहिजे व सर्वांना समान नियम हवेत.

घटनेत दुरुस्ती होईल तेव्हा होवो. आज तरी केरळातील सर्व शिक्षक मंडळीना भरपूर पगार, कायम नौकरी, पेन्शन, चांगली रजा ह्यामुळे ' सोन्याचे दिन ' वाटत असल्यास नवल नाही. शिक्षणाचे स्टॅण्डर्ड घसरत आहे, त्यात राजकारण कालविले जात आहे, नक्षलवाद फोफावत आहे आणि शाळकरी मुलेच नक्षलवादी बनत चालली आहेत. पण पर्वा आहे कुणाला ? संपकाळात शवटी शेवटी एके दिवशी त्रिवेंद्रममधील अकौंटंट जनरलच्या ऑफिसात आग लागली व नेमके शिक्षकांचे प्राव्हिडंट फंडाचेच रेकार्ड जळून नाहीसे झाले ! ह्या घटना काय दर्शवतात ! आता मास्तरांवरचे कंट्रोल संपले. कुणीही जावे अन् हजेरी लावून यावे, एक तारखेला पूर्ण पगार हातात ! मुले देखिल तेच करतील. कुणीही यावे, हजेरी लावून जावे !

□ □ □

वरून आज शांत दिसणारा
आरे गवळी वाडा
आतून खदखदत आहे.
ही किरकोळ भाववाढीची चळवळ समजून
त्याकडे दुर्लक्ष करण्यात फार मोठा धोका आहे.
शासन अजून उदासीन आहे.....

प्रतिनिधी

# आरे गवळी वाडा

वरळी आणि आरे या दोन सरकारी दुग्ध वसाहतींतून मुंबईतील बहुसंख्य लोकांना रोजचा दूधपुरवठा होतो. मुंबईतील गर्दी आणि शहरात तबेले ठेवले तर त्यामुळे होणारा त्रास यांचा विचार करता व मुंबई शहराचे आरोग्य, स्वच्छता चांगली राखण्याकरिता अशा प्रकारचे तबेले शहराबाहेर नेणे आवश्यक होते. आणि याच विचाराने १९४७–४८ साली सरकारने शहरापासून जवळ जवळ २० मैल दूर असलेल्या आरे येथे ते तबेले हलविण्याचे ठरविले. त्यासाठी आवश्यक असणारी तीन हजार एकर जमीन सरकारने खरेदी करून, २ कोटी रुपये खर्च करून ३० गोठे–तबेले–बांधले.

सर्वसाधारणपणे लोकांचा असा समज आहे, की आरे गौळीवाड्यातील म्हशी या सरकारी मालकीच्या असून अत्यंत आधुनिक पद्धतीने तेथे दूध उत्पादन चालते. पण तसे काही नाही. तर जेव्हा हा गौळीवाडा बांधला गेला त्यावेळी मुंबई शहरातील गवळ्यांना आपापल्या म्हैशी घेऊन तेथे जाण्यास सांगण्यात आले. आपले चांगले बसलेले बस्तान उठवायला प्रथम गवळी तयार नव्हते, पण त्यांना नोटिसा देण्यात आल्या. तसेच त्यांना दुसरी पर्यायी जागा नसल्याने तेथे जावेच लागले. याबद्दल प्रत्येक म्हशीमागे १३ रुपये ५० पैसे भाडे आकारण्यात येते. गवळ्यांनी आपल्या मालकीच्या म्हशी तेथे ठेवायच्या व त्यांचे दूध सरकार ठरवील त्या भावाने सरकारलाच विकायचे अशी त्यांच्यावर सक्ती आहे.

आरे गौळीवाडा अस्तित्वात आल्यामुळे काही फायदे झाले. तेथील गोठ्यांची परिस्थिती व व्यवस्था मुंबई शहरातील गोठ्यांपेक्षा अनेक पटीने चांगली होती.

गोठ्यांना जागाही पुरेशी होती. मोफत सरकारी व्यवस्थेने जनावरांबद्दलचा वैद्यकीय सल्ला, म्हशींच्या कृत्रिम गर्भधारणेची व्यवस्था वगैरे सोयी तेथे उपलब्ध झाल्या होत्या.

हे जरी असले तरी तेथे म्हशी ठेवण्याबद्दलचे भाडे, वीज व पाणी यांचे भाडे प्रत्येक म्हशीमागे ३ रु. ५ पैसे व इतर काही गोष्टींसाठी एका करारावर (५२ अटी असलेल्या) तेथे गेलेल्या गवळ्यांना सही करावी लागली. तेथील ३० गोठ्यां-पैकी २९ गोठ्यांत प्रत्येकी सुमारे ५५० ते ६०० म्हशी असलेल्या २१९ गवळ्यांना या करारावर सही करावी लागली. (आज आरे गौळीवाड्यात सुमारे १६ हजार म्हशी आहेत.)

या करारातील अटी गवळ्यांना जाचक वाटू लागल्या. कारण यांपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास दहा दिवसांची नोटीस देऊन परवाना रद्द करण्याचा अधिकार सरकारकडे आहे. म्हशींची संख्या ठराविक प्रमाणात राहिली पाहिजे, त्यातही दुभत्या म्हशींचे प्रमाण ठराविकच हवे, दर म्हशीमागे दुधाचे उत्पादन ६·२ लिटर्स असायलाच हवे वगैरेंचा त्या अटींत समावेश आहे. पण गवळ्यांना सर्वांत जाचक वाटणारी अट म्हणजे सरकार ठरवील त्याच भावाने सर्व दूध सरकारलाच विकणे ही होय.

सध्या आरे गौळीवाडा येथील दूध उत्पादक गवळी आणि सरकार यांच्यात काही प्रश्नांवरून तणाव निर्माण झाला आहे. इतके दिवस गवळी संघटित नव्हते. पण काही महिन्यांपूर्वी काही प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले आणि त्यातूनच त्यांची संघटना (आरे मिल्क प्रोडयूसर्स असोसिएशन) स्थापन झाली. असोसिएशनचे सरचिटणीस श्री. र. गो. करमरकर यांची भेट घेऊन त्यांच्या प्रश्नांची बाजू समजावून घेतली.

मुबलक, स्वस्त व स्वच्छ दूध ही मुंबई शहराची गरज. पण श्री. करमरकर यांचे म्हणणे असे, की आरे कॉलनी फक्त स्वच्छ दूध देऊ शकली व शकते. भरपूर व स्वस्त दूध मिळण्याचे उद्दिष्ट दूरच राहिले आहे. शिवाय आरे कॉलनीच्या व्यवस्थापकांचे व सरकारचे दूध–उत्पादनापेक्षा दूध–वाटपावरच जास्त लक्ष आहे. त्यामुळे वरील अडचणी आहेत तशाच आहेत.

गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरात एक फार मोठा प्रश्न निर्माण झाला. कर्जफेड व दुधाच्या किंमतीच्या फरकापोटी साप्ताहिक दुधाच्या बिलातून सरकार वजा करून घेत असलेली रक्कम यामुळे गवळी मेटाकुटीस आले. काही गवळ्यांच्या म्हशी उपासमारीने मेल्या. अनेक म्हशी त्या मार्गावर होत्या. बहुतेक सर्व गवळी कर्ज-बाजारी अवस्थेत होते. हाती दुधाचा पैसा नाही म्हणून तबेल्यात काम करणाऱ्या कामगारांना गेल्या आठ दहा महिन्यांत पगारही देता आलेले नाहीत. श्री. करमरकर

पृष्ठ ५६ वर



# इंदिरा गांधींची एक अज्ञात बाजू

दादूमिया

'वेलकम, प्लीज जॉईन अस इन द बॉल'...इंदिरा गांधी अमेरिकेस गेल्या होत्या त्यावेळी त्यांना विनंती करण्यात आली होती. संथ व शांत पाश्चिमात्य संगीताच्या लयीवर सारी जोडपी नाच करण्यात मग्न होती. इंदिरा गांधी आल्या आहेत असे म्हटल्यावर त्यांचा समाधीभंग झाला. उत्सुकतेने व आतुरतेने ती मंडळी इंदिरा गांधी आता काय करणार याकडे बघू लागली.

इंदिरा गांधींनी दोन्ही हात जोडून प्रणाम केला. नाचाच्या आमंत्रणास नकार देत त्या शांतपणे म्हणाल्या, 'घरी माझ्या लोकांना माझे तसे वागणे पसंत पडणार नाही, मला क्षमा करा.'

इंदिरा गांधींचा मी चरित्र लेखक असलो तरी त्यांच्या राजकारणाचा विरोधी

असल्यामुळे मी वरील प्रसंगास चांगला 'पब्लिसिटी स्टंट' यापेक्षा जास्त किंमत दिली नाही. चरित्र लेखक या नात्याने बाईंच्या जीवनातील नानाविध चित्रविचित्र घटनांचा मी सूक्ष्मपणे अभ्यास केला होता. सेक्युलर म्हणवून घेणाऱ्या या बाईंच्या जीवनातील काही अनुभवांनी मला स्तिमित केले होते. नवऱ्याच्या स्वास्थ्यासाठी पूजापाठ करणारी, पित्यासाठी सत्यनारायणाची पूजा नियमितपणे करवून घेणारी व पुत्रांच्या सदाचारासाठी नवस करणारी ही आर्य स्त्री तिच्या राजकीय विरोधकां-प्रमाणे मला नेहमीच 'गूढ' वाटत आली आहे. या स्त्रीच्या बडोद्याच्या निवडणू-कीच्या दौऱ्यात मला असाच अजब अनुभव आला होता. लोकांनाही ही नव-काँग्रेसची पुढारी आहे का जनसंघाची असा संशय तिच्या वर्तनावरून येऊ लागला. 'अरे, मी हिंदूंची शत्रू नाही', असे तिने म्हणताच पुन्हा विरोधकास तो पब्लिसिटी स्टंट वाटला. राजकीय पुढारी नाट्यासाठी प्रसिद्ध असतात. हेही नाट्य आहे असे जनतेस वाटले तर त्यात अस्वाभाविक आहे असे नाही.

इंदिरा गांधींनी ह्या चरीत्रकारास सर्वांत गोंधळवून टाकले ते त्यांच्या कन्या-कुमारीच्या लहानग्या वास्तव्यात. त्यांची तेथील वागणूक त्यांच्या विरोधकांनी उभ्या केलेल्या 'इमेज'शी एवढी विसंगत होती, की माझ्यासारख्या त्यांच्या राज-कीय टीकाकारास 'इंदिरा, दाऊ टू?' असे विचारण्याचा मोह आवरेना.

सर्वांत पहिला धक्का म्हणजे इंदिरा गांधी कन्याकुमारीस आल्या त्याचा होता. काही उच्च कक्षेच्या पुढाऱ्यांनी मला अधिकारवाणीने सांगितले होते, की साम्य-वादी, मुस्लीम व तरुण तुर्क मंडळींनी इंदिरा गांधी कन्याकुमारीस जाऊ नयेत यासाठी फार जोराचा आग्रह धरला होता. इंदिरा गांधींच्या ऐवजी पं. नेहरू असते तर ते निश्चितपणे कन्याकुमारीस गेले नसते असेही त्यांच्या मनावर ठसविण्यात आले होते.

विवेकानंद रॉक मेमोरियलच्या मागे एकनाथजी रानडे आहेत व ते जुने संघाचे स्वयंसेवक आहेत आणि आजही त्यांनी संघाशी व जनसंघाशी घनिष्ठ संबंध राख-लेले आहेत हे इंदिरा गांधींना काय ठाऊक नव्हते? पण एकनाथजींचे आमंत्रण स्वीकारून ह्या पवित्र स्थळी जाण्यास भारतासारख्या राष्ट्राच्या सेक्युलर पंत-प्रधानांना फार मोठ्या धाडसाची गरज होती हे नक्की आणि हे धाडस इंदिरा-जींनी खुषीने स्वीकारले.

दुसरा धक्का बसला तो इंदिराबाई तेथील मंदिराच्या मंडपात चक्क अनवाणी फिरत होत्या. हे दृश्य पाहून अगदी सहजपणे व निःसंकोचपणे पंतप्रधान खुद्द अन-वाणी हिंडत आहेत हे दृश्य पाहिल्यावर सारे पोलीस अधिकारी व सरकारी स्नॉब्ज् मुकाट्याने बाईंच्या मागून अनवाणी चालू लागले. असे दुर्मिळ दृश्य पाहण्यास खरो-खर फार मोठे भाग्य लागते!

त्या १५ सप्टेंबर १९७० रोजी रात्री कन्याकुमारीस पोचल्या. दुसऱ्या दिवशी

सकाळी आठ वाजता त्यांनी प्रसिद्ध कन्याकुमारीचे दर्शन घेतले. एकनाथजींनी तेथून बाईंना विवेकानंद शिलेवरील मंदिराकडे नेले. रामकृष्ण मिशनचे स्वामी रंगनाथानंद त्यांच्याबरोबर होते.

इंदिरा गांधी तेथे अर्धा तास होत्या. श्रीपाद मंडपम्, सभा मंडपम् व ध्यान मंडपम् येथे त्या फिरल्या. विवेकानंदाच्या चरणी बाईंनी फुलांची अंजली वाहिली. मंडपात प्रदक्षिणा घालीत असता एकनाथजी रानडेंयांनी आम्ही हे सारे कार्य का व कशासाठी करीत आहोत याविषयी तपशीलवार माहिती सांगितली.

भारताच्या दक्षिणतम टोकाच्या पुढे एका लहानशा बेटावर विवेकानंदाचे स्मृती मंदिर आहे. तेथील समुद्र ओलांडण्यासाठी लहान नौका ठेवल्या आहेत. बाई अर्थातच नौदलाच्या हेलिकॉप्टरने समुद्र ओलांडून आल्या होत्या.

कन्याकुमारीच्या मंदिराशेजारी विवेकानंदांच्या जीवनकार्याची माहिती देणारे एक प्रदर्शन आहे. कलकत्त्याच्या गोस्वामी या कलाकाराने या संग्रहालयात फार सुंदर चित्रे काढली आहेत. पंतप्रधान या संग्रहालयात सुमारे अर्धा तास मोठ्या आस्थेने तेथील चित्रे पाहात होत्या.

कन्याकुमारीचे दर्शन, विवेकानंदांचे चित्रसंग्रहालय पाहून बाईंच्यांत काय एकदम बदल झाला ते कळले नाही पण त्या झपाट्याने कोणाशीही काहीही न बोलता तेथील विवेकानंद स्मारक समितीने त्यांचा सन्मान करण्यासाठी उभारलेल्या उंच व्यासपीठावर सरळ गेल्या. स्वामी रंगनाथानंद त्या प्रसंगी अध्यक्षस्थानी होते. एकनाथजी 'मास्टर ऑफ द सेरेमनी' या नात्याने अभिमानाने तेथे वावरत होते. अध्यक्षांनी भाषण संपविताच बाई ताडकन् उठून भारलेल्या अवस्थेत माईकसमोर आल्या. प्रथम त्यांनी काय भाषण करायचे ते ठरवून ते कागदावर लिहूनही आणले होते. पण तेथील पवित्र व निसर्गरम्य वास्तूचा त्यांच्या मनावर काय परिणाम झाला ते कळले नाही. त्यांनी तो कागद बाजूला ठेवला व उत्स्फूर्त बोलण्यास सुरुवात केली.

बाईंच्या भाषणाने सर्वांना तिसरा धक्का बसला. 'स्वतःच्या शरीराच्या राखेस गंगेत टाका,' अशी विनंती करणाऱ्या पं. नेहरूंची ही सुकन्या अध्यात्मवादावर बोलू लागताच लोकांना कळेना की आपण कोणाचे भाषण ऐकतो आहोत?

विवेकानंदांच्या शिकवणूकीची, त्यांनी ते शब्द उच्चारले त्यावेळेपेक्षाही, आज जास्त गरज आहे असे बाईंनी सुरुवातीलाच सांगून टाकले. 'या देशात आर्थिक दारिद्र्य तर आहेच आहे पण त्याचबरोबर येथे आज लोकांत अध्यात्मिक दारिद्र्य फार आले आहे. आर्थिक उन्नती जरूर झाली पाहिजे. पण त्याबरोबर व्यक्तीस अध्यात्मिक संपत्तीचीही जरूर असते ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे व त्या दोघांच्यांत सांगड घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज प्रत्येक व्यक्ती श्रीमंत होत चालली आहे पण ती श्रीमंती केवळ जडवादी आहे. साम्यवाद काय किंवा

भांडवलशाही काय, दोघांचाही सारा भार या जडवादी उन्नतीवर आहे. म्हणून ह्या दोन्ही वादांना माणसाच्या मनातील खोल असलेल्या आवश्यकतांना पुरे पाडण्याचे सामथ्य आलेले नाही, त्या दृष्टीने हे दोन्ही वाद आज अपयशी ठरलेले आहेत.'

बाई पुढे म्हणाल्या, 'आजचा आधुनिक माणूस सुखाच्या शोधात आहे. त्यासाठी सर्व मार्ग सोपे कसे होतील या विचारात तो मग्न आहे. पण तो ते मार्ग जेवढे सोपे करू पाहातो तेवढा तो जास्त जास्त दरिद्री होत जातो. मला असे वाटते, की या दोघांना जोडणारा एक आणखी मार्ग आहे. आपला भारत देश तो मार्ग जगास दाखवेल.'

भारतात व साऱ्या जगभर तरुण वर्गात फार मोठी खळबळ चालली आहे त्याचा उल्लेख करून इंदिरा गांधी म्हणाल्या, 'आजचे तरुण जुन्या मूल्यांचे दोष काढीत आहेत. त्यांचे बरोबर आहे. ते असे का वागतात? ही मूल्ये जगात कमी झाली आहेत म्हणून नाही तर जुन्या पिढीतील आम्ही लोकांनी त्या आदर्शाप्रमाणे वर्तन केले नाही म्हणून! आणि म्हणून हे तरुण काही निराळा मार्ग शोधू पहात आहेत. आम्हा जुन्या पिढीस त्यांच्या नव्या मार्गांपैकी काही मार्ग बिलकुल पसंत नाहीत. पण ह्या Trial and Error च्या प्रायोगिक मार्गपद्धतीतून जर काही चांगली नवीन मूल्ये उदयास आली तर या अस्वस्थतेस काही एक सिद्धी प्राप्त होऊ शकेल.'

व्यासपीठावर बसलेल्या व समारंभाच्या अध्यक्षस्थानी विराजमान झालेल्या स्वामी रंगनाथानंदजींच्या एका विधानास हरकत घेऊन त्यांनी लोकांना चौथा झटका दिला. इंदिरा गांधी म्हणाल्या, 'आमच्या पिढीने राजकारण म्हणजे व्यक्तीगत निंदानालस्ती व वैयक्तिक स्वार्थ असा अर्थ करून घेतला आहे. राजकारण वाईट नाही. पण राजकारणास आम्ही जी कलाटणी दिली आहे ती निश्चित भयानक आहे. खरे म्हणजे राजकारण ही आम जनतेची–साऱ्या जनतेची आर्थिक व अध्यात्मिक विकास साधावा यासाठी केलेली एक उपयोगी चळवळ आहे. त्यास नैतिक बळाची जरूर असते.'

स्वामी विवेकानंदांचेच वचन उद्धृत करीत इंदिरा गांधी म्हणाल्या, 'जर आपण सर्वांच्या सामुदायिक सुखाचा विचार करू लागलो व प्रत्यक्ष कार्यास सुरुवात केली तर वैयक्तिक सुख व विकास यांची आपणास काळजी करण्यास नको. ते आपोआप व्यक्तीव्यक्तीस प्राप्त होईलच.'

त्यानंतर बाई त्रिवेंद्रमला गेल्या. जाण्याआधी विवेकानंद समितीच्या 'व्हिजिटर्स बुक'मध्ये त्यांनी खालील संदेश लिहला.

'कन्याकुमारीस येऊन हजारो लोकांच्या मनातील स्वामी विवेकानंदांच्या शिकवणुकीतील श्रद्धेच्या बळावर हे स्मारक कसे उभे राहिले आहे ते पाहिले, की मन कसे भरून येते! येथे येणाऱ्यांना ते स्फूर्तिदायक ठरो व स्वामिजींच्या थोर व अमर शिकवणुकीप्रमाणे धैर्याने जीवन कंठण्यास ते त्यांना उद्युक्त करो. या कार्यक्रमांतील लोकोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थेच्या उभारणीचा दुसरा भाग माझ्या

मते जास्त महत्वाचा आहे. स्वामिजींच्या सेवाभावाच्या संदेशाचे ते व्यावहारिक रूप म्हणून निरंतर उपयोगी ठरेल.'

बाईंच्या या संदेशाच्या उत्तरार्धाने जाणत्यांना पाचवा धक्का बसतो.

ख्रिस्ती मिशनऱ्यांचे जाळे साऱ्या देशभर भारतास ग्रासून टाकीत आहे. त्यांना परदेशी मदत कोटींच्या घरांत मिळत असते. त्या मिषाने काही हेरांना या देशात उघडपणे वावरणे सोपे जाते.

त्यांच्याविरुद्ध, नव्हे त्यांच्यावर कडी करेल असे लोकोपयोगी सेवाकार्य करणारे हजारो हिंदू तरुण मिशनरी येथे तयार होणार आहेत. ते देशभक्तीने भारलेले असतील. देव, धर्म व देश यांच्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची तयारी असेल. बाईंना हे सारे ठाऊक आहे. आणि तरीही बाई हे फार महत्वाचे कार्य आहे असे म्हणण्याचे धाडस या सेक्युलर देशात करतात ? याचा अर्थ, बाई मिशनऱ्यांच्या बापालाही भीत नाहीत.

भारताचे दर्शन घेण्यासाठी माझ्या ओळखीचे एक अमेरिकन जोडपे भारतात आले होते. त्यांच्याशी नेहमीच्या 'जातीयवाद' या विषयावर मी चर्चा करीत होतो. इंदिरा गांधी जोपर्यंत आहेत तोपर्यंत हिंदू राष्ट्र होत नाही, तसेच अल्पसंख्यांकांना धास्ती नाही वगैरे ठराविक मते ते प्रदर्शित करीत होते. इंदिरेच्या कन्याकुमारीच्या व विवेकानंद स्मारकाच्या भेटीचा वृत्तांत मी त्यांना सांगितला व विचारले, 'भारतात जातीयवाद आहे कोठे ? ज्यास जातीयवाद म्हणतात तो तर विरोधकांना दडपण्यासाठी सत्ताधीशांनी टाकलेला एक राजकीय डाव आहे, स्ट्रॅटेजी आहे. अदरवाईज ऑल आर हिंदूज हीअर. इव्हन मुस्लीम्स् आर हिंदूज् इन मुस्लीम ड्रेस !'

त्यांना ते पटले. भिंतीवर असलेल्या इंदिरा गांधींच्या फोटोकडे बोट दाखवून ती अमेरिकन बाई म्हणाली, Yes, all are Hindus here. Especially all women. You scratch a Hindus woman and you find spiritualism at the bottom. And what is Hinduism, afterall ? All spitirualism ?'

अजून मी तोच विचार करीत असतो. हिंदुत्व म्हणजे अध्यात्मवाद ! जगात अध्यात्म सांगणारा दुसरा देशच कुठे आहे ?

इंदिरा गांधींनी कन्याकुमारीस जे सत्य सहजगत्या सांगून टाकले त्याचा विचार आम्ही राष्ट्रवादी केव्हा करणार ? विवेकानंदांना स्मरून सुसंघटित, सबळ, सशस्त्र व सुसंपन्न होऊन आम्ही जगास मार्गदर्शन केव्हा करणार ?

□ □ □

ट्रॅक्टर आणि बॉयलर

चंद्रशेखर

# उत्पादनवाढीची काही पथ्ये

भारत-पाकिस्तान संघर्षाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण, अमेरिका व जपान यांनी आर्थिक मदत बंद केल्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती व चालू असलेल्या विकास योजना पूर्ण करण्याची आर्थिक गरज या तीन कारणांमुळे यापुढील काळात आपले उत्पादन वाढविण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. प्रधानमंत्री व राज्याचे मुख्यमंत्री यांनी जनतेला उत्पादन वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले व औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख घटकांनी उत्पादन वाढीचा निर्धार जाहीर केला, ही गोष्ट स्वागतार्ह आहे.

या संदर्भात मागील वर्षात आपल्या औद्योगिक उत्पादनाची परिस्थिती कशी होती हे पाहणे उपयुक्त ठरेल. संसदीय सल्लागार समितीच्या सदस्यांना सादर केलेल्या एका टिपणानुसार केंद्र सरकारचा अंदाज असा आहे, की १९७१-१९७२ या वर्षात औद्योगिक उत्पादनवाढीची शक्यता 'सर्वसाधारणपणे चांगली' (जनरली बेटर) राहील. औद्योगिक उत्पादनवाढीमध्ये कापसाचा व पोलादाचा तुटवडा ही एक प्रमुख अडचण आहे. हे टिपणात नमूद केले आहे. या संपूर्ण वर्षात पोलादाच्या टंचाईचा इंजिनिअरिंग धंद्यावर अनिष्ट परिणाम झाला. राऊरकेला येथील कारखान्यात बिघाड निर्माण झाल्याने परिस्थिती अधिक वाईट बनली. यावर मात करावी म्हणून पोलाद आयात करण्याचे परवाने सढळपणे देण्यात आले पण परदेशातून पोलादपुरवठा विलंबाने होत असल्याने त्रास होत आहे. येत्या काही महिन्यांत औद्योगिक उत्पादन वाढ पोलादाच्या टंचाईमुळे कुंठित होईल अशी शक्यता निर्माण झाली आहे.

सदर टिपणातील अंदाज खरा ठरत असून १९७१-७२ या वर्षांच्या पहिल्या नऊमाहीत उत्पादन वाढ नजरेत भरण्याजोगी झालेली नाही. उत्पादन वाढीचा वेग मंदावण्याची प्रक्रिया १९७०-७१ सालीच आढळून आली होती. १९६९-७० मध्ये औद्योगिक उत्पादन ७ टक्क्यांनी वाढले होते तर १९७०-७१ मध्ये ते केवळ

३.७ टक्क्यांनी वाढू शकले. या घटीचे प्रमुख कारण म्हणजे पोलाद व कापड यांच्या उत्पादनात झालेली घट होय. पोलादाचे उत्पादन घटल्याने त्यावर अवलंबून असलेल्या अनेक धंद्यांमध्ये उत्पादन घटले. तसेच औद्योगिक अशांतता व संप हेही या परिस्थितीस बरेच जबाबदार आहेत. मागणीमध्ये एकदम घट झाल्यानेही काही विशिष्ट उत्पादन करणाऱ्या उद्योगांत घट आली. पॉवर-ड्रिव्हन पंपस् व रेल्वे वॅगन या उत्पादनातही परिस्थिती दिसून आली. १९७०-७१ मध्ये मूळ धातूंचे उत्पादन १.३ टक्क्यांनी घटले, वाहतुक सामग्रीचे उत्पादन ३.९ टक्क्यांनी घटले व पोलादाचे उत्पादन २० टक्क्यांहून अधिक घटले.

गतवर्षापेक्षा औद्योगिक उत्पादन ३.७ टक्क्यांनीच वाढले पण बँकांनी दिलेली कर्जे मात्र याच काळात ५६३ कोटी रुपयांनी—सुमारे १३ टक्क्यांनी—वाढली याचा उलगडा होणे कठीण आहे. बँका औद्योगिक उत्पादनासाठी कर्जे देतात. उत्पादनातील वाढीच्या प्रमाणातच त्यांच्या कर्जात वाढ व्हावयास पाहिजे असे असतां दर वर्षी उत्पादनाची परिस्थिती काहीही असो, बँकांची कर्जे मात्र वाढतच राहातात या परिस्थितीचा विचार सरकारने अधिक खोलवर करावयास हवा, असे सुचवावेसे वाटते. औद्योगिक मालाच्या किमती बहुश: नियंत्रित असतात. तेव्हा किमती वाढल्यामुळे जास्त कर्जव्यवहार होतो असे म्हणण्यास वाव नाही. औद्योगिक मालाच्या घाऊक किमतींचा निर्देशांक वर्षभराच्या काळात विशेष वाढ दाखवीत नाही. तेव्हा, आहे त्याच किमतीच्या तेवढ्याच मालाची उलाढाल करण्याकरता बँकांची कर्जे वाढत्या प्रमाणावर का लागतात याचा शोध घेतल्यास सरकारच्या आर्थिक धोरणास नवीच दिशा सापडेल.

आज सरकारची विविध खाती आपापल्यापुरता विचार करतात व तेवढीच आकडेवारी जमा करतात. बँकांनी दिलेली कर्जे वाढली, की रिझर्व्ह बँक असे जाहीर करते की बँकांची प्रगती होत आहे. इकडे औद्योगिक खाते उत्पादन वाढीचे प्रमाण घटले म्हणून जाहीर करीत असते. या दोहोत संबंध आहे किंवा असावयास पाहिजे याचा काही विचार केला जात नाही. त्यामुळे आर्थिक धोरण सूत्रहीन होऊन किमती, बेकारी व गरिबी वाढत रहाते.

बँकांची कर्जे उत्पादनवाढीसाठीच वापरली जात आहेत, की अन्य काही कामासाठी वापरली जात आहेत अशी शंका वरील विसंगतीवरून येते. बँका आता सरकारी अखत्यारीत आहेत. तेव्हा त्यांच्यामार्फत औद्योगिक उलाढालींची माहिती सरकारला मिळविणे जड जाऊ नये व त्यानुसार उत्पादनवाढीसाठीच कर्जे उपलब्ध करणेही कठीण जाऊ नये. या दिशेनें हालचाल करून उद्योगांचे आर्थिक नियोजन केल्यावर मग या क्षेत्राच्या अन्य अडचणी सरकारला स्पष्टपणे दिसून येतील. कच्च्या मालाची टंचाई ही एक प्रमुख अडचण होय. याबाबतीत असे दिसते, की दुर्मिळ कच्चा माल सरकारी कोठयातून घेऊन तो परस्पर बाजारात विकावयाचा,

व एक उत्पादक उद्योग म्हणून बँकांकडून राजरोस कर्ज घेऊन या व्यवहारासाठी पैसा उभारावयाचा हा एक प्रमुख धंदा झाला आहे. यालाही आळा घातला पाहिजे. या उप्पर कच्च्या मालाची जी टंचाई राहील ती नवीन पर्यायांचे संशोधन करून दूर केल्याशिवाय आपले औद्योगिक उत्पादन भक्कम पायावर उभे राहणार नाही.

कच्च्या मालाची टंचाई ही उत्पादनवाढीतील प्रमुख अडचण असल्याने ती दूर करण्यावरच पुढील उत्पादनवाढ अवलंबून आहे. याबाबतीत असे दिसते, की प्रस्थापित उद्योगांचे हितसंबंध कच्च्या मालाची टंचाई कायम ठेवण्यात गुंतलेले आहेत. जितकी टंचाई अधिक तितकी वशिल्याने फायदा काढण्याची संधी अधिक हा आपल्या कारखानदारांचा दृष्टिकोन आहे. त्याला सरकारी यंत्रणा शंभर टक्के साहाय्यभूत होत आहे हे दुर्दैव होय. व्यक्तिगत व कौटुंबिक हितसंबंधांनी बुजबुजलेल्या औद्योगिक क्षेत्राला कमीत कमी श्रमात व गुंतवणुकीत जास्तीत जास्त फायदा काढण्याची जन्मजात खोड लागल्याने त्याच्याकरवी संशोधन व त्याचा औद्योगिक उपयोग करण्याची धडाडी दिसून येत नाही. अमेरिका वगैरे राष्ट्रांचे औद्योगिक सहकार्य व मदत बंद झाल्यास काय करायचे याचा विचारही या क्षेत्रातील प्रस्थापितांनी कधी केलेला नाही. अशा परिस्थितीत उत्पादनात भरीव वाढ होईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

त्यासाठी सरकारला एक नवा दृष्टिकोन घेऊन, उपलब्ध आर्थिक आकडेवारीचे नव्याने व संकलित समालोचन करून या क्षेत्राला अनुकूल वळण लावण्यासाठी अनेक पावले टाकावी लागतील आणि मुख्य म्हणजे उत्पादनवाढीच्या मोहिमेत काही उद्योगसमूहांचीच भरभराट होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे लागेल. संरक्षण उत्पादन म्हणून किंवा अत्यावश्यक उत्पादन म्हणून सरकारने ज्या सवलती दिल्या त्याचा फायदा घेऊन काही उद्योगांनी आपली मक्तेदारी बळकट केली व आपली अर्थसत्ता वाढवली असा आजवरचा अनुभव आहे.

मागील दशकात स्वीकारलेल्या 'मिश्र अर्थव्यवस्थे'पासून आपण गेल्या दोन वर्षांत बरेच दूर आलेलो आहोत. १९६९ साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करून या बाबतीत एक महत्त्वाचे पाऊल टाकलेही आहे. बँकांवरील नियंत्रणाचा उपयोग उद्योगक्षेत्रास वळण लावण्यासाठी यापुढे करावयास पाहिजे. भांडवलदारी उद्योगाची बनिया मिरासदारी मोडण्यास सुरुवात केली पाहिजे. याशिवाय उत्पादनवाढीच्या खऱ्या प्रक्रियेस सुरुवात होणार नाही हे एक, आणि दुसरे म्हणजे हे न केल्यास उत्पादनवाढ थोडीफार होईल पण गरिबी हटणार नाही.

शेती उत्पादनातील वाढ हाही सर्वंकष उत्पादनवाढीतील एक महत्त्वाचा घटक आहे. शेतीक्षेत्रात जे नवे वर्गीय ताण निर्माण होत आहेत त्यांचा शेतीउत्पादनवाढीशी काय व कसा संबंध आहे याचा विचार याच ठिकाणी पुढे केव्हातरी करू.

□ □ □

# हे आठशे कोटी रुपये प्रथम वसूल करा

पां. शं. माईणकर

भारताच्या ऑडिटर आणि कन्ट्रोलर जनरलने नुकत्याच सादर केलेल्या अहवालावर नजर फिरविली, तर वर वर त्यात 'गरीबी हटाव' कार्यक्रमाचा उदोउदो केलेला दिसतो. मात्र गरिबी हटविण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या पद्धतशीर प्रयत्नांचा अवलंब शासनातर्फे करण्यात आलेला नाही हेच विदारक सत्य आढळून येते.

भारतातील सध्याच्या प्राप्तीकर आकारणीचे आणि त्याच्या वसुलीच्या पद्धतीचे दोष जगजाहीर असले, तरी प्राप्तीकराच्या थकबाकीच्या रकमांचा वाढता आकार पाहून आश्चर्य मात्र वाटते.

एकतीस मार्च, १९७० रोजी भारतातील प्राप्तीकराची एकूण येणेबाकी रक्कम ८४१ कोटी रुपयांपर्यंत चढली आहे; यापैकी जवळ जवळ ५०० कोटी रुपये १९६०–६१ ते १९६८–६९ या कालावधीतील वसुलीपैकी आहेत. वास्तविक प्राप्तीकर अधिकाऱ्यांना, वसुलीबाबत इतके प्रभावी आणि अवाढव्य अधिकार १९६१ च्या कायद्याने देण्यात आलेले आहेत, की इतकी मोठी, रक्कम वर्षानुवर्षे वसूल न होता शिल्लक कशी राहू शकते हेच कळत नाही. एकतर प्राप्तीकर यंत्रणेमध्ये कमालीचे शैथिल्य खालपासून वरपर्यंत निर्माण झाल्यामुळे हे असे घडत असेल, नाही तर प्राप्तीकर चुकविणाऱ्यांना पाठिशी घालण्याचा खेळ या यंत्रणेमार्फत पद्धतशीरपणे खेळला जात असेल. या दोन पर्यायांशिवाय तिसरा कोणताच पर्याय या बाबतीत संभवत नाही.

भांडवलशाहीचा केवढा जबरदस्त पाश अद्यापही भारतीय लोकशाहीभोवती आवळलेला आहे, हे या आकड्यांकडे एकवार दृष्टिक्षेप टाकला तरी लक्षात येते. ८४१ कोटी रुपयांपैकी चारशे कोटी पेक्षाही थोडी जास्तच म्हणजे जवळजवळ निम्मी रक्कम केवळ पंधराशे बड्या बड्या लक्षाधिशांकडून वसूल व्हावयाची आहे. त्यातही आश्चर्य हे, की यापैकी काही नावे समाजवादाच्या गोंडस नावाखाली 'गरिबी हटाव'चा बुरखा घेऊन आणि सत्तारूढ कांग्रेसच्या

कळपात राहून पुन्हा नामानिराळी आहेत.

सिनेधंद्यातील कलावंतांना तर मुळी जमिनीवर चालण्याची आवश्यकताच नसते. एकूण १४४ सिने कलावंतांकडे असलेल्या प्राप्तीकर बाकीचा आकडाच २ कोटींवर पोचतो. यापैकी पुढील २२ कलावंतांकडे तर प्रत्येकी दोन लाखांपेक्षा जास्त बाकी गेल्या कित्येक वर्षांपासून पडून आहे —

| | | |
|---|---|---|
| १ | एम. जी. रामचंद्रन् | १४,९९,००० |
| २ | नसीरखान सखरखाते | ११,४५ ००० |
| ३ | राज कपूर | ९,३४,००० |
| ४ | किशोर कुमार | ८,२६.००० |
| ५ | एम्. आर. राधा | ७,७७,००० |
| ६ | दिलीप कुमार | ६,६८,००० |
| ७ | व्ही. सी. गणेशन् | ६,६४,००० |
| ८ | टोनी वॉकर | ६,५२,००० |
| ९ | बी. आर. पंथुलू | ६ ४०,००० |
| १० | एन्. एन्. सिप्पी | ४,९५,००० |
| ११ | प्रदीप कुमार | ४,५५.००० |
| १२ | ई. व्ही. सरोजा | ४,४८,००० |
| १३ | महमुद मुमताझ अली | ३,८२,००० |
| १४ | सायराबानू | ३,२९ ००० |
| १५ | राजकुमार कोहली | ३,२७,००० |
| १६ | शेख मुख्तार | ३,१८,००० |
| १७ | नूतन बहल | ३,१५,००० |
| १८ | पन्नालाल माहेश्वरी | ३,१५,००० |
| १९ | कमल अमरोही | ३,०६,००० |
| २० | दारा सिंग | ३,००,००० |
| २१ | जे. ओमप्रकाश | २,९४,००० |
| २२ | टी. आर. महालिंगम् | २,१५,००० |
| | एकूण | १,२३,०४,००० |

प्राप्तीकराचा खरा तडाखा आजपर्यंत बड्या भांडवलदारांना कधीच बसलेला नाही. यातून मार्ग काढत सहीसलामत निसटण्याचे अनेक प्रकारचे कायदेशीर आणि बेकायदेशीर मार्ग त्यांना अवगत आहेत आणि प्रत्यही नवेनवे मार्ग माहीत होत आहेत. परंतु यात खरा भरडला जात आहे तो प्रामाणिकपणे जीवन जगून आपल्या

पृष्ठ ३४ वर



# बुडव्या

तसा मी सहसा कुणाला पैसे उसने देण्याच्या फंदात पडत नाही. आपणहून स्वत:वर कोणतेही आर्थिक संकट ओढवून घ्यायचे नाही हा माझा खाक्या आहे. आपण भले आणि आपला मार्ग भला. कुणाचे घेणे नको आणि कुणाचे देणे नको. पण शेवटी माणसात राहायचे म्हटले, की व्यवहार टाळता येत नाही. माणसांना टाळता येत नाही. आपल्याला नको असलेली माणसे आपण टाळू शकत नाही व मग अकारण एखाद्या व्यवहारात अडकून आपण त्यातल्या त्यात गुरफटून जातो. स्वत:वर वैतागून जातो.

देसाई हा माणूसही अशांपैकीच एक. नंबर एकचा बुडव्या. आमच्या गल्लीत असे एकही घर नव्हते, की ज्या घरातून या बहाद्दराने पैसे घेतले नव्हते. काय वाटेल ते कारण सांगून हा पैसे काढायचा. तसा हा पठ्ठा घरी एकटाच होता. अगदी एकटा जीव सदाशिव. ना मागे कसले पाश, ना संसार. आमच्या पलीकडच्या गल्लीतच त्याची खोली होती. व्यवसाय काय तर नाममात्र वायरमन. पण हा व्यवसाय केवळ लोकांना सांगण्यापुरताच होता. त्याचा खरा व्यवसाय होता पैशाची

---

**वैजनाथ महाजन**

---

लफडी. तो कायम काही ना काहीतरी पैशाच्या उलाढाली करीत असायचा. अनेकांना अशी सवयच असते. असे काहीतरी करत राहिलो म्हणजे आपण सतत कार्यरत असतो अशी त्यांची भावना असते. देसाई ह्याच गटातील लोकांपैकी एक. पहाल तेव्हा कसल्या तरी लफड्यात आणि घाईत. रस्त्यावर भेटल्यावर कुणीतरी 'अहो देसाई' म्हणून हाक मारली तर 'आलोच' म्हणून हा दुसऱ्याच क्षणी कुठे-तरी अंतर्धान पावायचा. त्यातून त्याला आणि हाक मारणाऱ्याला गुंगारा द्यायचा असायचा. कारण त्याने त्याची फुल ना फुलाची पाकळी देणं असायचीच.

सकाळी एकदा खाकी पँट आणि खाकी बुशकोट अडकवून अस्ताव्यस्त केसासकट हा माणूस बाहेर पडला, की याने आपल्या पायाला काय चक्रे बांधली आहेत की काय असा संशय येईपर्यंत हा भटकत राहायचा. कारण नसताना इकडून तिकडे आणि तिकडून इकडे करायचा. गल्लीतून त्याच्या दहा-बारा फेऱ्या व्हायच्या. बहु-तेकांशी याचे पैशांचे काही ना काहीतरी वायदे असायचे. हा नुसता लोकांच्या तोंडाला पाने पुसत हिंडायचा.

अशा ह्या माणसाच्या तावडीत मी मात्र अजूनपर्यंत सापडलेलो नव्हतो. तशी त्याची आणि माझी ओळख होती, पण अद्याप त्याने कधी माझ्याकडे पैसे मागितले नव्हते. मागितले तरी आपण याला मुळीच पैसे द्यायचे नाहीत, असा मी मनाचा पक्का निश्चय केलेला होता.

एके दिवशी संध्याकाळी मी बाजारातून फेरफटका मारून गल्लीत शिरत असताना हा एकदम दत्त म्हणून पुढे उभा राहिला. मी प्रसंग ओळखला. पैसे मागितल्यावर काय कारण सांगून हल्ला परतवून लावायचा याचा मी मनातल्या मनात हिशोब जुळवू लागलो. आपला चेहरा त्याने विलक्षण केविलवाणा केलेला होता. पाहणाऱ्याला एकदम अनुकंपा वाटावी इतपत केविलवाणा होता. पण मला त्याचे सारे फार्स ठाऊक होते. अशाने मी विरघळणार नव्हतो. पण त्याने माझ्यापुढे निराळाच पेच निर्माण केला. आपल्या मनगटातील घड्याळ काढून त्याने माझ्यापुढे धरले आणि म्हणाला –

"माझ्या अब्रूचा प्रश्न आहे. एवढं घड्याळ ठेवून घ्या पण आत्ता शंभर रुपये द्या. दोन दिवसांत मी घड्याळ सोडवून नेतो. नाही म्हणू नका. घड्याळ कुणाचं दुसऱ्याचं नाही, माझं स्वतःचं आहे. आत्तापुरती एवढी माझी गरज करा. तुमच्या-कडं आत्तापर्यंत कधी पैसे मागायची पाळी आली नव्हती, पण आज अगदी नाईलाज झालाय. काय करू? एवढी गरज कराच. हे घ्या घड्याळ."

मला क्षणभर काही सुचेना. पैसे देण्या-घेण्याचे प्रसंग माझ्या आयुष्यात फार थोडे आले होते त्यामुळे, आणि अशी वस्तू गहाण ठेवून घेण्याची तर ही आयुष्या-तील पहिलीच वेळ होती. मला ते कसेतरीच वाटू लागले. ते घड्याळ ठेवून घेण्यास मन धजावेना. पुन्हा एक क्षणभर विचार केला व निर्णय घेतला. त्याचे घड्याळ

त्याच्या हातात देत त्याला म्हटले —
" देसाई हे तुमचे घड्याळ तुमच्याजवळच राहू दे. मी आत्ता तुम्हाला पैसे देतो. परत केव्हा देणार ते सांगा ? चार-आठ दिवस चढ सांगितले तरी मला त्याचे काही वाटणार नाही. पण सांगाल त्या दिवशी मला पैसे मिळाले पाहिजेत. मग तुम्ही एक महिना मुदत सांगितली तरी मला त्याचे काहीही वाटणार नाही. पण सांगाल तो दिवस पक्का पाहिजे. " मी माझी शिस्त सांगितली.
देसाईंनी थोडासा विचार केला. बहुतेक मनातल्या मनात थोडासा दिवसांचा हिशोब केला असावा. चेहऱ्यावर गांभीर्याचा आविर्भाव दिसत होता. मग देसाई बोलले —
" गुरुवारी संध्याकाळी घरी आणून तुमचे पैसे देतो. "
" ठीक आहे. काही हरकत नाही. पण गुरुवारी नक्की द्या हं ! " मी देसाईंना बजावले व घरी नेऊन त्यांना शंभर रुपये दिले. आज शनिवार होता.
दुसऱ्या दिवसापासून मी पुन्हा माझ्या ऑफीसच्या कामात मग्न होऊन गेलो. अधूनमधून रोज देसाईंची आणि शंभर रुपयांची आठवण होत होती. मध्यंतरी एकदा देसाई दिसले. नेहमीसारखे हसले व याउपर आपला काही संबंध नाही अशा चेहऱ्याने निघून गेले. मधूनमधून मला वाटत होते, की आपण ह्या माणसावर विश्वास टाकला आहे खरा पण हा माणूस दगा देतो की काय कुणास ठाऊक ? आणि याने दांडी दिली तर ? हा विचार डोक्यात आला आणि माझा मी स्वतः-वरच वैतागून गेलो. मला या शंभर रुपयांच्या निमित्ताने या माणसाची परीक्षाच घ्यायची होती.
गुरुवार आला आणि गेला. देसाई आला नाही. आता माझे मन त्या माणसा-साठी आदरार्थी बहुवचन वापरू शकत नव्हते. मला वैताग आला. या माणसावर विश्वास टाकून आपण फार मोठी चूक केली याची मनाला खात्री पटली. पण आता काय उपयोग होता ? शंभर रुपये वसूल करून घेण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.
दुसऱ्या दिवशी देसाई भेटला. चेहरा त्या दिवसा इतकाच केविलवाणा केला होता. आणखीन आठ दिवसाची मुदत मागून घेतली. मला तो पक्का निर्लज्ज वाटला. पुन्हा मला त्याच्याबरोबर अधिक बोलण्याची इच्छाच होईना. पुन्हा आठ दिवस देसाई कुठे बेपत्ता झाला. अधून मधून मला कधीतरी भेटणारा देसाई आता अजिबात दिसेनासा झाला. त्याला माझे पैसे बुडवायचे होते हे आता उघड दिसत होते. त्याने मला शंभर रुपयाला हातोहात फसविले होते. मी चक्क फसलो होतो. आजपर्यंत आपण पैशाच्या बाबतीत कुणाकडून फसविलो गेलो नाही हा माझा अहंगंड दुखावला गेला. देसाईबद्दल एक निराळ्याच प्रकारची चीड आता माझ्या मनात निर्माण झाली होती. तो माणूस आता डोळ्यापुढे नकोसा होऊ लागला होता.
ते आठ दिवसही गेले. देसाईला आता त्याचे काही वाटेनासे झाले. हे शंभर रुपयाचे कर्जही आता त्याला रुळल्यासारखे वाटू लागले असावे. आता देसाई वाटेत भेटला की ओंगळ हासू लागला. तो हसला, की माझ्या तळपायाची आग

मस्तकाशी पोचू लागली. रस्त्यातच त्याला चार ठेवून द्याव्यात असे वारंवार मनात येऊ लागले पण तेवढी माझ्या अंगात ताकद नव्हती व ते माझ्या इभ्रतीला शोभणारेही नव्हते. माझ्या मनात या माणसाबद्दल एक विलक्षण तेढ निर्माण झाली. मला त्याची किळस येऊ लागली.

आता तो निर्लज्ज माणूस माझ्या घरीही येऊ लागला. पण शंभर रुपयांच्या बाबतीत मी त्याला विचारायचेच सोडून दिले. या माणसाजवळ सद्सद्विवेकबुद्धी नावाची काही वस्तू असेल यावरचा माझा विश्वास उडाला. तोही आपणहून कधी शंभर रुपयाचा विषय काढीत नसे. इतर विषयांवर मात्र भरपूर गप्पा मारीत बसे. मला त्याचाच विलक्षण राग येऊ लागला. आपण ह्या माणसाचे शंभर रुपये देणे लागतो ही गोष्ट जणू त्याच्या गावीच नव्हती.

त्या दिवशी मी ऑफीसातून थोडासा वैतागून बाहेर पडलो होतो. ऑफिसात माझे साहेबांशी थोडेसे खटकले होते. अद्याप माझा तो त्रागा कमी झाला नव्हता. मी घरी येऊ लागलो तो वाटेतच देसाई भेटला. माझ्या मूडची त्याला कल्पना असायचे काहीच कारण नव्हते. नेहमीप्रमाणे ओंगळ हसून तो माझ्यावरोबर घरी येऊ लागला. मी एका शब्दानेही त्याच्याशी बोललो नाही. त्या निर्लज्जाने माझ्याबरोबर चहाही घेतला. त्याच्या त्या चहा घेण्याने माझा ऑफिसातील राग उफाळून आला. मी देसाईला धारेवरच धरला.

" चहा प्यायला लाज वाटायला पाहिजे होती ?"

" चहा प्यायला लाज कसली वाटायची त्यात ?" त्या निर्लज्जाने उसने हसू आणीत मला प्रतिप्रश्न केला.

" लाज कसली म्हणजे ? पैसे केव्हा देणार भडव्या ?" माझा तोल गेला.

त्यावर तो हसला. मी रागाने मुठी आवळू लागलो. पुन्हा तो नेहमीचे निर्लज्ज ओंगळ हास्य करीत म्हणाला,

" पैसे काय द्यायला येतील हो, पैशाचं काय एवढं..."

" जास्त बडबड करू नकोस. पैसे काढ " मी कडाडलो. तरीही तो हसला आणि माझ्या सहनशिलतेची मर्यादा संपली. पण दुसऱ्याच क्षणी मला सुखद आश्चर्याचा धक्का बसला. माझ्या जे स्वप्नातदेखील नव्हते ते प्रत्यक्षात घडले. देसाईने आपल्या खाकी पँटच्या खिशात हात घालून अगदी हळुवारपणे शंभराची जांभळी नोट काढली व साफ करीत तितक्याच हळुवारपणे टेबलावर ठेवली. ' घ्या ' म्हणून तेच हास्य करीत त्याने क्षणभर माझ्याकडे पाहिले व दुसऱ्याच क्षणी तो पाठ फिरवून चालू लागला. काय घडतंय हे मला नीट कळेना. पण आता माझा चेहरा पडला होता. विलक्षण पडला होता. मला शंभर रुपये परत मिळूनही काहीतरी खूप मोठे गमावल्यासारखे वाटत होते. बराच वेळ मी खिडकीतून दिसणाऱ्या देसाईच्या पाठमोऱ्या खाकी आकृतीकडे पाहात होतो. ◻ ◻ ◻

चंद्रशेखर मराठे

पुस्तके

# कानिटकरांच्या कादंबऱ्या

श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या एका कथेत एके ठिकाणी असे विधान आहे की 'कोणाचेतरी कोणाशी तरी लग्न ठरले हे कळल्यावर स्त्रियांना जो आनंद होतो तो तिच्या मुखावर दिसू लागला.' या विधानात थोडाफार बदल केला की लोक ललित साहित्य का वाचतात याचा उलगडा होतो. मला वाटते गाडगीळ यांनी उल्लेखिलेला आनंद केवळ स्त्रियांनाच होतो. असे नव्हे तर पुरुषांनाही होतो. मुलांनाही होतो आणि तो केवळ लग्नाच्या बातमीपुरताच मर्यादित नसतो. कोणाचे काय झाले हे जाणून घेण्याचा मनुष्यमात्राला छंदच आहे व ते काही तरी झालेले कळले की त्याला फार आनंद होतो.

वर्तमानपत्रापासून ते महाकाव्यापर्यंतच्या सर्वच साहित्यात माणसाचे हे कुतुहल पुरवले जाते. ते कशाप्रकारे पुरवले जाते, कोणत्या पातळीवर पुरवले जाते, मानवी जीवनाचे दर्शन किती तऱ्हांनी किती व किती सखोलपणे होते यावर त्या साहित्याचा दर्जा व स्वरूप ठरवले जाते. असे जरी असले तरी अलौकिक अशा कलाकृती शतकातून एक दोनदाच निर्माण होतात. याहून वेगळी अपेक्षा करणेही अव्यवहार्य आहे. पण दरम्यानच्या काळात माणसाचे कुतुहल पुरवण्याचे काम चालूच राहिले पाहिजे–'शो मस्ट गो ऑन' या धर्तीवर गोष्टी सांगितल्या गेल्याच पाहिजेत. कारण माणसाची ती एक गरज आहे.

ही गरज ओळखून ती पुरी करण्याचे काम करणाऱ्या विद्यमान साहित्यिकांमध्ये माझे मित्र श्री. माधव कानिटकर हे प्रमुख आहेत. त्यांची तीन मासिके आहेत व ललित वाङ्मय प्रकाशन करण्याचाही व्यवसाय आहे. या व्यवसायाचा दैनंदिन गाडा रेटतानांही कानिटकर गोष्टी 'सांगत' असतात. कथा व कादंबऱ्या यांच्या रुपांनी गोष्टी सांगण्याचे काम ते गेली २० वर्षे करीत आहेत, शेकडो कथा त्यांच्या खात्यावर जमा आहेत आणि त्याच्या कादंबऱ्यांची संख्या नुकतीच ५० च्या वर गेली. त्यांची ५१ वी कादंबरी या महिन्यात प्रसिद्ध होईल. ते स्वतः लिहीत असतानाच इतरही नव्या जुन्या लेखकांना लिहिण्यास प्रवृत्त करीत असतात व अशा प्रकारे त्यांनी अनेक लेखक, लेखिकांना पुढे आणले आहे.

त्यांच्या कादंबऱ्यांकडे पाहाताना हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की 'गोष्ट सांगणे' हा त्यांचा स्थायीभाव आहे आणि हे करण्यासाठी त्यांनी त्यांचा जीवन-व्यवसायही तोच निवडला आहे. मराठीतील बहुतेक लेखक इतर कोठे कोठे नोकऱ्या करून फावल्या वेळात साहित्यनिर्मिती करतात. पण कानिटकरांचे आपल्या छंदावर एवढे प्रेम आहे की तोच त्यांनी आपला व्यवसाय बनवला आहे. आनंदाची गोष्ट अशी की ते या कामात यशस्वी झाले आहेत. मासिके व प्रकाशन ही दोन्ही क्षेत्रे व्यावसायिक दृष्टचा यशस्वीरित्या हाताळून स्वतः सातत्याने लेखन करीत राहणे ही गोष्ट सामान्य नाही. या क्षेत्राविषयी एक दृढ आस्था असल्याशिवाय हे शक्य नव्हे.

## यशस्वी 'संसारचित्रे'

त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन करताना त्यांचे हे श्रेय लक्षात घेऊनच केले पाहिजे. त्यांच्या कादंबऱ्या व्यावसायिक दृष्टचा यशस्वी ठरतच आहेत. याविषयी दुसरा पुरावा नको. सर्वसामान्य वाचकांची गोष्ट ऐकण्याची भूक त्यांच्या कादंबऱ्या भागवीत आहेत. एवढेही यश थोडे नाही. या यशाचे स्वरूप काय हे पाहू जाता असे आढळून येते, की त्यांच्या कादंबऱ्या पूर्णपणे समकालीन स्वरूपाच्या (काँटेंपोररी) आहेत. सद्यकालीन मध्यम वर्गीय समाजाची लहान मोठी वैशिष्टचे, सुखदुःखे आणि आशाआकांक्षा यांचे प्रतिबिंब या कादंबऱ्यांत काहीशा 'घरगुती' स्वरूपात पडलेले दिसते. प्रेमाच्या अनेक तऱ्हा, लग्न जमण्यातील अडचणी, विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, सामान्य सांसारिक निष्ठा वा त्याचा अभाव हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विषय आहेत, या कादंबऱ्यांना एका अर्थाने 'संसारचित्रे' हे नावे देण्यास हरकत नाही.

ही 'संसारचित्रे' सामान्य वाचकांना जवळची वाटतात–त्यात ते रंगून जातात यात आश्चर्य नाही. आपल्या आयुष्याकडे आपल्याच दृष्टिकोनातून पाहणारे साहित्य म्हणून त्यांना कानिटकरांच्या कादंबऱ्या आवडतात. ही साधासुधी संसारचित्रे शब्दांच्या माध्यमातून साकार करताना कानिटकर अनेक तंत्रांचा वापर करतात. फ्लॅशबॅक, सरळ निवेदन, पात्रमुखी निवदेन, शॉट् टू शॉट् प्रसंगचित्रण किंवा गद्यकाव्यवजा छोटी छोटी स्वगते या साऱ्यांचा वापर ते खुबीने करतात.

निवडलेल्या कथाविषयाचा व पात्राचा आणि प्रसंगाचा बारीकसारीक तपशील ते परिश्रमपूर्वक देतात व आपल्या कथेत एक प्रकारची वास्तवता आणतात. त्यांची शैली अतिशय लवचिक असून प्रसंगानुरूप कोणतेही रूप धारण करते. उदाहरणार्थ 'माध्यान्हीची सावली' या त्यांच्या ५० व्या कादंबरीतील संन्याशाच्या विचारांचे वर्णन व हॉटेलात जमलेल्या उनाड तरुणांच्या गप्पा ही वर्णने वाचावीत, जरुरीप्रमाणे त्यांची शैली सोज्वळ, काव्यात्म, खट्याळ वा थोडीशी उत्तानही बनू शकते. 'एका संध्याकाळी' या नव्या कादंबरीतील काही वर्णने वाचल्यास याचा,

पडताळा येईल, 'कादंबरीमय महाभारत' मध्ये या शैलीचे एक निराळेच वजनदार रूप पहावयास मिळते.

वर उल्लेखिलेल्या त्यांच्या या वैशिष्ट्यांवरून 'आर्थर हेली' या विख्यात कादंबरीकाराशी तुलना करण्याचा मोह मला होतो. हेलीच्या 'हॉटेल' 'एअरपोर्ट' या सारख्या कादंबऱ्यांत मानवी जीवनाचा खास असा कोणताही व्यापक संदर्भ नसून छोट्या छोट्या प्रसंगातून त्या त्या ठिकाणचे वातावरण तंतोतंत उभारण्याचा एक यशस्वी प्रयत्न आहे. 'हॉटेल' या हेलीच्या कादंबरीत हॉटेलच्या विविध अंगाचे इतके तपशीलवार वर्णन आहे की वाचक चकित होतो.

कानिटकरांची कादंबरी अशीच आहे. वास्तव जीवनाची खरीखुरी व रंजक चित्रे त्यात आढळतात व अनेक वाचकांना गोष्ट ऐकल्याचे समाधान देतात. त्यांच्या कादंबऱ्यांची नावेही विलक्षण वेधक व काव्यात्मक असतात. 'रंगबावरी' 'जवळपणाचे झाले बंधन' 'माध्यान्हीची सावली' अशी नुसती नावे वाचूनच वाचकांना ही पुस्तके घेण्याचा मोह न झाला तरच नवल. साहित्यनिर्मिती व्यावसायिक पातळीवर यशस्वी करण्यामध्ये कानिटकरांचे हे चातुर्यच त्यांना उपयोगी पडत असावे.

त्यांनी अशाच वाचक-प्रिय गोष्टी सांगत रहावे व कादंबरीक्षेत्रात अधिकाधिक प्रयोग करीत रहावे अशी शुभेच्छा त्यांच्या ५० व्या कादंबरीनिमित्त त्याचे अभिष्टचिंतन करून मी व्यक्त करतो. व हे छोटेसे समीक्षण आवरते घेतो. ◻

**माध्यान्हीची सावली : माधव कानिटकर : प्रपंच प्रकाशन, पुणे ३० : मूल्य रु. ६.**

---

## हे आठशे कोटी रुपये प्रथम वसूल करा....

पृष्ठ २६ वरून

उत्पन्नाचा खरा आकडा दाखवून आणि त्यानुसार योग्य तो प्राप्तीकर वेळचेवेळी भरून कायद्याच्या चाकोरीत राहण्याचा सतत प्रयत्न करणारा मध्यम वर्ग. आजपर्यंत याच वर्गाला कोणी वाली नव्हता. यापुढेही हेच होणार काय? प्राप्तीकराची संपूर्ण रक्कम वर्षाच्या शेवटच्या महिन्यात एक रकमी वसूल करण्याचा रोखठोक हुकूम देणारा कायदा लक्षाधिशांकडून आणि कोट्याधिशांकडून थकबाकी रकमा वसूल करण्याच्या वेळेस यापुढेही झोपूनच राहणार काय? असे व्हायला नको आहे. कायदा जनतेसाठी आहे. संपूर्ण जनतेला दिलासा देण्यासाठी आहे. मूठभर भांडवलदारांना त्याने आपल्यामागे लपवायला नको.

आणि म्हणून गरिबी हटाव कार्यक्रमात जरूर आहे, ती आधी इकडे लक्ष देण्याची.

◻ ◻ ◻

# जनरल द गॉल



निवेदन

**अनंत भावे**

फ्रान्सच्या इतिहासात जोन ऑफ आर्क, नेपोलियन बोनापार्ट, क्लेमेन्को यांना जे स्थान आहे तेच स्थान इतिहासकारांनी फ्रान्सचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल द गॉलना देऊ केले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या अस्थिर काळात त्यांनी फ्रान्सला जागतिक राजकारणात वैशिष्टयपूर्ण स्थान मिळवून दिले. पहिल्या महायुद्धातही त्यांनी मोठा पराक्रम गाजवला होता. त्याची काहीशी झलक येथे सादर केलेल्या वृत्तांतावरून येईल. त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे जे गुणविशेष पुढे नजरेत भरले त्यांचेही दर्शन येथे घडेल. मूळ वृत्तांत श्री. डेव्हिड बर्क यांनी लिहिला असून 'ज्याला मारणे जर्मनांना शक्य झाले नाही असा द गॉल' असे अर्थपूर्ण शीर्षक या वृत्तांतासाठी त्यांनी योजले आहे.....

पहिले महायुद्ध ऐन भरात होते. फ्रेंच आघाडीवरील एका महत्त्वाच्या छोट्याशा जागेवर जर्मनांनी कडवा हल्ला चालवला होता. चौदाशे जर्मन तोफांची तोंडे या ठिकाणाकडे वळली होती. कॅप्टन चार्ल्स मारी द गॉल या फ्रेंच अधिकाऱ्याची नुकतीच या ठिकाणी नेमणूक झाली होती. या वेळी विभागाची पाहणी करत होता तो. इतक्यात कोठूनतरी एक पहारेकरी ओरडला 'कॅप्टनसाहेब, कुमक आली. पाहा कुमक आली.'

पहारेकरी दाखवत होता त्या बाजूला द गॉलने दृष्टी फेकली. खरोखरच काही सैनिक शिस्तीत पावले टाकत त्या दिशेनेच येत होते. अजून ते पुष्कळच दूर होते. शिवाय तोफगोळ्यांचा धूर सर्वत्र पसरलेला होता. तरी त्या सैनिकांचे फ्रेंच गणवेष, त्यांच्या मस्तकावरील पोलादी शिरस्त्राणे द गॉलने सहज ओळखली. तरीही काही-तरी चुकल्यासारखे वाटत राहिले त्याला. त्या सैनिकांनी बंदुका ज्या तऱ्हेने धरल्या होत्या, त्याची शंका आली द गॉलला.

सहा फूट चार इंच उंचीचा हा तरुण सेनाधिकारी त्या सैनिकांचे खरे स्वरूप समजताच ताडकन उभा राहिला आणि आपल्या सैनिकांना उद्देशून मोठ्याने ओरडला, 'ही कुमक नाही म्हणतो मी. हे तर फ्रेंच गणवेश चढवलेले जर्मन सैनिक आहेत. याचा अर्थ, सैनिकहो, आपली डावी बाजू उघडी पडली आहे. होणाऱ्या हल्ल्याला तोंड देण्याची सिद्धता करा.'

## दहाव्या पलटणीचा नेता

म्यूसे नदीच्या काठावर खोल खणलेल्या खंदकामधल्या पायऱ्या चढून दहाव्या पलटणीतील उरलेले ४३ सैनिक आणि त्यांचा हा तरूण अधिकारी खंदकाबाहेर आले. आघाडीवरचे हे ठिकाण, काय वाटेल ते करून, झुंजत ठेवण्याची जबाबदारी या मूठभर सैनिकांवर पडली होती. गेले कित्येक आठवडे जर्मन फौजांनी हे ठिकाण जिंकण्याचा निकराचा प्रयत्न केला होता; पण प्रत्येकवेळी त्यांना अपयशाने वाकुल्या दाखवल्या होत्या.

'संगिनी चढवा' द गॉलने आजूबाजूला पडणाऱ्या गोळ्यांची पर्वा न करता, हुकूम सोडला. 'हे ठिकाण पडता कामा नये.' अधिक तपशीलवार आज्ञा द्यायला सवडच नव्हती. द गॉलच्या तुकडीच्या मागे असलेल्या दोस्त पलटणींवर जर्मनांचा अचूक तोफमारा अविरत चाललेला होता. त्यामुळे त्यांना कसलीही हालचाल करता येत नव्हती. त्याचा फायदा घेऊन, क्षीण झालेल्या दहाव्या पलटणीवर, फ्रेंच गणवेष चढवलेले ते जर्मन सैनिक बेभान आरोळ्या ठोकत तुटून पडले.

पुढील दहा मिनिटे, प्रत्येकाची स्वतंत्र, वैयक्तिक लढाई चालली होती. गोळ्या सुटत होत्या. संगिनी तळपत होत्या. वातावरण बेभान, बेशिस्त झाले होते. खंदकातील चिखलात माणूस माणसाला भिडला होता. एकमेकांचे गळे दाबण्यासाठी, शस्त्रे हिसकण्यासाठी, धडपड चालली होती. त्यांच्यावरती दुसरे सैनिक कोसळत

होते. मित्रांची आणि शत्रूंची शरीरे बेभानपणे पायदळी तुडवली जात होती.

सारे थंडावले तेव्हा जर्मनांची ही पहिली लाट खंदकात गारद वा जखमी झाली होती. दहाव्या पलटणीला श्वास घेण्यासाठी फुरसत सापडली. सर्वत्र मलमूत्राची आणि प्रेतांची दुर्गंधी पसरली होती. पहिल्या महायुद्धाच्यावेळी खंदकामध्ये मुताऱ्यांची वगैरे ऐषारामी सोय नव्हती. परंतु दहाव्या पलटणीच्या जिद्दी सैनिकांना या गलिच्छ भोवतालाची सवय झाली होती. कारण युद्ध सुरू होऊन एकोणीस महिने होते झाले आणि येथे व्हर्डून आघाडीवर तर अक्षरशः अभूतपूर्व रणसंग्राम गेले कित्येक महिने चालला होता.

द. गॉल अवघा २२ वर्षांचा होता. युद्धात दोनदा जखमी झाला होता. दोनदा त्याला मानपदके मिळाली होती. यावेळी, छातीतील जखमा बऱ्या होऊन चालणे शक्य होताच दहाव्या पलटणीचा नेता म्हणून त्याची नेमणूक झाली होती. आदल्या रात्रीच पलटणीचा अखेरचा अधिकारी गारद झाला होता. परंतु म्यूसे नदी ओलांडून पॅरीसवर झडप घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या जर्मन फौजांकडून द गॉलला फुरसतीचा क्षण मिळणेदेखील दुरापास्त होते.

## ‘ते पुढे जाणार नाहीत’

आता जर्मन सेनेची दुसरी लाट दहाव्या पलटणीवर चालून येत होती. द गॉलकडे आता ३२ सैनिक बाकी होते. त्याने खंदकामधून एक बंदूक उचलली, आणि तिला संगीन चढवत हुकुम सोडला "आपण यावेळी विखरून प्रतिकार करू या. संगिनी चढवा आणि पाठीमागे या."

पाठीमागून कोणी येतो किंवा नाही हे नुसते वळून पाहण्याचीदेखील तसदी द गॉलने घेतली नाही. आशंकेचे कारणच नव्हते त्याला. दहाव्या पलटणीमधील सैनिक त्याच्यामागून, विनाप्रश्न, नरकातदेखील गेले असते. आपल्या लांब लांब तंगड्यांनी खंदकातील पायऱ्या चढून, संगीन बेदरकारपणे पुढे रोखून, द गॉल निश्चयाने, पुढे येणाऱ्या जर्मन सैनिकांकडे सरकू लागला. दहाव्या पलटणीतील फ्रेंच सैनिक आपण होऊन विखुरले आणि द गॉलच्या मागून चालू लागले. त्यांच्या मुखामध्ये, ‘ते पुढे जाणार नाहीत’ ही, पुढे इतिहासात व्हर्डून या नावाशी जडून गेलेली, युद्धघोषणा होती.

युद्धाची नशा चढलेल्या फ्रेंच सैनिकांना पाहून, पुढे येणारे जर्मन सैनिक थिजल्यासारखे झाले. या अनपेक्षित हल्ल्यामुळे जर्मनांचा सारा आवेश कोसळला. या चढाईत आपल्याला सहज विजय मिळेल अशी त्यांची कल्पना होती; परंतु आता त्यांच्यावरच प्राणसंकट कोसळले होते.

द गॉल अशाच संधीची वाट पाहात होता. जर्मन सैनिकांचे आश्चर्य पुरते ओसरण्याआधीच फ्रेंच सैनिक गोळ्या झाडीत, संगिनी रोखून त्यांच्यावर तुटून पडले. लोखंडी शिरस्त्राणांवर संगिनी आणि गोळ्या आपटून क्षणोक्षणी आवाज उठत

होते. हातघाईच्या धुमश्चक्रीत कडाकड हाडे मोडली जात होती. सगळीकडे नुसता आकांत माजला होता.

परंतु ही स्थिती फार काळ टिकणे शक्य नव्हते. जर्मन पायदळाच्या मागे उंचावर मोक्याच्या ठिकाणी लावलेल्या मशिनगन्समधून फ्रेंच सैनिकांवर आता अचूक मारा होऊ लागला. या माऱ्यामुळे फ्रेंच सैनिक पटापट मरू लागले. मशिनगनच्या काही गोळ्या द गॉलच्या उजव्या मांडीत घुसल्या. त्याची आगेकूच थांबली: त्याच्या देहाने दोन वेळा गिरकी घेतली आणि तो खाली चिखलात कोसळला. कोसळण्यापूर्वीच त्याची शुद्ध हरपली होती. लढाई आणखी काही मिनिटे चालली. त्यानंतर अवजड बुटांनी जनरल द गॉलचा बेशुद्ध देह येत्याजात्या सैनिकांकडून अभावितपणे तुडवला गेला.

## युद्धकैदी

बऱ्याच काळानंतर द गॉल शुद्धीवर आला. त्याला मोठे आश्चर्य वाटले. कारण सभोवती युद्धाच्या गदारोळाचा मागमूसदेखील नव्हता. त्याच्या कानावर कसला म्हणून आवाज पडत नव्हता. त्याचे शरीर ठणकत होते. बऱ्याच परिश्रमाने त्याने आपली नजर भोवताली फिरवली. मग त्याच्या ध्यानात आले, पांढऱ्याशुभ्र भिंती असलेल्या त्या खोलीत एका पांढऱ्याशुभ्र बिछान्यावर तो पडला होता. त्याच्या डाव्या पायावर शुभ्र आणि भले मोठे बँडेज गुंडाळलेले होते. आपल्याला काय झाले असावे याचा अंदाज त्याला आला. त्याने डोके वर उचलले आणि जवळच्या खिडकीतून बाहेर पाहिले. जवळच काही लाकडी झोपड्या होत्या. त्यांच्या पलीकडे तारांचे भक्कम कुंपण होते. जवळच एक लाकडी मनोरा होता. मनोऱ्याच्या अगदी वरच्या बाजूला एका तिकाटण्यावर मशिनगन ठेवली होती. तिच्या शेजारी तगडा जर्मन सैनिक उभा होता.

आपण युद्धकैद्यांच्या तुरुंगात आहोत. याबद्दल द गॉलच्या मनात आता शंका उरली नव्हती ही जाणीव होताच द गॉलचे तोंड कडू झाले. युद्धकैदी होण्याची शक्यता प्रत्येक सैनिक गृहीत धरतो तशी ती द गॉलनेदेखील गृहीत धरली होती. परंतु स्वभावतःच या गोष्टीचा त्याला अत्यंत तिटकारा होता. शुभ्र पोशाखातील एक परिचारिका त्याच्याजवळ आली. भावनाशून्य नजरेने द गॉलकडे पाहात ती म्हणाली, 'तुला जखम झाली आहे लढाईत. आता तू युद्धकैदी झाला आहेस.'

'ठीक आहे' द गॉल तुटकपणे म्हणाला. मान फिरवून परिचारिकेकडे त्याने पाहिलेदेखील नाही. बाहेरच्या त्या तारांच्या कुंपणावर त्याची नजर खिळली होती. त्याने केव्हाच पलायनाची योजना आखायला सुरुवात केली होती.

या पहिल्या महायुद्धात द गॉलला नष्ट करण्याची संधी जर्मनांना दोनदा मिळाली होती. परतु द गॉल दोन्ही वेळा कसाबसा वाचला. आणखी तीन दशकांनंतर उद्भवणाऱ्या दुसऱ्या महायुद्धात आपला पराभव होणार आहे, आणि त्या पराभवात


ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि घोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं? मग वापरतेस तरी काय तू?
आता लिहूं कागलेली डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं! डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं!
NEW! def
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो—अगदीं क्षारयुक्त असलें तरी!
स्वस्तिक ऑईल मिल्स, मुंबई

या फ्रेंच सैनिकांचा मोठा वाटा असणार आहे, याची कल्पना त्या वेळी जर्मनांना कशी असणार? कारण पहिल्या महायुद्धातील सामान्य कॅप्टन द गॉल दुसऱ्या महायुद्धात मुक्त फ्रेंच सेनेचा नेता झाला; तिच्या झुंजार निर्धाराचे आदरणीय प्रतीक बनला; आणि पुढे दहा वर्षांनतर दीर्घ काळासाठी फ्रान्सचा राष्ट्राध्यक्षही झाला.

पहिल्या महायुद्धातील अनुभवाचा फार मोठा फायदा द गॉलला दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी झाला. द गॉलच्या सुटकेचा फार जबरदस्त किंमत जर्मनांना द्यावी लागली.

द गॉलचा जन्म एका सुसंस्कृत घराण्यात झाला होता. घराणे फारसे प्रसिद्ध नव्हते; श्रीमंत नव्हते. द गॉलने सैनिकी पेशाची निवड केली. सैनिकी शिक्षणक्रम संपवताना झालेल्या परीक्षमध्ये द गॉलने फार मोठे यश संपादन केले. त्यामुळे तुकडी निवडण्याचा मान त्याला लाभला. त्याने साहजिकच पायदळाच्या ३३ व्या तुकडीची निवड केली. कारण फिलीफ पेटन हा त्या तुकडीचा नेता द गॉलचा आदर्श होता; मानबिंदु होता.

योगायोग काय विचित्र असतो पाहा! पहिल्या महायुद्धानंतर 'व्हर्डूनचा वीर' असा ज्या पेटनचा गौरवपूर्ण उल्लेख फ्रेंच इतिहासात झाला, आणि ज्याने, असामान्य शौर्यासाठी द गॉलला तीन वेळा पारितोषिक दिले, त्या पेटननेच दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या आक्रमणापुढे लाचार शरणागती पत्करली होती; फ्रान्समधील कळसूत्री सरकारचा तो प्रमुख झाला होता; आणि फ्रान्सचा विश्वासघात करून इंग्लंडला पळून जाऊन नाझींविरुद्ध युद्ध चालू ठेवण्याच्या अपराधाबद्दल द गॉलला त्यानेच देहांताची शिक्षा फर्मावली होती.

## लष्करी टिपणे लिहिली

१९१४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सम्राट कैसरच्या जर्मनीविरुद्ध फ्रान्सने ज्या वेळी युद्ध पुकारले, त्यावेळी द गॉल २० वर्षांचा कोवळा तरुण होता. त्याच महिन्याच्या १५ तारखेला दीनाँच्या लढाईत गोळीबाराचा पहिला अनुभव द गॉलला मिळाला. याच लढाईत तो प्रथमतः जखमी झाला, आणि त्याला पारितोषिक मिळाले.

दुसऱ्या वर्षी मेस्निल-ले-हुरलुस येथील घनघोर लढाईत भाग घेताना द गॉलला कॅप्टनचा हुद्दा प्राप्त झाला होता. तोपर्यंत जखमी झालेल्या, कैदी झालेल्या आणि मृत्यू पावलेल्या सैनिकांचा, नुसत्या फ्रान्सपुरताच, आकडा साडेतेरा लाखांवर गेला होता. द गॉलच्या ३३ व्या पायदळ तुकडीची अगदी दुर्दशा झाली होती. त्यामुळे जखम बरी होते न होते तोच तो रणांगणावर दाखल झाला होता.

या काळात द गॉलच्या हाताखाली असलेल्या एका सैनिकाने त्याचे व्यक्तिचित्र पुढीलप्रमाणे रेखाटले होते: दररोज सकाळी द गॉल आपले शुभ्र हातमोजे चढवून,

व्यवस्थित दाढी घोटून त्या चिखलाड रणभूमीवर दाखल व्हायचा. तसा फारसा तो कोणात मिसळत नसे; तरीही हाताखालील प्रत्येक माणसाची साद्यंत हकीकत त्याला अचूक माहीत होती; आणि अधिकारी या नात्याने धैर्य हा एकच स्पृहणीय गुण त्याच्यात होता असे नव्हे !

मेस्निल-ले-हुरलुसच्या लढाईत ३३ व्या तुकडीला रजा मिळण्याआधी अवघी काही मिनिटे द गॉल जखमी झाला. याही वेळेला त्याला शौर्याबद्दल पारितोषिक मिळाले. इस्पितळात त्याने एक लष्करी टिपण लिहिले. अशी अनेक लष्करी टिपणे त्याने पुढील आयुष्यात लिहिली. या टिपणांना दुसऱ्या महायुद्धात पाठ्यपुस्तकांचे महत्त्व प्राप्त झाले होते. या पहिल्या टिपणात, रखडणाऱ्या खदकी युद्धावर त्याने सडकून टीका केली होती.

## लष्करी इभ्रत कायम राखली

१९१६ सालच्या लढाईतील वर उल्लेखलेल्या असामान्य पराक्रमाबद्दल द गॉलचे तोंड भरून कौतुक करताना पेटेनने लिहिले होते, ' ३३ व्या तुकडीवर आगीची अखंड बरसात होत होती. असंख्य सैनिक धारातीर्थी पतन पावले होते. सारी तुकडीच शत्रूने वेढली होती. अशा वेळी कॅप्टन द गॉलच्या नेतृत्वाखाली उरलेल्या मूठभर सैनिकांनी जर्मनांशी कडवी हातघाईची लढाई केली आणि आपली लष्करी इभ्रत कायम राखली. '

आतादेखील इस्पितळात ऊरुभंग होऊन पडलेल्या द गॉलला लष्करी इभ्रतीच्या जाणीवेमुळेच पलायनाचा विचार सुचला. तेथून त्याला लवकरात लवकर जायचे होते; देशाची सेवा करण्यासाठी रणभूमीवर दाखल व्हायचे होते.

पश्चिम जर्मनीच्या काळ्या जंगलातील बेडनपासून जवळच हा फ्रायबर्गचा कैदखाना होता. जखम बरी होऊ लागताच द गॉल इतर कैद्यांमध्ये हिंडूफिरू लागला. द गॉलच्या झोपडीत त्याच्याबरोबर काही फ्रेंच, ब्रिटिश आणि ऑस्ट्रेलियन अधिकारी राहात होते. त्यांना आपला त्वरित पलायनाचा बेत द गॉलने सांगून टाकला. त्यांनी द गॉलला सबुरीचा सल्ला दिला.

'या जखमी पायाने फार लांब जाता येणार नाही तुला.' एकाने त्याला बजावले.

'त्यात काय झालं ? चालता तर येईल की नाही मला.' द गॉल ठासून म्हणाला, 'चालता आलं म्हणजे आणखीन काय निकशाला पाहिजे ?'

सहकारी अधिकाऱ्यांना त्याचा युक्तिवाद पटेना. तरीही त्याचा हट्टच असेल तर आवश्यक ती मदत करायला ते तयार होते. एकाने रेडक्रॉसच्या पुडक्यावरती गुंडाळलेल्या एका मोठ्या कागदावर त्या प्रदेशाचा नकाशा काढला आणि फ्रान्सकडे जाण्याचा सर्वोत्तम मार्गही त्यात दाखवला. दुसऱ्याने तारा कापायची एक कात्री त्याला दिली. तिसऱ्याने आणखी उपयुक्त वस्तू दिल्या. शुभेच्छा तर सगळ्यांनीच दिल्या.

द गॉलने पलायनासाठी एक काळोखी रात्र निवडली होती. त्या रात्री एक वाजता, लघ्वीला शौचकूपात जाण्याचे निमित्त करून द गॉल झोपडीबाहेर पडला आणि अंधाराचा फायदा घेऊन सरळ कुंपणाकडे धावला. कुंपणातील एक विशिष्ट जागा त्याने आधीच हेरून ठेवली होती. टेहळणीच्या उंच मनोऱ्यातील दोन फिरत्या शोधकदीपांनी सारा आसमत आलटून पालटून उजळला जायचा. मधल्या काही सेकंदातच काळोखाचा फायदा घेणे शक्य होते. वेळोवेळी तसा फायदा घेतच द गॉल कुंपणापाशी तर सुखरूप जाऊन पोचला. आता पुढचे काम अत्यंत त्वरेने करणे जरुरीचे होते. कारण या भागात कसलाच आडोसा घेणे शक्य नव्हते. द गॉल उताणा पडला आणि हात वर करून कात्रीने कुंपणाच्या तारा कापायला त्याने सुरुवात केली. कडाक्याची थंडी असली तरी द गॉलचा चेहरा घामाने डबडबला होता आणि हृदयाची धडधड इतकी वाढली होती, की त्या आवाजाचीच त्याला भीती वाटली. एकापाठोपाठ तारांच्या पाच रांगा उभ्या होत्या. एकेक कुंपण पार करीत द गॉल शेवटच्या कुंपणापाशी आला. तेही कुंपण त्याने प्रयत्नपूर्वक पार केले. या प्रयत्नात कितीतरी वेळा प्रकाशझोत त्याच्या अंगावरून फिरले. परंतु सुदैवाने त्याचे अस्तित्व कोणाला जाणवले नाही.

कुंपण पार करताच तो अवघडत उभा राहिला. मग धावण्याची शर्यत सुरू होताना घेतात तसा पवित्रा घेऊन,



**एकेक कुंपण पार करीत गॉल शेवटच्या कुंपणापाशी आला आणि प्रकाशझोत चुकवून धावत धावत जवळच्या झाडीत शिरला.**

प्रकाशझोत चुकवून, द गॉल जवळच्या जंगलसीमेकडे धावत सुटला. लवकरच तो झाडीत घुसला. श्वास घेण्यासाठी आता त्याला थोडे थांबावेच लागले. त्याचा पायदेखील आता ठणकू लागला होता.

## मी फ्रेंच सैन्यातील अधिकारी आहे !

जंगल अत्यंत घनदाट होते. दाट फांद्यांमधून द गॉलला काळेकुट्ट आकाश दिसले. आकाशात ताऱ्यांचा पत्ता नव्हता. तरीदेखील आपण तुरुंगाच्या पूर्व बाजूला बाहेर पडलो आहो आणि त्यामुळे फ्रान्सच्या दिशेला जायचे तर फार मोठा फेरा आपल्याला घ्यावा लागणार हे त्याला कळून चुकले. पुरेशी विश्रांती होताच तो उठला. पायातील वेदना फारशी कमी झाली नव्हती.

अर्धाअधिक फेरा त्याने पुरा केला असेल, इतक्यात तुरुंगातील धोक्याची सूचना देणारे कर्णे जोरजोराने वाजू लागले. रात्रीची शांतता चिरफाडत गेली. उघडच त्याचे पलायन पहारेकऱ्यांच्या लक्षात आले होते. आता ते पहारेकरी आपला पिच्छा पुरवतील हे द गॉलला ठाऊक होते. नकळतच तो धावू लागला. धावता धावताच पुढे काय करायचे ते ठरवू लागला. तसेच पुढे जायचे, का सारा गोंधळ निवेपर्यंत कोठेतरी लपून बसावयाचे, असा प्रश्न त्याच्यापुढे होता.

थोडावेळ विचार करून, त्याने दुसरी गोष्ट करावयाचे ठरविले. काळोखी रात्र आणि घनदाट जंगल यांची साथ त्याला मिळणार होती. जखमी पायामुळे तसेच वेगाने पुढे जायचा विचार त्याला रद्द करावा लागला. कारण बहुधा पहारेकरी त्याला पुन्हा पकडू शकले असते; शिवाय पळताना होणाऱ्या बारीकशा आवाजानेदेखील तो कोठे आहे, ते पहारेकऱ्यांना उमजणार होते.

द गॉलचे नशीब जोरावर होते. जवळच त्याला झुडुपांचा एक भलामोठा पुंजका दिसला. ही झाडी इतकी दाट होती की मोठ्या प्रयत्नानेच त्याला आत शिरणे शक्य झाले. मध्यभागी असलेल्या छोट्याशा मोकळ्या जागेत तो लपू शकत होता. पहारेकऱ्यांच्या शोधकदीपांचे प्रकाशझोतदेखील या झाडीतून आत येणे शक्य नाही, असे द गॉलला वाटले. तो श्वास रोखून बसला.

परंतु त्याने पहारेकऱ्यांबरोबरच्या शिकारी कुत्र्यांचा विचार केला नव्हता. हे शिकारी कुत्रे पळालेल्या कैद्याचा माग काढत नेमके या झाडीपाशीच येऊन थडकले होते. वैफल्याने आणि संतापाने द गॉलचा नुसता भडका उडाला. कुत्र्यांच्या भुंकण्यापाठोपाठ पहारेकऱ्यांच्या अवजड बुटांचे आवज द गॉलला ऐकू आले. पाठोपाठ झाडीवर प्रकाशझोत टाकले गेले.

'हरामखोर' एक पहारेकरी तुच्छतेने ओरडला, 'तू इथं आहेस हे कळलंय. आम्हाला. आता हात वर करून बाहेर ये कसा.'

काही काळ, पुन्हा कैदी होण्यापेक्षा येथेच प्रतिकार करता करता मरून का न जावे, असा विचार द गॉलच्या डोक्यात चमकून गेला. परंतु त्याचा देशाला काही

उपयोग होणार नाही, असेही त्याला लगेच वाटले; म्हणून त्याने तो विचार डोक्यातून काढून टाकला. आपला दुसरा पाय ओढत तो मोठ्या कष्टाने झाडीतून बाहेर आला. ताबडतोब पहारेकऱ्यांनी त्याच्याभोवती कडे केले. शिकारी कुत्रेदेखील त्याच्या अंगावर झेपावू लागले.

त्याचे कपडे फाटले होते, हातावर आणि चेहऱ्यावर ओरखडे उठले होते, पायातून कळा मारत होत्या. पण द गॉल ताठ उभा होता. ओठ त्याने घट्ट मिटून घेतले होते. पहारेकऱ्यांचा प्रमुख पुढे सरसावला आणि त्याने उलटया हाताने द गॉलच्या एक सणसणीत मुस्काटात मारली. आघात करताना त्याच्या तोंडून अभद्र शिव्याही बाहेर पडल्या.

' मी फ्रेंच सैन्यातील एक अधिकारी आहे; आणि अधिकाऱ्यासारखी वागणूक मला मिळालीच पाहिजे ' द गॉल निग्रहाने म्हणाला.

' तू कसला अधिकारी ? फ्रेंच डुक्कर आहेस तू ' पहारेकऱ्यांचा प्रमुख गरजला. ' आता गुपचूप चला पुन्हा तळावर आणि याबद्दल काय खाऊ मिळतो तो घ्या. '

द गॉल तळाच्या दिशेने चालू लागला. एका पहारेकऱ्याने त्याच्यावर संगीन रोखली होती. कुत्रेदेखील होतेच. पाय इतका दुखत होता, की जमिनीवर टेकवत नव्हता. परंतु वेदना चेहऱ्यावर उमटणे त्याला अपमानास्पद वाटत होते. त्याने दात ओठावर घट्ट रोवले होते. मान ताठच होती आणि तो लष्करी दिमाखात पावले टाकत होता.

तळावर आल्यानंतर प्रमुखाने त्याला शिव्यांची लाखोली वाहिली. मग नुसत्या पाव आणि पाण्यावर त्याला तीन आठवडे एकाकी अंधार कोठडीत घालवावे लागले. त्यानंतर नव्या कोठडीत त्याची रवानगी करण्यात आली. निराळे अधिकारी आता त्याचे सहकारी होते. या ठिकाणी येताच पुन्हा द गॉल पलायनाची योजना आखू लागला.

पलायनाची संधी पुन्हा मिळेपर्यंत तीन महिने जावे लागले. या खेपेला त्याने अधिक तपशीलवार आणि अधिक धाडसी योजना आखली होती. त्याचा पाय आता पुरा बरा झाला होता. त्यामुळे यशाबद्दल त्याला पुष्कळच आशा होती.

द गॉलची ही नवी झोपडी पूर्वीच्या त्याच्या झोपडीहून तारांच्या कुंपणापासून अधिक जवळ होती. शिवाय झोपडीच्या एका कोपऱ्यातील फळकुट ढिले होते. रात्री पहारेकऱ्यांची गस्त सुरू झाली आणि प्रकाशझोत सारे आवार विंचरू लागले, म्हणजे द गॉल आणि त्याचे सहकारी आपल्या कामात गढून जायचे. काम होते भुयार खणण्याचे. या कामाची द गॉलने व्यवस्थित आखणी केली होती. संध्याकाळी हजेरीनंतर साऱ्या झोपडया बंद व्हायच्या. रात्र पडल्यावर द गॉलच्या झोपडीतील चार कैद्यांवर बारा माणसे घोरतील इतक्या जोराने घोरण्याची पाळी यायची. त्यावेळी बाकीचे आठ जण भुयार खोदण्यात गुंतलेले असायचे.

ढिले असलेले एक फळकुट उचकटताच बाकीची फळकुटे काढणे सोपे झाले. या फळकुटांखाली मोकळी जागा होती, आणि त्याखाली होती जमीन. आपले हात, एक थाळी, आणि एक पत्र्याचा डबा एवढीच उपकरणे त्यांच्या जवळ होती. भूयार करताना खोदून काढलेली माती झोपडी खालील जागेत ठेवता यायची. भूयार खोदताना त्यांना काही दगड आणि खडकांचे तुकडे मिळाले. भुयाराच्या भिंती आणि छप्पर मजबूत करणे त्यामुळे त्यांना शक्य झाले.

असे कित्येक आठवडे गेले. अखेर ऑक्टोबरच्या मध्यास भुयार पुरेसे लांब झाले असावे, असे त्यांना वाटले. आता एखाद्या अंधाऱ्या रात्री भुयारातून बाहेर पडून जंगलात पळून जाणे शक्य होते. द गॉलबरोबर दोन ब्रिटिश अधिकारी येणार होते. भुयारातून बाहेर पडल्यावर मात्र प्रत्येकजण सुटकेचा स्वतंत्र प्रयत्न करणार होता.

## पुन्हा पलायन

एके दिवशी द गॉल आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला, 'या कैद्याच्या गणवेषात फार दूर जाणे शक्य नाही मला. मला वाटतं एखादा जर्मन गणवेष मिळवला पाहिजे.'

'जर्मन गणवेष ? तो कसा मिळवणार ?' कोणीतरी विचारले.

'ते पाहातो मी.' द गॉल म्हणाला. मात्र त्याने त्याबद्दल फारसा विचार केला नव्हता.

पुढील काही दिवस झोपडीच्या छोट्या खिडकीमधून द गॉल पहारेकऱ्यांच्या हालचाली बारकाईने न्याहाळत राहिला. हळू हळू एक योजना त्याच्या डोक्यात आकार घेऊ लागली.

गेल्या खेपेला, बाहेर शौचकूपात जातो या सबबीवर द गॉलने झुकांडी दिली होती. त्यानंतर रात्र पडल्यावर कैद्यांना बाहेरचे शौचकूप वापरण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्याऐवजीं झोपडीतच एक बादली ठेवलेली असायची. संध्याकाळच्या हजेरीनंतर दरवाजा कडेकोट बंद व्हायचा. नेमक्या या परिस्थिती-चाच फायदा घेण्याचे द गॉलने ठरविले होते. त्याच्या लक्षात एक गोष्ट आली होती. झोपडीचा दरवाजा भक्कम असला आणि बाहेरून त्याला लावलेला बोलट मजबूत असला तरी दरवाज्याच्या दोन फळ्या चौकटीत व्यवस्थित बसत नसल्या-मुळे त्यांच्यात चांगलीच फट राहायची. द गॉलने कोठूनतरी एक चिवट तार पैदा केली होती. तारेच्या एका टोकाला त्याने गोल कडे केले होते. ही तार झोपडीच्या फळ्यांखाली तो लपवून ठेवीत असे.

पलायनासाठी निवडलेल्या रात्री द गॉल त्या दरवाज्यापाशी अवघडून उभा होता. बाकीचे अधिकारी अंधाऱ्या खिडक्यातून पहारेकऱ्यांवर नजर ठेवून होते. योग्य वेळ येताच द गॉलने दरवाजाच्या फटीमधून तार बाहेर काढली. तारेचे

कडे त्याला बोलटाच्या टोकावर अडकवायचे होते. तसे अडकवल्यावर तार खेचून बोलट खाली पाडणे शक्य होणार होते. परंतु पुन:पुन्हा प्रयत्न करूनही कडे बोलटात अडकत नव्हते. एकदा तर एवढा मोठा आवाज झाला, की त्यामुळे सारे पहारेकरी धावत येतात की काय अशी भीती द गॉलला वाटली.

'या फंदात पडू नका तुम्ही.' एका अधिकाऱ्याने द गॉलला सुचवले. 'त्यामुळे आपल्या साऱ्या बेतावर पाणी पडेल.'

'तुम्ही पहा तर खरं' द गॉल हटवादीपणाने म्हणाला. आणखी पंचवीस वर्षांनंतर या त्याच्या हटवादीपणाला जगात प्रख्याती मिळणार होती.

आणि खरोखरच या वेळी द गॉलचा प्रयत्न यशस्वी झाला. बोलट खाडकन् खाली आला. झोपडीतील अधिकारी चमकले एक नि:श्वास सोडून द गॉलने दरवाजा उघडला. बाहेर जाऊन पुन्हा बंद केला. बोलट लावला आणि तो झोपडी शेजारच्या अंधाऱ्या जागेत लपून बसला. त्याच्या हातात तारेचा तुकडा होताच.

असा काही वेळ गेला. दुरून पहारेकऱ्याच्या बूटांचा आवाज येऊ लागला. झोपडीच्या दरवाज्यावरून येऊन कोपऱ्यावर हा पहारेकरी वळेल हे गॉलला ठाऊक होते. तेथेच तो टपून बसला होता. पहारेकऱ्याची पावले मोजत होता.

पहारेकरी दरवाज्यावरून पुढे येऊन कोपऱ्यावर वळला मात्र, दोन हातात तारेचा तुकडा घेऊन द गॉल पुढे झेपावला. तारेचा वेढा त्याने पहारेकऱ्याच्या गळ्याभोवती टाकला आणि त्याच्या तोंडून अस्फुटही चित्कार उमटण्याआधीच तार करकचून आवळली, आणि पहारेकऱ्याचा सारा भार अंगावर घेत त्याला आवाज न करता जमिनीवर लोळवले. द गॉलने हा प्रसंग इतक्या वेळा मनात खेळविला होता, की प्रत्यक्षात तो कसल्याही बोभाटाशिवाय पार पडला. क्षण दोन क्षण द गॉल थांबला. त्याने कानोसा घेतला. कोठे कोणालाही कसलाही संशय आला नव्हता. बोलट काढून त्याने दरवाजा उघडला आणि त्या मेलेल्या जर्मन पहारेकऱ्याला आत ओढले. बोलट पुन्हा लावून टाकला. यावेळी बोलट लावणे सोपे होते. कारण दरवाजा बंद करण्यापूर्वी तारेचे कडे द गॉलला बोलटात अडकविता आले.

आत आल्याबरोबर द गॉल पुढील कामाला लागला. द गॉलने पहारेकऱ्याचा गणवेष उतरला; आपले कपडे काढले; आणि क्रमाक्रमाने तो पहारेकऱ्याचा गणवेष चढवू लागला. मात्र आपण सहा फूट चार इंच उंच आहोत याचा त्याला विसरच पडला होता. त्यामुळे नव्या विजारीने त्याचे घोटे झाकले जाऊ शकत नव्हते; आणि कोटाच्या बाह्या कोपरांच्या पुढे थोड्याच येत असल्यामुळे पुढचे हात उघडेच होते. बूट मात्र त्याने स्वत:चेच ठेवले होते.

सारा गणवेष चढवून झाल्यानंतर, ओशाळे हसत द गॉल म्हणाला,

'हा गणवेष चालवून घेतलाच पाहिजे मला. कसंही असलं तरी युद्धकैद्यासारखा तरी दिसत नाही मी यात.'

'कोगास ठाऊक.' एक ब्रिटिश अधिकारी म्हणाला.

पण आता त्या बाबतीत काही करायला वेळच नव्हता. पहारेकऱ्याचा कोणी शोध करायच्या आत पळून जाणे आवश्यक होते. त्यांनी घाईघाईने कोपऱ्यातील फळकुटे दूर सारली आणि ते भुयारात उतरले. द गॉल सर्वात शेवटी उतरला. आपल्याबरोबर त्याने त्या मृत पहारेकऱ्यालादेखील घेतले होते. त्याला तेथेच मूठ माती देऊन टाकली. द गॉल भुयारात उतरताच उरलेल्या अधिकाऱ्यांनी फळकुटे पुन्हा व्यवस्थित लावून टाकली.

भुयारात सारा अंधारात होता. हवा येणे शक्यच नव्हते. शिवाय ओल देखील होती. परंतु अधिकारी सापासारखे सरपटत वेगाने पुढे गेले. पहिला अधिकारी थोडेसे खणून भुयाराचे तोंड मोकळे करणार होता. खोदायचे तसे फारसे नव्हतेच. परंतु आत जागाच इतकी निरुंद आणि श्वासोच्छ्वास करणे इतके बिकट होते, की त्या छोट्याशा कामाला अनपेक्षितपणे फार वेळ लागला. अखेर भुयाराचे तोंड मोकळे झाले. ताज्या हवेचा एक झोत भुयारात शिरला. काळजीपूर्वक कानोसा घेत पहिल्या अधिकाऱ्याने डोके वर काढले.

रात्र अगदी काळोखी होती. परंतु आपण तारेच्या कुंपणापलीकडे जवळ जवळ वीस फुटांवर बाहेर आलो आहोत, हे त्यांच्या लक्षात आले. आता जंगलसीमा अवघी शंभर हातावर होती. योग्य वेळ येताच तो अधिकारी भुयारातून बाहेर आला आणि पाहाता पाहाता जंगलात दिसेनासा झाला. पहिल्याला आवश्यक तो वेळ देऊन दुसरादेखील बाहेर पडला.

आता द गॉलची पाळी आली. भुयारातून बाहेर आल्यावर द गॉलला भुयाराचे तोंड बंद करावे लागले. त्या जागेचा संशय, आपण दूरवर जाईपर्यंत कोणाला येऊ नये अशी प्रार्थना त्याने मनोमन केली, आणि मग जंगलाकडे धाव घेतली. यावेळी अंतर काटायला त्याच्या ढेंगळचा पायांनी मोठीच मदत केली. रात्रभर तो पश्चिमेकडील फ्रेंच सरहद्दीच्या दिशेने पायपीट करत होता. सकाळपर्यंत कैदीतळापासून पश्चिमेला जवळ जवळ बारा मैल अंतरावर तो आला होता. येथे जंगल आणि गवत अत्यंत दाट होते; त्यामुळे योग्य ती काळजी घेतल्यास आपण दिवसादेखील वाटचाल करू शकू असे त्याला वाटले. परंतु आपली ही समजूत चुकीची होती असा अनुभव लवकरच त्याला आला.

सकाळचे नऊ वाजले असतील. द गॉलला दूरवर एक छोटीशी झोपडी दिसली त्याला सपाटून भूक लागली होती. झोपडीमधून काही खाद्यपदार्थ चोरता येतील असे त्याला वाटले. परंतु झोपडीचा मालक झोपडीबाहेरच होता. इतकेच नव्हे तर विचित्र, अपुऱ्या जर्मन गणवेषातील, उंचाडया द गॉलला त्याने आधीच टिपले

होते शिवाय तो साधासुधा जंगली गडी नव्हता; तर जर्मन गृहसंरक्षकदलातील एक अधिकारी होता. पावलांचा आवाज ऐकताच द गॉलने चमकून त्या दिशेकडे पाहिले. झोपडीचा मालक लहानशी बंदूक रोखून त्याच्यासमोर उभा होता. मारलेल्या जर्मन पहारेकऱ्याची द गॉलच्या खांद्याला असलेली बंदूक तशीच राहिली.

'कागदपत्र दाखव तुझे.' त्या माणसाने दरडावले.

द गॉलला जर्मन भाषा मुळीच येत नव्हती. त्यामुळे त्या माणसाला बोलण्यात गुंतविणे शक्यच नव्हते. म्हणून त्याच्या खांद्याला असलेल्या मोठ्या बंदुकीवर झेप टाकून ती हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु द गॉलचा पवित्रा त्याने आधीच ओळखला होता. त्यामुळे पुढे झेपावलेल्या द गॉलच्या कानशिलावर हातातील छोट्या बंदुकीच्या दस्त्याचा एक जबरदस्त तडाखा त्याने लगावला. द गॉल तत्काळ खाली कोसळला आणि बेशुद्ध झाला. शुद्धीवर आला तेव्हा तो त्या झोपडीच्या दारात अस्ताव्यस्त पसरला होता. त्याच्याजवळ तुरुंगातून नुकतेच येऊन पोचलेले तीन पहारेकरी होते.

द गॉलला एवढेच समाधान होते की त्याचे सहकारी सहिसलामत निसटून गेले होते.

पलायनाच्या या आगळिकीबद्दल त्याला पाव-पाण्यावर साठ दिवस एकाकी अंधारकोठडीत घालवावे लागले. जोडीला पहारेकऱ्यांचा मार होताच. परंतु एका गोष्टीबद्दल तो परमेश्वराचे आभार मानीत होता. त्याने मारलेल्या पहारेकऱ्याच्या मुडद्याचा शोध लागला नव्हता, त्यामुळे तो परागंदा झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. तो शोध लागता तर द गॉलला देहान्ताची शिक्षा अटळ होती.

## पलायन करशील तर मरशील

साठ दिवसांची शिक्षा भोगल्यावर त्याला कैदीतळ–प्रमुखापुढे उभे करण्यात आले. टक्कल पडलेला तो अधिकारी द गॉलकडे रोखून पाहात तिरस्काराने म्हणाला, 'आमचा जर्मन पाहुणचार पसंत दिसत नाही तुला. एरव्ही पळून कशाला गेला असतास तू. पण हे पलायन शेवटचंच आहे हे विसरू नकोस. उद्या तुला इंगोल्डस्टॅटमधील किल्ले नऊ या तुरुंगात पाठविण्यात येईल. तुझ्यासारख्या त्रासदायक कैद्यांसाठी खास व्यवस्था केली आहे तिथं. पहा तिथून तुला निसटता येतं का?'

लवकरच द गॉल इंगोल्डस्टॅट येथे दाखल झाला. किल्ले नऊबद्दल त्याने पुष्कळच गोष्टी ऐकल्या होत्या. किल्ले नऊ हा एक मध्ययुगीन किल्ला होता. त्याच्या भिंती बारा फूट जाड होत्या. त्यात कैद्यांसाठी छोट्या छोट्या लोखंडी खोल्या होत्या. तो काही युद्धकैद्यांसाठी असलेला साधासुधा तळ नव्हता, तर कैद्यांना जबर शिक्षा करण्याची खास व्यवस्था तेथे केलेली होती. तेथे युद्धकैद्यांना गुन्हेगारांसारखे वागवले जाई. त्यांना तेथे सक्तमजुरी करावी लागे.

परंतु प्रत्यक्ष अनुभवाने द गॉलला किल्ले नऊबद्दल आणखी काही गोष्टी कळून आल्या. सगळ्या हट्टी, आततायी, आक्रमक कैद्यांची या तुरुंगात रवानगी होई; त्यामुळे प्रत्येक देशाचे काही कैदी येथे येऊन एक आंतरराष्ट्रीय कैदी-मेळावा जमला होता. त्यांच्यातील कित्येकजण पलायनकलेतील कसलेले कलावंत होते; त्यांच्या लेखी पलायनाच्या योजना ही मनोरंजनाची साधने होती. मात्र एवढे युक्तिबाज कैदी गोळा झाले होते तरी एकालादेखील किल्ले नऊमधून बाहेर पडता आले नव्हते.

द गॉलचे आगमन झाले तेव्हा सकाळची वेळ होती. त्याच्या अंगावर फ्रेंच अधिकाऱ्याचा गणवेष होता. किल्ल्याच्या प्रचंड दरवाजातून तो आतील प्रांगणात आला. शेकडो कैदी प्रांगणात रोजचा फिरण्याचा व्यायाम घेत होते. त्यांच्यावर सशस्त्र जर्मन पहारेकऱ्यांचा पहारा होता. द गॉल दिसताच कैद्यांनी त्याचे एकमुखाने स्वागत केले. सारे मुळी त्याच्याभोवती गोळा होऊ लागले. त्यामुळे पहारेकऱ्यांना बंदुकांच्या धाकाखाली सारे शांत करावे लागले. पण तेवढ्यात काही कैदी द गॉलच्या कानाशी लागले होते. 'लपवायसारखं काही आहे का (तुझ्याजवळ)? असेल तर इकडं दे. इथं आता अगदी कसून झडती घेतील तुझी.' कैद्यांचा गदारोळ इतका वाढला की त्यात पहारेकऱ्यांचे हुकूम कोठल्या कोठे विरून गेले. चिडून पहारेकऱ्यांनी कैद्यांना बंदुकांचे दस्ते हाणायला सुरुवात केली. एक पहारेकरी पुढे सरसावला आणि त्याने आपल्याला सलाम ठोकण्याची आज्ञा कैद्यांना केली. कैद्यांनी तिच्याकडे दुर्लक्ष करून द गॉलच्या पराक्रम-भूमीचा—व्हर्दूनचा—नामघोष केला.

द गॉलने भोवतालच्या मेळाव्याकडे पाहिले. त्यातील काही कैदी त्याच्या तेहतिसाव्या तुकडीतील होते. त्यांच्याकडे पाहून त्याने हात हलविला, आणि एक प्रभावी रणगर्जना केली.

पहारेकरी द गॉलकडे वळला. त्याच्या उजव्या हातात पिस्तुल होते. संतापाने त्याचा चेहरा वेडावाकडा झाला होता. 'चूप बैस, फ्रेंच डुकरा' तो गुरगुरला.

द गॉलने तुच्छतेने त्या पहारेकऱ्याकडे एक कटाक्ष टाकला, आणि जरादेखील विचलित न होता पुन्हा एकदा तीच रणगर्जना केली.

पहारेकरी त्याच्याकडे नुसता पाहात राहिला. पिस्तुल त्याने ठेवून दिले. या तळावरील कैद्यांची झुंजार वृत्ती पाहून द गॉलला मोठे समाधान वाटले होते. यथाकाल त्याची रवानगी एका झोपडीत करण्यात आली. छोट्या छोट्या लोखंडी कोठड्या कैद्यांनी कधीच भरून गेल्या होत्या.

तिसऱ्या दिवशी सकाळी द गॉलला अधिकाऱ्यापुढे उभे करण्यात आले. हा अधिकारी तरणाबांड होता. पुढ्यातील काही कागदपत्रांकडे बोट दाखवत तो द गॉलला म्हणाला, 'तुझी सगळी माहिती इथं गोळा केली आहे मी. ती वाचल्यावर एकच गोष्ट सांगावी म्हणतो तुला. कॅप्टन द गॉल, या तुरुंगातून पळून जाणारा कैदी अजून जन्मायचा आहे. तुला हे मी मुद्दाम सांगतो आहे. कारण

पलायनाचे दोन प्रयत्न यापूर्वी केले आहेस तू. पण इथं मात्र तुझी मात्रा चालणार नाही. पलायन अशक्य आहे. तसा प्रयत्न करशील तर मरशील.'

द गॉलने काहीच उत्तर दिले नाही. झोपडीमध्ये आपल्याला परत नेण्याची वाट पाहात होता तो. खरे म्हणजे अधिकाऱ्याच्या ताकीदीला उशीरच झाला होता; कारण द गॉलने पलायनाची योजना आखायला सुरवातही केली होती. त्याच्या झोपडीत कोणी एक रोलँड गारो नावाचा फ्रेंच कैदी होता. हौदीनी सारखी जादुगिरी त्याला अवगत होती. जर्मनांना बहुधा त्याचा पत्ता लागलेला नसावा. हातचलाखीचे अत्यंत कठीण प्रकार तो जाणत होता. द गॉल येण्यापूर्वी कित्येक महिने गारोने पलायनाची एक योजना आखली होती. त्या योजनेत द गॉलला सामील करायला तो आनंदाने तयार झाला होता.

दुर्दैवाने बव्हेरियाच्या आल्प्स पर्वतराजीतील दान्यूबच्या काठावर बांधलेल्या इंगोल्डस्टॅट येथील किल्लेनऊ या तुरुंगाचा पाया खडकाळ होता. परंतु दोन खडकांमध्ये असलेल्या प्रचंड फटीत माती होतीच आणि या फटीमधून भुयार खणून नदीपर्यंत पोचता येईल असा शोध गारोने लावला होता. पण असे भुयार खणणे हे मोठ्या कष्टाचे काम होते. परंतु भुयार खणून नदीपर्यंत जाता आले तर एखादी होडी मिळवून स्वित्झर्लंडच्या वा इटलीच्या सरहद्दीपर्यंत सहज जाता येईल अशी आशा त्याला होती.

हा मोठा धाडसी, दीर्घकालीन बेत होता. पण नुसते स्वस्थ बसण्यापेक्षा ते काम कितीतरी चांगले होते. शिवाय सुटकेची थोडीतरी आशा होतीच. द गॉलने फ्राएबर्ग येथे खणलेल्या भुयारापेक्षा हे भुयार एका दृष्टीने सोयीस्कर होते. कारण त्याच्या भिंती आणि छप्पर मजबूत खडकांचे होते; तेव्हा भुयार मध्येच कोसळण्याची भीती नव्हती. त्याशिवाय अन्नाचा साठा करण्याच्या दृष्टीनेही भुयार सोयीचे होते.

परंतु दुर्दैवाने घात केला. १९१७ सालच्या फेब्रुवारीमध्ये जर्मन पहारेकऱ्यांना भुयाराचा शोध लागला. द गॉलच्या झोपडीतील चौदा कैद्यांना याबद्दल शिक्षा झाल्या. फेब्रुवारीच्या मध्यापासून तो थेट मे महिन्यापर्यंत द गॉल इंगोल्डस्टॅटच्या तुरुंगात खितपत पडला होता. खडकामध्ये असलेल्या कडीत साखळीचे एक टोक बांधून दुसरे टोक द गॉलच्या उजव्या पायाला बांधले होते. दिवसातून एक वेळ त्याला पाव-पाणी देण्यात येई. त्या अंधारकोठडीत थोडादेखील प्रकाश नव्हता. त्या दीर्घ कालावधीत दिवस आणि रात्रीचा भेददेखील त्याला कधीच कळला नव्हता.

## मुक्त फ्रेंच सेनेचे संयोजन

अंधारकोठडीमधून द गॉलला बाहेर काढले. त्यावेळी त्याच्या अंगात यत्किंचित त्राण उरले नव्हते. या शिक्षेचा त्याच्या डोळ्यांवरदेखील अनिष्ट परिणाम झाला होता. लवकरच त्याला नव्या कैदीतळावर पाठविण्यात आले. हा तळ ऱ्हाईन नदीच्या काठी लडविगशाफेन येथे होता. या तळापासून फ्रेंच सीमा अगदी जवळ

असली तरी किल्ले नऊपेक्षादेखील या तुरुंगातून निसटून जाणे अधिक कठीण होते. कारण या तुरुंगात पहाऱ्याची व्यवस्था विशेषच कडक होती.

१९१७ सालच्या सहा एप्रिलरोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. पश्चिम आघाडीवर दोस्तांच्या मदतीला अमेरिकन सैन्य मोठ्या संख्येने येऊ लागले. त्यामुळे आतापर्यंत जर्मनीच्या बाजूला झुकणारे विजयाचे पारडे अकस्मात दोस्तांच्या बाजूला निश्चितपणे झुकू लागले, त्याला आणखीही एक कारण होते. सोळा एप्रील रोजी रणांगणावर प्रथमच रणगाड्यांचे आगमन झाले. रगाणड्यांची कल्पना आणि कार्यवाही यात विन्स्टन चर्चिलचा मोठा वाटा होता. रणगाड्यांमुळे खंदकी युद्धाची पद्धती बदलून युद्ध गतिमान झाले.

दोन महायुद्धांमध्ये चिलखती दलांबद्दल चर्चिलने केलेल्या हाकाटीला साथ देणाऱ्या द गॉलने रणांगणावर अवतरलेल्या पहिल्या रणगाड्यांचे स्वागत करताना आपल्या दैनंदिनीत लिहिले 'खंदकी युद्धाची कोंडी फोडण्याचे साधन आता सापडले आहे.'

१९१८ सालच्या अकरा नोव्हेंबरला युद्ध संपले. द गॉल लडविगशाफेन येथेच होता. कारावासातील अखेरच्या दिवसांत त्याने आपल्या लष्करविषयक पुस्तकांची टिपणे काढली होती; भविष्यकालीन नेतृत्वासाठी स्वतःची सिद्धता केली होती. मात्र द गॉलला पलायनाची आणखी संधी काही मिळाली नाही.

ती पुढे बावीस वर्षानंतर, १९४० साली मिळणार होती. त्यावेळी द गॉल एका छोट्या चिलखती दलाचा प्रमुख होता. बेल्जियन सरहद्दीवरून नाझी फौजा फ्रान्स-मध्ये घुसत होत्या. फ्रेंच सेनेचा प्रतिकार वेगाने थंडावत गेला. एकट्या द गॉलच्या पथकानेच जर्मनांना हिंमतीने तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण त्यालाही यथाकाल माघार घ्यावीच लागली.

कालांतराने फ्रान्सने शरणागती पत्करली. ब्रिटिश सैन्याला डंकर्कचे भयंकर दिव्य करावे लागले. यावेळी द गॉलने अखेरचे पलायन केले. त्याने इंग्लंडमध्ये जाऊन फ्रेंच भूमिगत चळवळीचे आणि मुक्त फ्रेंच सेनेचे संयोजन केले. दुसऱ्या महा-युद्धानंतरच्या काळातील त्याचे कर्तृत्व सर्वविदितच आहे.



मास्टर

# मनहर बर्वे

मास्टर मनहर बर्वे हे संगीत क्षेत्रातील एक बडे मानकरी. राम मराठे, सुरेश हळदणकर, प्रसाद सावकार, आर्. एन्. पराडकर, अनंत दामले, विमल कर्नाटकी, जयमाला व पुष्पलता कुलकर्णी वगैरे नामवंत गायक-गायिकांचे ते गुरू. मास्टरजींचा वाढदिवस २० डिसेंबर रोजी येतो. त्यानिमित्त हा लेख....

'गवयाचं पोर रडतं सुरात' असं म्हणतात खरं. मास्टरजींच्या बाबतीत हें म्हणणे लागू पडायला हरकत नाही. त्यांचे वडील गणपतराव बर्वे हेसुद्धा विख्यात गायक व संगीतज्ञ होते आणि मनहरजींची संगीतसाधनाही त्यामुळे त्यांच्या बालपणीच सुरू झाली. वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षांपासूनच धडे घेणे चालू झाले होते. म्हणजेच त्या वयात पाटी पेन्सिल ऐवजीं मास्टर मनहरच्या हाती एखादे तंतूवाद्य वगैरे काहीतरी असायचे. वयाच्या सहाव्या वर्षीच मांडवी भागातील व्यापाऱ्यांनी त्यांच्या गायनकलेचे कौतुक करण्यासाठी त्यांना सरोजिनी नायडूंच्या हस्ते सुवर्णपदक देण्याचा कार्यक्रम केला होता. या सुविख्यात नायटिंगेलच्या हस्ते असे पदक मिळविण्याचा मान काही साधासुधा नव्हता. 'मुलाचे

पाय पाळण्यात दिसतात ' याही म्हणीची ती झलकच होती असं म्हणायला काही हरकत नाही. पदकाबरोबरच मास्टरजींना हजाराची थैलीही देण्यात आली होती.

पण लहानपणीच हे जे कौतुक वा मान-सन्मान त्यांना लाभत होते त्यामागे भरपूर कष्ट होते. हे सारे काही सुखासुखी मिळाले नव्हते. त्यांची संगीत साधनाही विलक्षण होती. मी त्यांच्याबरोबर मुलाखतीसाठी साधी तासाभरासाठी बैठक मारली तर जमिनीवर बसायची सवय नसल्याने थोडाफार बेचैन होऊन चुळबुळ करीत होतो पण लहान वयातही मास्टर मनहर जी बैठक मारायचे त्यासंबंधी ऐकले आणि त्यांच्या तपस्येचे कौतुक वाटले. आदर वाटला. नव्हे हेवाही वाटला.

रोज पहाटे चार वाजता उठून त्यांना रियाजासाठी बसावे लागे. हा रियाज तब्बल आठ वाजेपर्यंत चालत असे. पण एवढयावरच भागत नसे, तर पुन्हा संध्याकाळीं ७ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत त्यांना रियाजासाठी बसावे लागे. आणि हे असे सतत सहा वर्षेपर्यंत चालू होते. म्हणूनच वयाच्या १२ व्या वर्षी ते सहा वाद्ये उत्तम प्रकारे वाजवू शकले.

एक पैसा दक्षिणा व खिचडी यावर त्यांच्या वडिलांनी दिवस काढले होते. बडोद्याच्या कलाभवनात ते होते. सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना आश्रय दिला होता. वडिलांनी प्रत्यक्ष संगीत साधनेला सुरुवात करण्यापूर्वी एक मोठी तपश्चर्या केली होती व त्याचे सुमधुर फळही त्यांना मिळाले. त्याकाळात सुप्रसिद्ध गायक मौलाबक्ष बडोद्याला राहात असत. मौलाबक्षांची संगीत तपस्याही अचाट होती. मौलाबक्ष गायला बसले की मास्टरजींचे वडील बाहेर कठडयाला टेकून त्यांच्या संगीताच्या ताना एकाग्रतेनं ग्रहण करीत उभे राहायचे. असे तब्बल महिनाभर चालले होते. आणि असे किती काळ चालले असते कोण जाणे. पण पानाची थुंकी टाकायला बाहेर आलेल्या मौलाबक्षांनी त्यांना पाहिले. त्यांना बोलावून घेतले व आपला गंडा बांधला. फैज महमंद या विख्यात गायकानेही त्यांना तालीम दिली. गणपतराव संगीतातील सर्व विद्या पारंगत होते. संगीतावर गुजरातीत त्यांनी ४० पुस्तके लिहिली आहेत एवढी एकच गोष्ट त्यांच्या पारंगततेची कल्पना देण्यास पुरेशी आहे. त्यांनी प्रिसेस स्ट्रीट येथें गायनशास्त्र शाळा काढली होती. पंडीत भास्करबुवा बखले व गणपतराव बर्वे हे गायकीतील एकाच घराण्यातील. संगीताची परंपरा बर्वे घराण्यात अखंड चालूच आहे. मास्टरजींचे सुपुत्र मधुकरराव हे बर्वे संगीत विद्यालयात संगीत शिकविण्यात मास्टरजींना मदत तर करतातच पण नाटकातील पार्श्वसंगीतासाठी तो व्हायोलिन वाजवतात.

मास्टर मनहर बर्वे यांचे संगीत क्षेत्रातील स्थान लहानपणापासून हळूहळू उंचावत होते. १९१६ सालीच म्हणजे सरोजनी नायडूंनी पदक बहाल केल्यानंतर सरोजनी नायडूंनीच 'या मुलाला कराचीला घेऊन जा ' असे कराचीचे मेयर जमशेटजी मेहता यांना सांगितले. तेथे एक संगीताची मोठी बैठक होणार होती.

हरचंदराय नावाचे एक वकील त्यांना तेथे घेऊन गेले. बनारसकडील अनेक नामवंत गायक तेथे होते.

या बनारसच्या गायकांनी बनारसकडे एक मोठी कॉन्फरन्स आयोजित केली होती आणि त्यांनी मास्टरजींना त्याचे आमंत्रण दिले. मास्टरजींच्या आयुष्यातील ही पहिली कॉन्फरन्स. त्यातही त्यांचे भाग्य थोर की तेथे त्यांना जलतरंगावर बिरू मिश्रा या सुविख्यात तबलजींनी साथ केली. ही त्यांची पहिलीच वर्दी त्यांनी वयाच्या सातव्या वर्षी लावली. वडिलांनी मास्टरजींना तत–तंतुवाद्ये, अवनत–चर्मवाद्ये, घन–धातुवाद्ये, व सुषिर–बासरी सारखी वाद्ये–सारे काही शिकवले.

मास्टरजींचा एक किस्सा मजेदार आहे. १९२४ सालची गोष्ट. मुंबईत एका जलशाचा कार्यक्रम होता. कलकत्त्याच्या गोहरजानबाई, प्यारासाहेब, बालगंधर्व विनायकबुवा पटवर्धन यांनाही आमंत्रणे होती. पण ते आले नाहीत. मनहरजींना पाचारण करण्यात आले. गोहरजान बाईंना यायला उशीर झाला पण मुंबईकर पडले वक्तशीर, त्यामुळे मनहरजींना प्रथम गायला बसविण्यात आले. तेव्हा शास्त्रीय संगीतापेक्षा लाईट म्युझिकची लोकांना अधिक आवड. मास्टरजींच्या गायनाने श्रोते लुब्ध झाले होते. त्यानंतर गोहरजानबाई आल्या. मनहरजींचं गाणं पूर्ण होताच त्या गायला बसल्या. बसंत राग आळवायला त्यांनी सुरुवात केली, लोकांनी ओरड! ओरड केली. याचे खापर मात्र त्यांनी 'लहान मुलाने पाणउतारा केला.' असे म्हणून मनहरजींच्या माथी फोडले. पण नंतर सारे विसरून बाईंनी त्यांना चहाला बोलाविले. पुढे त्या मनहरजींबरोबर हिंदुस्थानभर कार्यक्रम करू लागल्या.

मास्टरजींना, बाल स्वरभास्कर, संगीत सरस्वती, संगीत पारिजात, बाल गायनाचार्य, बाल संगीतभानू वगैरे पदव्या देण्यात आल्या.

शास्त्रीय संगीत लोकप्रिय व्हायला अजून खूप काळ जाईल असे त्यांना वाटते. कारण लोकांना हलके फुलके संगीत अधिक आवडते. पूर्वीच्या कलावंतात चमत्कार होता, आता शो जास्त आहे. वेडेवाकडे चेहरे करणे, हातवारे करणे म्हणजे गाणे नव्हे. आज नक्कल अधिक आहे. विद्यार्थ्यांकडे तपस्येची भावना नाही. अर्धवटच शिक्षण सोडून जाण्याची प्रवृत्ती अधिक आहे वगैरे विचारही त्यांनी मांडले. अनेकांना शिक्षण देण्यापेक्षा काही चांगले पण थोडेच विद्यार्थी तयार करावेत असेही त्यांना वाटते. मुंबई विद्यापीठाने संगीत विभाग चालू केला आहे. हा उपक्रम त्यांना स्तुत्य वाटतो. आजचे काही कलाकार मेहनती व चांगले आहेत, याबद्दलही त्यांना समाधान वाटते. हिन्दुस्थानी व कर्नाटक संगीताबरोबरच हिन्दी, मराठी, गुजराती, तेलगू, तामिळ, कानडी, पंजाबी, सिंहली व इंग्रजी भाषांतील गाणीही ते गातात. मास्टरजींना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

–परिचित

शरद गोखले

रंगभूमी

# देवाशपथ खरं सांगेन

## उत्तम निर्मिती

युद्धाच्या नौबत्ती गर्जू लागल्याने आलेल्या प्रकाशबंदीबरोबर सांस्कृतिक आघाडीलाही एकदम अवकळा आली. चित्रपटांनी आपला एक खेळ कमी केला आहेच, परंतु सध्या असलेल्या खेळातही शेवटच्या पाचच्या खेळास गर्दी अगदीच बेताची असते. नवीन नाटकांचे आगमन जवळ जवळ थंडावलेच आहे. नव्या-जुन्या नाटकाचे प्रयोग दिवसा लावून कंपन्या दिवस काढीत आहेत. अशा या धामधुमीतच नाटय-मंदार या संस्थेच्या 'देवा शपथ खरं सांगेन' या नाटकाचा प्रयोग पहावयास मिळाला.

'स्वर जुळता गीत तुटे', हे सुरेश खरे यांचे जुने नाटक. व्यवसायिक रंगभूमीवर या नाटकाचे फारसे प्रयोग झाले नाहीत. असे हे काहीसे अयशस्वी नाटक निर्माते राजाराम शिंदे यांनी मोठ्या आत्मविश्वासाने रंगभूमीवर आणले आहे. नावाशिवाय अन्य लक्षात येण्याजोगे फेरफार लेखनामध्ये केलेले नाहीत. शिवाय 'माणूस 'मध्ये ' स्वर जुळता 'वर लिहीत असताना मी नाटयसंहितेची पुरेशी दखल घेतली होती. आता नाटयमंदारच्या प्रयोगाबाबतच मी प्रामुख्याने लिहिणार आहे.

### कथानक

'देवाशपथ 'च्या-प्रयोगामध्ये जुन्या कलाकारांपैकी मामा पेंडसे व भावना, हे दोन प्रमुख कलावंत कायम ठेवण्यात आले आहेत. पाषाण हृदयी पित्याची भूमिका मामा जीव ओतून करतात. शोभाची काहीशी गुंतागुंतीची व्यक्तिरेखा भावना समर्थपणे साकार करते. साधा सुखाचा संसार करण्याची इच्छा बाळगणाऱ्या या मुलीच्या वाटचाला असे विलक्षण जीवन येते, की अखेर शीलरक्षणासाठी पित्याचा खून करून ती स्वतःची सुटका करून घेते.

अफरातफर केल्यामुळे अकाली नोकरी सोडावी लागलेला शिवराम साने नावाचा गृहस्थ निवृत्ती नंतरही आपला जीवनमार्ग बदलत नाही. रेस, दारू, जुगार यात बुडालेल्या या माणसाला एक वयात आलेली मुलगी आहे. तिचं नाव शोभा. घराचा गाडा शोभा नोकरी करून ओढते आहे. आपले सुखी संसाराचे स्वप्न साकार करण्याचो तिची जिद्द आहे. आज ना उद्या आपल्या प्रियकराला – प्रभाकरला –आपण वस्तुस्थिती सांगू आणि आपल्या भावंडांसह आपला नवा संसार सुरू करू अशी आशा ती बाळगून आहे. व्यसनात गुरफटलेल्या शिवराम सानेच्या दृष्टीने मुलीचे लग्न म्हणजे मोठी आपत्ती. म्हणूनच शोभासंबंधी खोटे-नाटे सांगून

साने, प्रभाकरचे तिच्याबद्दलचे मत कलुषित करतो. प्रभाकरने दिलेला नकार वर्मी लागल्याने हतबल झालेली शोभा आपल्या भावंडासह आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न करते. परंतु दुर्दैव येथेही शोभाची पाठ सोडत नाही. सर्व भावंडे मृत्युमुखी पडतात, आणि एकटी शोभा जिवंत राहाते ! भावंडांचा मृत्यू ही अपघाती बात ठरल्याने शोभा संशयाचा फायदा मिळून सुटते. कांतीलाल नावाच्या बदमाषाकडून काढलेले कर्ज फेडण्यासाठी शिवराम सानेजवळ कोणताही मार्ग नसल्याने साने शोभाचा बळी देण्याचे ठरवतो. कांतीलाल दार ठोकत असतो. आत्मघात, अथवा शीलभ्रष्टता असे दोनच पर्याय असतांना, या सर्व कारणपरंपरेला जबाबदार असलेल्या आपल्या जन्मदात्या बापाचा खून करून शोभा कायमची मुक्त होते.

कथानकामध्ये मामा पेंडसे व भावना यांना भरपूर वाव असून त्याचा त्यांनी भरपूर फायदाही घेतलेला आहे. या दोघांच्या खालोखाल कोर्टातील वकिलांना छान संधी आहे. रा. वि. राणे (सरकारी वकील) व राम कुलकर्णी (बचावाचा वकील) हे दोन कलावंत वकिलांची जुगलबंदी उत्तम रंगवतात. कुलकर्णी मात्र प्रसंगी कृत्रिम व नाटकी वाटतात. प्रभाकरला फारसा वाव नाही. ही व्यक्तिरेखा मोठी विचित्र आहे. स्वतःच्या पलीकडचे जग पाहण्याची तयारी नसणारा हा प्रभाकर ईश्वर आगरवाल यांनी उभा केला आहे. परंतु वाट्याला आलेली भूमिका प्रामाणिकपणे करण्याखेरीज अन्य कोणताही ठसा उमटवू शकत नाहीत.

कांतीलाल, आणि रूपादेवी या दोन्ही भूमिका तशा छोट्याच परंतु कसबी कलाकार छोटी भूमिका बारीक सारीक छटांसह कशी खुबीने रंगवतो, याचा प्रत्यय यशवंत दत्त यांचा कांतीलाल पाहाताना आला. केवळ एकच प्रवेश वाट्याला येऊनही यशवंत दत्त यांचा कांतीलाल आपला प्रभाव पाडून जातो. कांतीलालचे नाटकातील स्थान लक्षात घऊन यशवंत दत्त यांनी कांतीलालची भूमिका केल्याचे निश्चितपणे जाणवते. रूपादेवी या एक्स्ट्रा नटीची भूमिका पुष्पा भोसले यांनी मोठी छान केली आहे. प्रत्येक नव्या भूमिकेबरोबर त्यांच्या कामातील सफाई वाढत आहे. न्यायाधिशाच्या छोट्या भूमिकेचा आब नाट्यमंदारचे संचालक राजाराम शिंदे यांनी व्यवस्थित संभाळली आहे.

निर्मितीची बाजू राजाराम शिंदे यांनी उत्तम संभाळली आहे. सरकता रंगमंच ही या नाटकाची गरजच आहे. कारण कोर्टाची दृश्ये, सानेच्या घरातील दृश्ये यांचे समर्पक दर्शन अशा रंगमंचामुळे सुलभ झाले आहे. रंगमंच सरकता असला, तरी निर्मिती जास्तीत जास्त आटोपशीर ठेवण्याचा शिंदे यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. दोन सलग दृश्यांमधील रिकाम्या वेळाचे अंतर अजूनही कमी होणे आवश्यक आहे. व्यावसायिक रंगभूमीवर येऊनही काहीशा दुर्लक्षिलेल्या या कलाकृतीच्या,पुर्ननिर्मितीचा हा प्रयत्न कौतुकास्पद असला, तरी मनस्ताप देणारा विषय, आणि ' जुने 'च नाटक, ही प्रेक्षकांच्या मनातील भावना यामुळे व्यवसायिक यशास पडणाऱ्या मर्यादांचा धोका, जाणवण्याइतका तीव्र आहे हे नमूद केलेच पाहिजे. ◻ ◻ ◻

पृष्ठ १६ वरून

यांच्या मते ही सर्व अवस्था यायला सरकारची दुधाची किंमत नक्की करण्याची पद्धती, इतर काही धोरणे आणि कॉलनी चालवणाऱ्या अधिकाऱ्यांचे या सर्व प्रश्नांबाबतचे औदासिन्य, हीच परिस्थिती कारणीभूत होती.

१९४९ ते ६० पर्यंत सरकार दूध उत्पादकांना जो भाव देत असे तो फायद्याचा नसला तरी, नुकसान पोचवणारा तरी नव्हता. सर्वसाधारणपणे भांडवलावर दहा टक्के नफा मिळवून देणारा जरूर होता. दूध उत्पादनास आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवा यांच्या किमतीवरून हा भाव ठरविण्यात येत असे व यासाठी वर्षाचे दोन कालखंड–जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर–ठरविण्यात आले होते. प्रथम एक तात्कालिक भाव देण्याची यात तरतूद असे. मागील सहा महिन्यांची जी उत्पादन-किंमत असेल ती तात्कालिक भाव समजून दुधाच्या बिलाचे पैसे दिले जात. त्यानंतर तीन महिन्यांनी त्याच मुदतीतील प्रत्यक्ष दूध-उत्पादनखर्च नक्की करून भाव ठरविण्यात येत असे व तो पुढील मुदतीतील तात्कालिक भाव समजण्यात येत असे. उत्पादनाची किंमत तात्कालिक भावापेक्षा कमी असल्यास फरकाची रक्कम पुढे दुधाच्या बिलातून कापून घेतली जात असे व ती जास्त असल्यास फरकाची रक्कम पुढे गवळ्यांना मिळे. यांतूनच एक प्रकारची अनिश्चितता निर्माण झाली. अनेक तक्रारी झाल्या. म्हणून एका तज्ज्ञ समितीची नेमणूक १९६१ साली करण्यात आली. '६३ साली त्या समितीचा अहवाल अंमलात आला व त्यानुसार दूध उत्पादनाची किंमत नक्की करण्यात येऊ लागली. पण त्यातूनही प्रश्नाचा गुंता खास असा न सुटल्याने त्याबद्दलही गवळ्यांच्या तक्रारी होऊ लागल्या. त्यातच म्हशीमागे ६·२ लिटर्स दूध मिळाले पाहिजे व त्यापेक्षा कमी झाल्यास 'अकार्यक्षम' असा शिक्का मारून ते दूध उत्पादनाचे आकडे विचारात घ्यायचेच नाहीत असेही सरकारने ठरविले. त्यामुळेही प्रश्न दिवसेंदिवस चिघळत होता.

त्यातच दुसऱ्या एका प्रश्नाची भर पडली. उत्पादनखर्चात समाविष्ट असलेले म्हशींचे खाद्य (दाणा)–याचा भाव किलोमागे ७२ पैसे मिळावा असे तज्ज्ञ समितीने ठरवून दिले होते. पण त्यात बदल करून सरकारने 'ॲग्रो इंडस्ट्रीज् कॉर्पोरेशन'चे तयार खाद्य-मिश्रण वापरावे व त्याबद्दल किलोमागे ५७ पैसे मिळतील असा एक आदेश दिला. अनेकांच्या मते हे खाद्य-मिश्रण आवश्यक त्या प्रमाणात सकस नसल्याने अधिक दूध उत्पादनासाठी कुचकामी होते. शिवाय पालघर व दापचारी येथील सरकारी मालकीच्या म्हशींनाही ते देण्यात येत नव्हते. पण आरेच्या बाबतीत मात्र यासाठी सक्ती झाली होती.

सरकारच्या पालघर फार्मवर भाकड म्हशींच्या पोषणासाठी एक केंद्र चालविले

जात. तेथे म्हशीमागे मासिक भाडे आकारणी करून आरे कॉलनीच्या भाकड म्हशी ठेवण्याची व्यवस्था आहे. पूर्वी प्रत्येक म्हशीमागे (दाणावैरण वगैरेसाठी) १ रुपया ७० पैसे आकारले जात. सरकारने अचानक त्यात वाढ करून हा दर रु. २·५० पैसे केला व तोही दोन वर्षांनतर. मधल्या काळातील उत्पादन खर्च १·७० च्या हिशोबाने काढला गेला होता. सरकारने त्यांच्याकडून याबद्दल ३ लाख रुपये वसूल केले.

त्यातच भर म्हणून की काय गवळ्यांना देण्यात येणारे दूधाचे भाव खाली आणण्यात आले. व त्याबद्दलच्या तात्कालिक भावाची जी जादा रक्कम देण्यात आली हो ी ती कापण्यास सुरुवात झाली. त्यामुळे ही रक्कम ६० लाखाच्या घरात गेली. मासिक १२ हप्त्यांनी या कपातीला सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणून

## आरे कॉलनी, मुंबईचा दूध-पुरवठा वगैरे वगैरे....

१. मुंबईला होणारा रोजचा दूध-पुरवठा सुमारे १० लाख लिटर्स आहे. त्यापैकी सुमारे ४ लाख सरकारी दुग्धशाळांमार्फत होतो तर ६ लाख लिटर खाजगी गवळ्यांकडून होतो.

२. आरे कॉलनीत येणारे दूध आनंद, उपनगरातील दूध सहकारी संस्था व महाराष्ट्रातील काही ग्रामीण भागांतून येते.

आरे कॉलनीतील म्हशी रोज सरासरी ९० हजार लिटर्स दूध देतात.

तर आनंद येथून रोज सरासरी १ लाख २० हजार लिटर्स दूध येते.

उपनगर सहकारी संस्थातून रोज सरासरी ७ हजार लिटर्स दूध येते.

आणि ग्रामीण विभाग रोज सरासरी १ लाख १० हजार लिटर्स दूध पुरवितो.

याची किंमत रु. ४,४९,०४० एवढी होते.

३. ३ लक्ष २७ हजार लिटर्स दूध हे सारे होल दूध असते. पण ४१ हजार लिटर्स दूध टोन्ड बनविण्यासाठी वापरतात म्हणजे सुमारे २ लक्ष ८६ हजार लिटर्स होल व सुमारे १ लाख लिटर्स टोन्ड या प्रमाणात सहकारी दूध पुरवठा होतो

परदेशातून मिळालेल्या बटर ऑईल किंवा तूप व दुधाची भुकटी या पासूनही दूध तयार केले जाते. दुर्गंधीबद्दल प्रसिद्धी मिळालेले दूध ते हेच होय.

येथे दुधाचे उत्पादन कमी होते म्हणून मग वाटपाचा मेळ बसविण्यासाठी टोन्ड दूध दिले जाते. म्हणूनच मुंबईत आठवड्यातून दोन तीनदा टोन्ड दूध दिले जाते.

काही गवळ्यांच्या हाती काही पैसाच येईनासा झाला. व्यवसाय उजाड होत चालला होता. सरकारकडून कर्ज मिळे त्यामुळे कसेतरी काम चालू होते एवढेच. दाणावैरणही मिळे. पण या सर्वांची रक्कम कापली जात असे. म्हणून पुन्हा हाती काही नाहीच अशी अवस्था झाली.

'६९ च्या मे-जून मध्ये आरे गवळीवाड्यातील गवळी दुधाचे भाव नक्की करून घेण्याकरिता उच्च न्यायालयात गेले होते. याचा परिणाम सरकारी अधिकारी व गवळी यांच्यातील संबंध ताणले जाण्यात झाला. दुधाचे पैसे कापून घेण्याबाबत दोन महिन्यांची आवश्यक ती नोटीस न दिली गेल्यामुळे केसेस टिकणार नाहीत; म्हणून त्या मागे घेऊन वाटाघाटी व्हाव्यात असे सरकारी अधिकाऱ्यांकडून प्रयत्न होऊन दोन-अडीच वर्षांकरिता दुधाचा भाव नक्की करण्यात येणारा करार झाला. हा भावही परवडणारा नव्हता. पण गवळ्यांच्यात एकजूट नव्हती. शिवाय ते नाडले गेले होते. जे करारावर सही करणार नाहीत त्यांना मागील पैसे मिळणार नाहीत अशा धमक्या अधिकारी देत होते व म्हणूनच त्यांना नाइलाजाने करारावर सह्या करणे भाग पडले. सह्या न करणाऱ्यांना १ रु. ५२ पैसे (हा भाव अडीच वर्षांच्या नव्या करारान्वये दिला गेला होता.) ऐवजी रु. १.३६ पैसे दिले जातील असेही सांगण्यात आले होते. शिवाय साठ लाख रुपयांची जी वसूली होत होती ती १२ महिन्यांऐवजी अडीच वर्षांत करण्याची सवलतही त्या करारान्वये गवळ्यांना मिळाली होती. परिस्थिती ही अशी असतानाच सरकारने गेल्या दहापंधरा वर्षांत गवळ्यांना जे ४० ते ५० लाख रुपयांचे कर्ज दिले होते, त्याच्या वसुलीला (दुधाच्या किमतीतून पैसे कापून घ्यायला) सुरुवात केली. याचा परिणाम, व्यवसायासाठी नव्या म्हशी घेणे न परवडल्यामुळे व्यवसाय खालावत चालला होता. शिवाय सर-



कारी भांडारातून दाणा गवत मिळणे बंद झाले होते. हाती रक्कम कमी येत असल्याने कमी दाणा गवत खरेदी करणे गवळ्यांना भाग पडत होते. त्यामुळे जनावरांची उपासमार होऊ लागली यातच दहाबारा म्हशी मेल्या.

गवळ्यांचा वनवास येथे तरी संपला काय ? ६·२ लिटर्सपेक्षा कमी दूध उत्पादन या सरकारी आकड्यावर बोट ठेवून गवळ्यांना नोटीसा देणे सरकारी अधिकाऱ्यांनी सुरू केले. (त्यापूर्वी अनेक वर्षे अशी परिस्थिती होती पण ही अट निरुपद्रवी मानली गेली होती. आता सरकारी अधिकारी व गवळी यांच्यात तणाव निर्माण होताच 'कायदा पालन' कसोशीने होऊ लागले.) शिवाय तबेल्यातील एकही म्हैस हलवता येणार नाही अशी सक्त ताकीदही देण्यात आली. कारण सरकार व् बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जाची फेड न झाल्याने म्हशी सरकारकडे गहाण होत्या. असे असूनही मरायला टेकलेल्या म्हशींना पालघर फार्मवर पोषणासाठी पाठविण्यासंबंधी काहीही हालचाल झाली नाही.

या पार्श्वभूमीवर असोसिएशनची स्थापना झाली. काहीही करून म्हशींना वाचवायचेच असे ठरले. जप्त्यांद्वारे म्हशींची विक्री करण्याची सरकारी अधिकारी तयारी करीत होते. यात म्हशींबरोबर धंदा आणि घरही जाणार होते कारण तसा नियम आहे. सुमारे २० वर्षे धंदा करणारे एकाचवेळी बेकार व बघर होणार होते.

शासकीय पक्षाचे अध्यक्ष श्री. अनंत नामजोशी यांच्याकडून काही प्रयत्न झाले तर पाहावे म्हणून त्यांच्या कनांवर ही सर्व परिस्थिती घातली गेली. शेतकी मंत्री श्री. प. कृ. सावंत यांनाही परिस्थिती विषद करणारे पत्र पाठविण्यात आले व भेटीसाठी वेळ देण्याची विनंती करण्यात आली. पण त्या पत्राचे उत्तरच आले नाही. नगरविकासमंत्री पु. ग. खेर आपल्या परीनं प्रश्न सोडविण्यात मदत करीत होते. शेतकीखात्याचे सचिव श्री. शैलेंद्र सुखटणकर यांची भेट घेण्यात आली. असोसिएशनचे म्हणणे शेतकीमंत्र्यांच्या कानावर घालण्याचे त्यांनी आश्वासन दिले आणि तात्पुरती व्यवस्था म्हणून असोसिएशनच्या काही सूचनाही १५ दिवसांसाठी मानण्यात आल्या.

हा असोसिएशनचा पहिला विजय होता. म्हशी पालघर फार्मवर पाठविणे किंवा विकायची परवानगी, (पण विक्रीची रक्कम सरकारजमा करायची) दाणा वैरणीची व्यवस्था सरकारला करता येत नसेल तर ती करण्याची मुभा असोसिएशनने मागितली व ती मिळाली. असोसिएशनने सदस्यांना दाणा गवत घेऊन देऊन उत्पादनासंबंधी मार्गदर्शन करायला सुरवात केली. याचे चांगले परिणाम दिसू लागले. सदस्यांचा विश्वासही वाढला पण तेवढ्यात ही तात्पुरती व्यवस्था सरकारने बंद केली !

मध्यंतरीच्या काळात श्री. एन्. जी. अभ्यंकर हे कृषी सचिव म्हणून काम पाहू

लागले. त्यांनी दोन-तीन महिन्यांकरिता ही सूट पुन्हा दिली व त्या काळात चौकशी करण्याचे आश्वासन दिले. त्यावर त्यांनी स्वतः तात्काळ एक अहवालही तयार केला. पण दरम्यान ते पुन्हा आपल्या पूर्वीच्या मंत्रालयाचे सचिव म्हणून काम पाहू लागले आणि कृषीसचिव श्री. सुखटणकर त्या जागी पुन्हा रुजू झाले. पण तो पावतो असोसिएशन चांगला आकार घेऊ लागली होती. ती रजिस्टरही झाली होती.

३० जून ७१ रोजी अडीच वर्षांचा करार संपत होता. म्हणून मग असोसिएशनने २८ एप्रिल रोजी सरकारला दोन महिन्यांची नोटीस दिली, की दुधाचा भाव वाढवून मिळाला नाही तर असोसिएशनचे सदस्य दुधाचा-पुरवठा बंद करतील. यामुळे संघर्षमय वातावरण रंगू लागले. असोसिएशनने दुधासाठी हंडे, मलई वेगळी काढणारे सेपरेटर्स वगैरे घेतले. यामुळे सरकारला याकडे गंभीरपणे लक्ष देणे भाग पडले.

असोसिएशनच्या प्रयत्नांमुळे लोकांनाही हा प्रश्न योग्यप्रकारे समजू लागला. ३०० बुरखेवाल्या मुसलमान बायकांचा मोर्चाही आयोजित करण्यात आला.

पूर्वी, लहान धंदेवाला अडचणीत आला, की मोठा धंदेवाला त्याला मदत करीत असे. पण यावरही असोसिएशनने ठराव करून ही पद्धती नाहीशी केली. त्याचे असे झाले, की १०० म्हशी लिलावात निघाल्या. पण पूर्वीप्रमाणे त्या कोणाही मोठ्या धंदेवाल्याने विकत घेतल्या नाहीत. त्या सरकारला विकत घ्याव्या लागल्या. असोसिएशनची एकजूट कायम राहिली. आजही ग्राहक व उत्पादक यांच्यात सहकार्य निर्माण करण्याचा असोसिएशन प्रयत्न करीत आहे.

शासन अजूनही उदासीनच आहे. अजूनही हा वाद मिटलेला नाही. गवळ्यांचे प्रश्न रेंगाळतच पडले आहेत. ही नुसती भाववाढीची चळवळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ती दडपण्याचा प्रयत्न शासनातर्फे झाल्यास शहराच्या दूध-पुरवठ्यावर त्याचे परिणाम होतील. दुधाचे भाव वाढविले गेले नाहीत तर व्यवसाय धोक्यात येणार आहे. म्हशी उपाशी मरणार आहेत. पण त्यांना भाव वाढवून दिले तर त्याचा परिणाम म्हणून गिऱ्हाईकांना मिळणाऱ्या दुधाचे भाव वाढविण्याची मुळीच गरज नाही. बृहन् मुंबई दूध योजनेला १ कोटी १७ लक्ष रुपये फायदा मिळतो. त्यामुळे अशी बिलकुल गरज नाही. शेतीविकासाबरोबर ग्रामीण दूध योजनाही राबवली गेली पाहिजे. गुजरातमधील 'आनंद' येथे असेच होते. ग्रामीण विकासाबरोबर मुबलक दूध पुरवठ्याची हमी यातूनच मिळणार आहे. या घटकेपर्यंत तरी याबाबत सरकारी आघाडीवर सर्वच सामसूम आहे.

□ □ □

 पृष्ठ १० वरून

आले. शिवाय पश्चिम पाकिस्तान व आझाद काश्मिरच्या सुरक्षिततेला धोका वाढला, ते वेगळेच. [ स्टेट्स्मनवरून ]

## भारत आणि बांगला देश : आर्थिक सहकार्याची नवी क्षेत्रे

डिसेंबर तीन. संध्याकाळी सहाच्या हिंदी-इंग्रजी बातम्या रेडिओनी सांगून जरासाच वेळ झाला होता. ऑफिसमधून घरी परतणारे नेहमीप्रमाणे बसच्या कंटाळवाण्या प्रतिक्षेत नेहमीच्याच गप्पा मारीत उभे होते. गेल्यावर्षीपेक्षा कमी असली तरी थंडीचे अस्तित्व होतेच. दिल्लीत संध्याकाळी या सुमारास काळोख पडायला सुरुवात झालेली असते.

आणि अचानक सायरन वाजला. वास्तविक चार तारखेला रात्री केव्हातरी ब्लॅकआऊटची तालीम घ्यायची आणि ती अधिक काटेकोरपणे अंमलात आणायची, चुकारपणा करणाऱ्यांना शिक्षा करायची अशी घोषणा होती. त्यामुळे संध्याकाळचा सायरन एकदम अनपेक्षित होता. तरीही ही 'सरप्राईझ' तालीम असावी, अशा कल्पनेने लोकांनी दिवे घालविले. पाकिस्तान्यांपेक्षाही दिल्ली पोलीस पाचशे रुपये दंड करतील याची भीती जास्त होती.

यानंतर मग आधीच्या ब्लॅकआऊटप्रमाणे उत्साही तरुण मंडळी कॉलनीमधून 'लाईट बुझाव'चा आरडाओरडा करीत हिंडू लागली. रस्त्यावरच्या कारवाल्यांना दम देऊ लागली..

नेहमीचा तास उलटला तरीही ऑल क्लिअरचा सायरन झाला नाही तेव्हा अनेकांना कुठेतरी गडबड असल्याचा संशय आला. सातचे बुलेटिन ऐकायला धावले, तो मीडियम वेव्ह बंद होते.

मग रात्र अधिक काळोखी झाली.

दिल्लीच्या दिशेने पाकिस्तानी विमाने निघाली होती, अशी कुणकुण लागली. एकदम तंग वातावरण.

संध्याकाळी पार्लमेंट आवारात पब्लिक अकौंटस् कमिटीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त पार्टी होती. लोकसभेचे सभापती धिल्लन यजमान होते. ही पार्टीही मेणबत्तीच्या प्रकाशात झाली. राष्ट्राध्यक्ष व्ही. व्ही. गिरी निमंत्रितांबरोबर हलक्या आवाजात गप्पा करून बाहेर पडले ते टॉर्चच्या प्रकाशाच्या. हेडलॅम्पस् अर्धे काळे केलेली त्यांची गाडी इतरांबरोबर सावकाश राष्ट्रपती निवासाकडे निघून गेली.

पाठोपाठ आणिबाणीची घोषणा. आणि रात्री बारा वाजता पंतप्रधानांचे राष्ट्रास

उद्देशून भाषण असल्याचे रेडिओचे निवेदन.

चव्हाण आणि जगजीवनराम पाटणा आणि मुंबईहून राजधानीस परतले. इंदिराबाई कलकत्त्याहून निघाल्या.

बाहेर रस्त्यावर चंद्राचा फक्त मिणमिणता प्रकाश आणि घरात, दिव्यावर घाईघाईने कागद अडकवून खिडकीच्या पडद्याबाहेर उजेड न जाऊ देण्याचा प्रयत्न करीत चिंतातूर मंडळी रेडिओकडे कान देऊन बसलेली.

बारा वाजता रेडिओने शॉर्ट वेव्हवर संगीत. दर पाच मिनिटांनी 'एक विशेष प्रसारणका इंतजार कीजिए 'चा नारा. सस्पेन्स असलेल्या चित्रपटाचा क्लायमॅक्स केव्हा येतो याची श्वास रोखून वाट पहावी, तसे क्षण.

इंदिराजींना दिल्लीत यायला वेळ लागला होता. विमानतळावरून त्या सरळ रेडिओच्या स्टुडिओत आल्या. टाईप केलेले इंग्रजी भाषण वाचून हिंदी भाषांतराची वाट न बघता उत्स्फूर्त बोलल्या. धीरगंभीर आवाजात.

रोखलेले श्वास सुटले.

बाई म्हणाल्या होत्या, 'कंट्री इज् ऑन वॉर फूटिंग.'

भारत-पाक युद्धाची ठिणगी पडली होती.

पाकिस्तानने अमृतसर, जालंदर, श्रीनगर, अवंतीपूर वगैरे विमानतळांवर बाँबफेक करून युद्धास सुरुवात केली खरी, पण त्यामुळे दरदिवशी हा आगाऊपणा आपल्याला महागात पडत असल्याचे तेथील राज्यकर्त्यांच्या लक्षात येऊ लागले. हुसैनीवाला, छांब वगैरे एक-दोन ठिकाणे वगळता भारताने इतर ठिकाणी तुफानी आगेकूच करून याह्याखानाला जेरीस आणून सोडले.

दर तासाला जगाच्या कानाकोपऱ्यातून सनसनाटी बातम्य येऊन धडकू लागल्या. दिल्लीत बाईंनी बंगला देशाला मान्यता दिली, तर त्यापाठोपाठ पाकिस्तानने भारताबरोबरचे राजनैतिक संबंध तोडून टाकले. तिकडे युनोमध्ये रशियाने अमेरिका-चीनच्या पवित्र्याला हाणून पाडले. भारत-पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करून सैन्य मागे घ्यावे (बंगला देशाचे सावकाश बघू.) असा ठराव सुरक्षा मंडळात आणून निक्सन-माओच्या प्रतिनिधींनी भारत आक्रमक असल्याचा सूर धरला.

सुदैवाने इंदिरा गांधींनी युद्ध पेटण्याच्या खूप दिवस आधी 'यावेळी ताश्कंद होणे नाही' असे ठणकावून सांगितले होते. पाकिस्तानबरोबरच्या पहिल्या दोन युद्धात विजयश्री हातात आली असतानाच शांतीचा पुळका येऊन भारतीय राज्यकर्त्यांनी भोंगळपणाचा वेगळा आविष्कार पेश केला होता. तो प्रकार यावेळी होणार नाही, अशी ग्वाही पंतप्रधानांनी देऊन सैन्याला उत्साहित करून ठेवले आहे.

अर्थात पहिल्या दोन वेळेपेक्षा यावेळची परिस्थिती खूपच बदलली आहे. युद्धसामुग्रीच्या जय्यत तयारीबरोबरच यावेळी पूर्वीपेक्षा अन्नपरिस्थिती सुधारली आहे.

हरित क्रांतीने दिलासा दिला आहे. त्याहीपेक्षा बंगला देशच्या अंतर्गत दुखण्याचा त्रास भारताला विनाकारण अंगावर ओढून घ्यावा लागतो आहे, तो का सहन करायचा? याह्याखानाने जे काही केले त्याचा जाब आमच्यावर का लादता?

त्यामुळे जी गोष्ट एप्रिल–मेमध्ये करायची ती शांततामय तडजोडीची वाट पाहात लांबणीवर टाकली. शेवटी पाकने आगळीक केल्यानंतरच शस्त्र हाती घेतले. अशी भारताची भूमिका. □

भारत-पाक तणातणीमुळे जागतिक राजकारणाचे चित्रही एकदम बदलले. भारताबरोबर मैत्रीचा करार केल्यानंतर तिला जागून रशियाने सुरक्षा मंडळात दोन वेळा व्हेटोचा वापर करून अमेरिका-चीनला हाणून पाडले! यामुळे पेकिंगशी मैत्री करण्याचा इरादा असेलेले निक्सन माओच्या आणखी जवळ आले. युनोमध्ये चीनला प्रवेश देण्याचा आग्रह धरणाऱ्या भारताला, पेकिंगचे प्रतिनिधी असेंब्लीमध्ये नुकतेच येऊन बसतात, तोंच त्यांच्याकडून अशी अडवणूक होत असल्याचे पाहावे लागले. अर्थात १९६२ च्या युद्धानंतर आतापर्यंत असलेली परिस्थिती पाहाता यात अनपेक्षित काही नव्हतेच.

भारत-रशिया आणि पाक-चीन-अमेरिका असे दोन वेगवेगळे गट तयार झाले. पण यामध्ये या तीन बड्या राष्ट्रांचा उद्देश जागतिक ताकद वाढवायची, आपले पारडे जड ठेवायचे एवढाच. बंगला देशला मान्यता मिळो न मिळो, भारतावर जुलूम होवो की पाकिस्तानवर, याच्याशी कुणाला कर्तव्य?

सीमेवरून आलेल्या पत्रकार मित्राने जवानांच्या मनोधैर्याविषयी सांगितलेली एक गोष्ट या संदर्भात सूचक. तो म्हणाला, जवानांना हे आझाद काश्मीर, बंगला देश वगैरे कुछ मंजूर नाही.

ते म्हणतात हे पाकिस्तानचे दुखणे मुळातूनच का निपटून काढू नये? अनायसे संधीही चालून आली आहेच.

बंगला देशच्या जनतेला स्वातंत्र्य मिळवून देण्याखेरीज भारताला या नव्या प्रजासत्ताकाचा काही फायदा आहे का?

होय. एक म्हणजे ज्यूट, तांदूळ, मासळी, चहा, नारळ वगैरेंचा व्यापार करता येईल. यापैकी ज्युटचा कच्चा माल पूर्व बंगालात आणि गिरण्या पश्चिम बंगालात अशी आतापर्यंत परिस्थिती होती.

दुसरं, पश्चिम बंगालमधून आसाम वगैरे भारतीय राज्यात जाण्यासाठी सरळ रस्ते उपलब्ध होतील. वाहतुकीची मोठी अडचण दूर होईल.

तिसरं: करार करून चित्तगाव, डाक्का वगैरे विमानतळांचा किंवा बंदरांचा उपयोग करून घेता येईल.

चौथे : पाकिस्तानच्या मदतीने चीन हल्ला करील ही भीती उरणार नाही. एक सीमा त्या दृष्टीने निर्धास्त होईल.

नव्या एक कोटी निर्वासितांखेरीज जुने काही परत गेले तर आर्थिक बोजा कमी होईल, ते वेगळेच !

रेडिओ पाकिस्तान भारताविरुद्ध विषारी प्रचार करता करता कधी कधी छान विनोदही करून टाकतो.

परवाच्या एका वार्तापत्रात बातमी होती. मुंबईकडच्या मारवाड्यांनी स्वतंत्र मारवाडिस्तानची मागणी करून भारत सरकारला अडचणीत पकडले आहे.

बातमी ऐकणारा मित्र हसण्याचे विसरून कपाळाला हात लावून म्हणाला, ' अरे, निदान शीख, तमिळ, रजपूत, मराठे यांची तरी नावे घ्यायची. निरुपद्रवी मारवाडी कशाला आंदोलनाच्या भानगडीत पडताहेत ?

□ □ □

## निळे आकाश आणि चंदेरी पंख...

पृष्ठ ८ वरून

तोफा आहेत. भारताला रशियाने दिलेली सुखोई एस्. यू–७ बीज् ही विमाने फारच महत्त्वाची आहेत. त्यांचा वेग ताशी १६०० मैल आहे. याशिवाय मिस्टियर्स तुफानी हे थोडे जुनाट, नॅट, कॅनबेरा, हंटर व भारतानेच तयार केलेले एच् एफ् २४( हिंदुस्तान फायटर) ' मरुत ' ही विमाने आपल्याकडे आहेत. एच्. एफ. २४ नेही परवा पराक्रम करून एक सेबर पाडले पण या विमानाच्या सांगड्यायोग्य इंजिन अजून आपण तयार करू शकलो नाही. त्यामुळे एरवी चांगले असलेले हे विमान वेगात जरा कमी पडते.

वाहतुकीसाठी पाककडे सी–१३०, एफ् ३७ ही विमाने आहेत तर फ्रान्सची अलौती–३ व रशियाचो माय–८ प्रकारची हेलिकॉप्टर्स त्यांच्याकडे आहत. ही पाकची हवाई शक्ती आहे. भारताच्या हवाई शक्तीचाही थोडाफार उल्लेख येथे आहेच. एवढे मात्र निश्चित, की विमानांची संख्या आणि त्यांचे सारथ्य यात आपण त्यांच्यापेक्षा फारच उजवे आहोत. आपली तिन्ही सेनादले आपले रक्षण करायला पूर्ण समर्थ आहेत. भारतीय हवाईदलाची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे. नॅट, मिग–२१ एच्. एफ. २४ व अॅव्हरो (एच्. एस्. ७४८) सारखी वाहतूक विमाने आपण बांधू शकत आहोत. स्वयंपूर्णतेकडे आपली वाटचाल चालू आहे. अजूनही ' टेक ऑफ 'ची पायरी आपण गाठलेली नाही पण ती आता फार दूर नाही.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649




"युद्धकाळात सुद्धा आपलं दैनंदिन आयुष्य अगदी नेहमीप्रमाणं चाललं आहे यात संशय नाही....."